# वऱ्हाडसमाचार.

**THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.**

AKOLA :—SATURDAY EVENING, JUNE 4· 1870 NO.20

पुस्तक ५. अकोला शनिवार सायंकाळ, तारिख ४ माहे जून सन १८७० इ०. अंक २०


## आगगाडीनें काशीयात्रा.

हिंदु धर्मामध्यें काशी यात्रेचें मोठें पुण्य सांगितलें आहे. ज्यांस ज्यांस अनुकूळ म्हणून आहे व निदान कर्म मिळतें आहे तरी तें काढून लोक वृध्यापकाळीं काशीस जातात. "काश्यांतु मरणान्मुक्तिः" म्हणजे काशीमध्यें मरण पावलें तर तात्काळ मुक्तीस जातें असें वचन आहे. त्या भरावर हजारों लोक जिवाचा आटापिटा करून हर प्रयत्नानें वर्षास काशीस जातात. व हंगामांत ह्यांची रांग लागलेली दृष्टीस पडली म्हणजे लोकांमध्यें धर्मश्रध्या अजून किती जबरदस्त आहे तें दिसून येतें.

जुन्या काळीं दक्षिणेंतून काशीस जाणें फार प्रयासाचें असे. रस्ते वाईट, सातपुड्याच्या वाऱ्या विकट, जंगल, चोरांचें भय अशामुळें येकटें दुकटें तर काय पण १०।५ मिळूनही जाण्यास धैर्य होत नसे. तेव्हां भेंव रगांवचे १०।२० लोक जमून काशीयात्रा एका मेळ्यानें निघत. त्यास पोंचावयास सुमारें तीन महिने लागत व तीथें करून परतावयास सुमारें येक वर्ष लागें व हजार पाचशें रुपये निदानचा खर्च लागे. पुढें सातपुड्यांतील जंगल सरकारानें तोडून सडक बांधली. चौक्या बसविल्या व अर्धी मुर्धी आगगाडी झाली तेव्हां लोकांचें कांहीं श्रम कमी झालें व द्रव्यखर्च कमी झाला. तरी हल्लीं सन १८७० चे एप्रिल महिन्यापासून काशीस जाण्यास जो उत्तम सोय झाली तिची तुळणा दुसऱ्या कोणत्याही गोष्टीनें करतां येणार नाहीं. ती सोय कोणती म्हणाल तर येथून तेथपर्यंत आगगाडीची-

आतां पुण्याहून आज सकाळी नऊ वाजतां आगगाडींत बसावें तें उद्याचा दिवस मध्यें जाऊन परवां पाहाटेस साडे पांच वाजतां म्हणजे साडेपंचेचाळीस तासांत साडे चारशें कोस प्रयागास उतरावें. आगगाडिचें तिसरे प्रतिचें भाडें पुण्याहून प्रयागास १८८९ अठरा रुपये नऊआणे पडतें तेथून काशी येकावन्न कोस आहे. साडे साहा वाजतां सकाळीं प्रयागास आगगाडींत बसावें तें अकरा वाजतां काशीस दाखल व्हावें. त्यास थर्डक्लास हाशील तीन रुपये येक आणा तीनपई पडतात. मिळून पुण्याहून काशी ५०० कोस, तेथपर्यंत जाण्यास ५१ तास व गरिबीप्रमाणें तिसरे क्लासांतून आग गाडीनें गेल्यास भाडें सुमारें २१।१०।३ पडतें यांजवरून सरकारी कामदारानें काशीस जाण्या प्रित्यर्थ येक आठवड्याची रजा घेतली तर ५० रुपयांचे आंत वाटखर्च येऊन त्रीरात्र काशीस रहाणें होईल. व नवे दिवशीं आपल कामावर त्यास पुन्हा परत. यावयास होईल. याप्रमाणें येकंदर आगगाडी झाल्यानें काशीयात्रा फारच सुलभ झाली आहे. सबब यात्रेच्या उद्देशें जाण्यास इच्छणारांनीं तशीच देशपर्यटणाची ज्यांस हौस तशांनीं आतां अशी सुलभ सोय हातची घालवूनये असें आमचें त्यांस सांगणें आहे.

धर्मसंबंधी पापपुण्याचें काम बसमजूत मोठी चमत्कारिक आहे. कित्येक वृद्ध लोक आगगाडीनें जाण्यापेक्षां बैलगाडीनें जाण्यांत अधीक पुण्य समजतात. व कित्येक लोक पायीं, जोडयावाचून अन वाहणी जातात. म्हणजे मनांतलि हेतु कीं कष्ट अधीक तितकें पुण्य अधीक. दक्षिणेंतील लोक याप्रमाणें उपव्द्याप करून पांच सातशें कोस काशी पुण्यक्षेत्र म्हणून तें जातात. व काशीचे आणि त्या लगत्यांचे लोक यात्रा करण्याकरितां इकडे दक्षिणेंत पंढरपुर, कोलापुर, रामदास स्वामीचा सज्जनगड वगैरेकडे येतात. तेव्हां स्थल महात्मापेक्षां श्रम महात्म अधिक झालें. पण हल्लीं आगगाडीचा जो शत पट सुखाचा आणि सोईचा मार्ग झाला आहे त्यामुळें तें मन्नंतर आतां पालटलें व बहुतेक सर्व लोक या नव्या मार्गाचेंच अवलंबन करितील असें दिसतें. व तसें झाल्यास फार चांगलें. श्रम अधिक पाहिजे आहेत तर नुसतें काशीस जाण्यापेक्षां काशी, रामेश्वर दोन्ही, स्थळीं जावें व आगगाडीनें खर्च कमी लागतो तर धर्मादायाचे कामीं पिशवीचें तोंड अधिक खुलें ठेवावें म्हणजे पुण्यांश व्हावयाचा तो होऊन सुखांश पदरीं पडेल असें आमचें मत आहे.

## खर्च करण्याची आणि खर्च कमी करण्याची सरकारची शैली-

लढाई किंवा दुष्काळासारखीं कांहीं तरी अद्वितीयकारणें अवश्य घडल्या वांचून सुखासुखी व स्वस्थतेनें राज्यकारभार चालू असतां चाललेला आवश्यक खर्च कमी करण्याची जरूर येणें हें राज्यांतील जमाखर्चाच्या अव्यवस्थेचें दर्शक होय. जमेपेक्षां खर्च अधिक वाढतो तेव्हां तो जमेचे बाहेर जाऊं नये म्हणून खर्च कमी करण्याचा प्रसंग येतो. पण जमे पेक्षां खर्च वाढण्यास दोन गोष्टींची कल्पना करावी लागते. त्या ह्या कीं, वार्षिक उत्पन्ना पेक्षां कमी उत्पन्न; किंवा वार्षिक खर्चापेक्षां अधिक खर्च. परंतु पहिल्या कारणाचा संभव आपले सांप्रतचे देशस्थितींत बिलकुल दिसत नाहीं. आपले हिंदुस्थानचें उत्पन्न पुष्काळ वर्षांपासून उत्तरोत्तर वाढतच चाललेलें आहे; आणि दहा वर्षांचे मागिल उत्पन्ना पेक्षां या सालचें उत्पन्न निदान दहा कोट रुपयांनीं अधिक वाढलें गेलें आहे. तेव्हां दुसऱ्या कल्पनें वाचून परिणाम नाहीं. तेव्हां खर्च ज्यास्ती झाला असें म्हणण्यास जीं सबळ कारणें पाहिजेत तीं कोठें आहेत? आमचे सरकारावर लढाईचा प्रसंग आला किंवा कांहीं संकटाचे प्रसंगीं सरकारानें रयतेवर औदार्य दाखविलें असा प्रकार तर पाहण्यांत नाहीं; पण दर वर्षास जमेंत खूट आहेच. ही खळी भरण्यास सुमारें आज दहा वर्षें लोक कमज्यास्त कर देत आले. तथापि अखेरीस पहातां खर्चा पेक्षां जमा कमीच! आम्ही वर लिहिलेच आहे कीं, मागील दहा वर्षांत सुमारें दहा कोटी रुपये उत्पन्न वाढलें आहे. तेव्हां हें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, हें वाढतें उत्पन्न दर वर्षीं स्वाहा करून शिवाय खूट कायमची झाली आहे. या वरून स्पष्ट सिद्ध होत आहे कीं, ज्या दिवसापासून आम्हांवर कर बसला त्या दिवसापासून आज पावेतों उत्तरोत्तर दहा कोट रुपये वार्षिक कायमाचा खर्च वाढला आहे. जर १८५७ चे लढाईचे कारणानें ज्यास्ती झालेला खर्च भागविण्यासाठीं लोकांचें उत्पन्नावर कर नसला तर त्या वेळेपासून आज पावेतों वर्षास सुमारें दहा कोट रुपयांचा अधिक खर्च कां वाढू दिला? फक्त हिंदुस्थानचे जमाखर्चाचें काम पहाण्या करितां एक बडा स्वतंत्र अधिकारी—फिन्यानशल मिनिस्टर—दर महा सुमारें ७००० रुपये खर्च करून सरकारानें ठेविला आहे त्याचे हातून फक्त जमेचा व खर्चाचामेळ ठेववत नाहीं तर त्याचा काय उपयोग? बावन कोट रुपये वसूल येत असतां, राज्यांत स्वस्थता असतां, रयतेकडे एक रुपयाही थकला नसतां, व थोडक्या काळांत वार्षिक उत्पन्न दहा कोट वाढलें असतां साधारण नेहेमीचा खर्च भागविण्यासाठीं जर तीन आणि चार टक्के उत्पन्नावर कर घेण्याचा प्रसंग आला तर एकादी छोटी लढाई अगर अशीच एकादी खर्चाची बाब उद्यां नवीन उद्भवली तर रयतेची काय दशा होईल कोण जाणें. या सर्वांचें कारण जमाखर्चीं हिशेबाचे कामीं बेदाद हें स्पष्ट आहे. फिन्यानशल मिनिस्टर यांणीं ज्या बाबीचें उत्पन्न दहा आकारावें त्यांत बहुधा परिणामीं कमी येतें व खर्चाच्या बाबी नेहेमी वाढतात कारण पहतां कांहीं एक अलौकिक दिसत नाहीं. यावरून असें उघड दिसतें कीं, सरकारी खर्चाचा कारभार अनिबंध व दिवाळ खोरी आहे. याप्रमाणें आपलें सरकारची खर्च करण्याची शैली झाली.

आतां खर्च कमी करण्याची शैली आपले सरकारची कशी आहे ही पहा. आज तागायत जीं उदाहरणें आमचे पाहण्यांत आहेत त्यां वरून पहातां असें दिसतें कीं, खर्च कमी करणें म्हणजे सरकारचे आश्रयास असलेले गरीब गुरीबांस अन्नास मोताद करणें अशा सारखें झालेलें आहे. कारण बहुधा असेंच दृष्टीस पडतें कीं, सरकारानें खर्च कमी करण्याचें आपले मुख्य मुख्य अधिकाऱ्यांस लिहिलें म्हणजे पहिल्यानें शिपायी व बिचारे लहान पगारवाले कारकून वगैरेंवर संक्रांत येते. अर्थात ते बिचारे हाकाहाक करतात. आणि यत्किंचितही खर्च कमी करण्यांत किती हाकाहाक होते हें सरकारास दाखवण्यास तें कारण सहज उपयोगी पडतें. पुष्कळ मोठ मोठे अधिकारी निरुपयोगी असलेले सर्वांस माहित आहे. पण खर्च कमी करण्याचे सपाट्यांत असा कोणी सांपडलेला विशेष कोणी पाहिलेला नसेल. ज्या जाग्यावर मेटिवास ५० रुपये देण्यास सरकार नाराजी त्याच जाग्यावर टोपिवाला ठेवल्यास त्यास निदान तिपट पगार मिळाल्या शिवाय रहात नाहीं. परदेशांत फक्त उदर निर्वहार्थ गरीब विद्यार्थ्यांस दिलेल्या स्कालरशिपस एका क्षणांत नाहींशा होतात; पण हजारों रुपये पगार घेणार सिव्हिल सर्व्हिसींतील लोकांनीं देश भाषा शिकणें सर्वांशीं अवश्यक असतांही तें केल्याबद्दल त्यांस प्रत्येक भाषेस दोन दोन हजार बक्षीस मिळतें. विद्या खात्याचे कांहीं अधिकारी सरकारास कळवितात कीं, शाळांतील गरीब भिकारी विद्यार्थ्यांस पगार दिल्या पासून कांहीं फायदा होत नाहीं; पण त्याच खात्यांतील मोठ्या पगार वाल्यांस भाषा शिकण्याबद्दल उत्तेजन येण्या साठीं बक्षिसें देण्याच्या शिफारशी होतात!! जेथें खरोखर खर्च कमी होण्याचा संभव आहे तेथें आपल्यावर शेकतें सबब अधिकारी लोक बिलकूल हात लावित नाहींत; आणि जे गरीब गुरीब, ज्यांचे बऱ्या वाईटानें त्यांचें बरें वाईट कांहीं होत नाहीं, त्यांच्यावर उठल्या बसल्या प्रसंग गुजरतो हें उघड आहे. सरकारास खर्चाची अडचण पडली म्हणजे निरुपयोगी अधिकाऱ्यांची मोठ मोठीं एक दोन चार प्रस्थें कधीं अजी कमीं केलेलीं पाहिल्या ऐकल्याविषयीं कोणास स्मरतें काय? शिपायी कारकुनांचे पगार कमी करणें किंवा त्यांस अजी दूर करणें हें मात्र नेहेमीचे कृत्यांतील आहे. खरोखर खर्च कमी करणें तर मोठ्या पगारवाल्यांचा पगार कमी करण्या पासून किंवा निरुपयोगींस अजी दूर करण्या पासून आरंभ व्हावा, शेकडों ठिकाणीं त्यांची मुदल जरूर नाहीं असेंही दाखवितां येईल. गव्हरनर जनरल, गव्हरनर, कम्यांडर इन चीफ, कौन्सिलदार यांचे पगारांतून प्रत्येकी दोन हजार व एक हजार कां कमी न व्हावे? त्यांस जर त्यांचे वीसहजार दहा हजार आवडत आहेत तर गरिबाचे दहा त्याला कां आवडू नये? त्याचे आदा प्रमाणें त्याला खर्च नाहीं काय? त्याचे चाकरीची योग्यता त्याचें पगारा इतकी नसते काय? तर संकटाचे वेळेस स्वतःचा एक पैसाहि कमी न करितां फक्त गरिबावर शस्त्र धरल्यानें सरकारचे दृष्टीस पक्षपातपणाचा दोष आल्यावांचून कसा राहील? पुष्कळ ठिकाणीं असेंही पहाण्यांत आहे कीं

वडे लोकांचे पगार वाढविण्याकरितां लहान कामदारांचे पगार कमी होतात. परंतु हें सर्व बोलणें व्यर्थ आहे. मांजराचे गळ्यांत घंटा बांधणें कोणाचें सामर्थ्य आहे, किंवा आपलें व दुसऱ्याचे हितहित एक दृष्टीनें पहाणारें धर्मराज्य आज कोठें आहे?

खर्च कमी करण्याचे बाबदींत बरीच किता आपले रेलवे कंपनीचे अधिकारीही उत्तरोत्तर घन आहेत असें पहाण्यांत आलें आहे. जें काम नेटिव पन्नास रुपयांवर करतो तेथें टोपी आली कीं, गरुडी चवा खोनें निदान तिपट तरी त्या जागचा पगार वाढतो. निदान इतकेंच जरी होऊन राहतें तरी कांहीं हरकत नव्हती. परंतु त्याची सुमडी भरण्यासाठीं कामांत चुरणारे गरीब कमी पगाराचे पागोटिवाले नोकरांचा पगार कमी होतो.

प्रथम, उत्पन्ना पेक्षां खर्च जास्तो करणें; आणि दुसरें, प्रसंग येईल तर खर्च कमी करण्यात कोणत्या लोकांत तो करावा हो विद्या आपलें सरकार कधीं शिकेल. नें गो.

## वऱ्हाड

मेहेकर जि० बुलढाणें येथील तहशिलदार रा. मल्हारराव सदाशिव यांस ६ महिने त्यांची रजा मिळाली.

उमरावती—हवा, पश्चिमेचा वारा सोसाट्यानें वाहतो व मधून मधून अभ्रें येतात ह्यावरून वरसात लवकर लागण्याचें चिन्ह दिसत आहे. तरी उष्णता कमी झाली असें नाहीं. रोगराई कांहीं नाहीं. स. प्र.

### अकोला

वाशीमचे एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर रा. रामशंकर दीनदयाळ ह्यांवर कांहीं आरोप आल्यावरून तूर्त त्यांची वणी जिल्ह्यांत बदली केली आहे व त्यांच्या जाग्यावर उमरावती येथील रा. आत्माराम भिकाजी ह्यांस नाण्याचा हुकूम झाला आहे रा. आत्माराम भिकाजी ह्यांचे जाग्यावर मि. नेकोलेट सा० जाणार. त्यांचे काम मि. साऊकेद साहेब पहाणार व त्यांचें काम मि. डनलाप हे पहाणार.

मि० दस्तुर बहिमनजी जागासती साहेब देरजेपवरून तारीख २ जून रोजीं परत आले.

मि० श्रीकृष्ण नरहर यांस दोन महिने तूर्त येथेंच ठाणार असें समजतें.

मि० सालकेद साहेब यांचा राजिनामा पास झाल्याचें कळतें.

एप्रिल महिन्याचा वऱ्हाड गिर्रिटरचा अंक अद्याप निघाला नाहीं. हें मासिक पुस्तक अजारीन वऱ्हाड समाचार छापखान्यांत छापत होतें परंतु याच्या मालकांनीं कांहीं कारणानें असें आता दुसरीकडे छापण्यास दिलें तथापि ते आपलें कर्तव्य म्हणणें नाहीं. पहिल्या अंकापेक्षां दुसऱ्याम दुसऱ्या उशिर व तितक्यास चौपट या मानानें उशिराचें प्रमाण भूमिती श्रेढीवर बसलें तर या पुस्तकास मासिक पुस्तक म्हणण्यापेक्षां आमच सांप्रतचें वऱ्हाडाचें विशेषण दावें ह्मणजे त्यास नानरेग्युलेटेड पुस्तक ह्मणावें हे चांगलें शोभेल. आमची ह्याचे कर्त्यास अशी शिफारस आहे कीं, त्यांनीं असा उशिर लावून वर्षाची कशी तरी बारा पुस्तकें भरून देण्यापेक्षां बारा पुस्तकांची एकच गाथा करून छापावी. हें सांप्रतच्या वहिवाटीपेक्षां फार चांगलें व लोकांस सुखावह आहे. ह्या पुस्तकाचें संबंधानें आमचेकडे छपण्यास कांहीं पत्रेंही आलीं आहेत.

येथील नायब तहशिलदार रा० नारो बापूत यांनीं पेनशनाबद्दल अर्ज केला आहे व त्याविषयीं वरिष्ठ अधिकाऱ्याकडे विचार चालू असल्याचे कळतें.

अकोला जिल्ह्यांत नळगांव नवीन तालुका होणार व तेथें कारकुनाची वगैरे भरती करण्यास ड० क० साहेबांनीं तालुक्याहून कोणी किती वर्षें काम केलें या विषयींची हकीकत पत्रकें मागविलीं आहेत व ते जुनेपणाचे हक्क पाहून भरती करणार असें समजतें. हें जर खरें असेल तर ड० क० साहेबांचे हें कृत्य स्तुतिपात्र आहे.

हवा अतिशय उष्ण आहे दोन तीन दिवसांपासून आकाशांत अभ्रें येत असतात तेणेकरून तर हल्लीं फारच गर्मी होत आहे सभोंवार कोठें कोठें पाऊस पडल्याचेंही प्रारंभ झाला. गांवांत रोगराई कांहीं नाहीं.

रा० दत्तो नारायण अ० क० आफिसांतील कारकून हे वकिलीच्या परिक्षेंत पास झाल्याबद्दल आम्हीं पूर्वी लिहिलेंच आहे आतां त्यांनीं आपल्या जागाचा राजिनामा दिला व ते एक दोन दिवसांत सातार जिल्ह्यांत अष्टेवळें येथें वकिलीचें काम करण्यास जाणार. त्यांची जागा डे. क. आफिसांतील रा० बाबाराव येशवंत यांस दिली.

सर सालरजंग निजामचे दिवाण हे येथें आले होते तेव्हां तुरुंग पाहण्यास गेले होते तेथें त्यांचे पुढें दोन जन्मठेपचे कैदी आले होते. त्यांची नांवें ह्यांणीं लिहून घेतली होतीं आतां ते कैदी सोडण्याविषयीं तिकडून लिहून आलें आहे. दिवाण साहेबांनें त्यांवर मोठे उपकार समजले पाहिजेत.

खामगांव व आकोलें येथील नायब तहशिलदारीच्या जागा भरण्यासाठीं रा. दामोधर गणेश, कृष्णाजी अनंत व नाथुजी मुकुंद यांची परिक्षा डे. क. साहेबांनीं घतली.

## पत्र व्यवहार

रा. रा. "वऱ्हाडसमाचार" पत्र कर्ते यांस—वि. वि. सालाबाद प्रमाणें अमी नारायणाची स्वारी वयूनें सह्य घेऊन कालचीं रात्री आठ वाजतांना आपलें वार्षिक पेनशन घेण्याकरितां आली होती. सुमारें वारोस घरें त्या कालरूपी दैवतेच्या भक्ष्य थनीं पडलीं. ऐन हंगामाचे दिवस असल्याकारणानें सर्व कुणवी लोकांचा माल टाल याच घरीं असल्याकारणानें त्याची ही आहुति नारायणानें घेतली. तशा समयीं आग विझविण्याकरितां मनुष्याची न्युनता आणिची दक्षता नायूची अनुकूलता असा त्रिवेणी संगम जमून आमचे बहादर पलिसांचा असा सक्त हुकूम होई कीं, कोणी आग विझविण्यास निघालेत मनाई नंतर सर्व घरें सुखानें जळूं दा तेंत. कदाचित कोणी गेल्यास तो संशयास कारण होईल!! वाहवारे पोलीस!!! धर्मा आहे कुत्रें हो जी लोकांमध्यें म्हण पडली आहे ती अशाच कार्यांवरून पडली असावी. सुमारें दोन हजार रुपये पर्यंत नुकसान झालें असावें असा अजमास आहे. जंगलखात्याकडून आलीकडे मजूर लोकांस लाकडाची कवाडें आणण्याची मनाई झाली आहे. दर कवाडास दोन आणे प्रमाणें महसूल घेण्याविषयीं पटील यांस हुकूम असल्यामुळें तुरत कवाडें बंद आहेत तेणेंकरून सर्व गांव मोठ्या अडचणींत पडला आहे इकडे सरकारानें लक्ष देऊन योग्य बंदोबस्त करावा येणें करून रयतेस सुख होईल. कळावे तारीख ३० माहे मे १८७० इ.

"क्ष"

## वर्तमानसार

तहनामा—हिंदुस्थान सरकार व काश्मिरचे महाराज याचे दरम्यान व्यापाराचे बाबतींत नुकतांच एक तहनामा झालेला इंडिया गयझेटांत छापिला आहे. त्यांतील मतलब इतका आहे कीं, इंग्रज सरकाराचे मुलखांतून निघून किंवा त्यांत येण्यासाठीं दरम्यान महाराजाचे राज्यांतून जाणारे मालावरील दस्तुरी महाराजांनीं माफ केली; इंग्रज सरकारानें त्या ऐवजीं, युरोप देशांतले जिन्नस जे महाराजांचे राज्यांत किंवा तूर्कस्तान हिंदुस्थानांत आणण्यासाठीं महाराजांचे राज्यांतून जातील त्यांवर इंग्रज सरकार दस्तुरी घेत असे ती व काश्मिरांतून निघून इंग्रजी राज्याचे हद्दींतून जो माल परराष्ट्रांत जातो त्या वरील दस्तुरी इंग्रज सरकारानें सोडिली.

चंद्रपूरचें हाय स्कूल—सेंट्रल इंडिया टाइम्स या पत्रा वरून कळतें कीं, चंद्रपूरचें हाय स्कुलांत असा टिचर दर माहा एकंदर खर्च रुपये अकरासें, १२००, नऊ मुलांस विद्या शिकवीत आहेत! पैकीं सहा धेडांचीं पोरें, दोन मुसलमानाचीं व एक क्रिश्चन, अशीं आहेत. या शाळेची अशी अवस्था होऊन बरेच दिवस झाले तथापि अजून तें स्कूल अजी बंद करणें किंवा पूर्वीच धेडाचे किंवा नीच जातीचे मुलांस शाळेंत न घेणें यांतून कांहीं झालें नाहीं. नऊ मुलांत अकराशें रुपये खर्च विशेष नाहीं असें सर साहेबास वाटत असेल तर ठिक आहे. ने० गो०

अक्कलकोट—येथील श्री स्वामी महाराज यांची स्वारी तेथेंच आहे.

हवा या आठवड्यांत हवा फार उष्ण असून यंत्रांतील पारा दुपारी बारांवर दोन वाजतां १०२ अंशावर असतो तापाची साथ आली असून हवाही बिघडत चालली आहे क० त०

धुळें हवा—या आठवड्यांत अति उष्ण झाली आहे उन्हाचा ताप इतका होतो कीं, १२ वाजल्यापासून तों चार वाजेपर्यंत तोंड बाहेर काढवत नाहीं. हल्लीं डिग्रीचा पारा ११२।११३ अंशावर असतो. गांवांतील अडचन विहिरी बहुतकरून आटल्या. हल्लीं जर कमयु या उभयतांस फारच त्रास आहे. महागाई आपलें पाऊल आठ बार अगयानें पुढें करीत आहे आतां ईश्वर कृपेनें पर्जन्य लवकर पडेल तर बरें होईल.

मौजे कानंद ता० शिरूर येथें एका भिल्लिणीस मुलगी झालेली आहे हल्लीं ती दोन महिन्याची असून तिजला दोन्ही हात नाहींत. उजव्या हाताच्या ठिकाणीं एकच बोट नख सुद्धां आहे तसेंच डाव्या हाताच्या जागीं विचेका एवढी एक खांच असून त्यांत गव्हा एवढं एक बोट नख सुद्धां आहे. ज्ञा. प्र.

पर्जन्य—नगरापासून दौंडपर्यंत रस्त्यावर लोणी नजिक मोठा पर्जन्य व गारा पडून वीजही पडली. त्यांत दोन कुळवांचे अंगावर वीज पडल्यामुळें ते मरण पावले. व एकाचे पायावर पडल्यामुळें त्याचें पाय मात्र जळालें. ना. वृ.

कोल्हापूर येथील महाराज:—हे महाराज गेल्या शनिवारच्या आगबोटींतून विलायतेस निघून गेले. बरोबर कापटन वेस्ट पोलिटिकल एजन्ट व मि. जमसेटजी डनजाला बी. ए. महाराजांचे शिक्षक, व आणखी सात आठ खासगी मंडळी आहे. यांचा इकडे इंग्लिश अभ्यास बराच झाला आहे. आणि विलायतेंत अनुभविक ज्ञानाची भरती मिळेल यांत संशय नाहीं.

मिशनरीचें जारकर्म रोमन क्याथोलिक मिशनरी हे अविवाहीत असतात. तेव्हां त्यांणीं जर एकादे वेळीं जारकर्म केलें तर अयोग्य तर खरेंच, पण लोकांस मनांत आणण्यास कांहीं सबब आहे. इतकेंही असून त्या मिशनरीच्या अपराधाबद्दल क्वचित खटला असेल. पण प्राटेस्टन्ट मिशनरींची गोष्ट तशी नाहीं त्यांस विवाह करण्यास मोकळीक आहे ते करतात आणि मोठमोठीं त्यांचीं कुटुंबें होतात. असें असून त्यांच्यांतून कांहीं असामीकडून आपल्या मनाचें संयमन होत नाहीं. याचें कारण मनुष्याचा साधारण स्वभाव होय. हल्लीं विलायतेंत लेडबरी येथील मि. नाकसन नामक पाद्री साहेबांनीं बायको असतां आपल्या संस्थानिकिणीशीं तिची मर्जी नसतां जारकर्म केलें. व त्या पासन तिला गर्भ राहिला. मुलगा झाला. आणि नंतर फिर्याद झाली. तेव्हां यांणीं त्या पाद्री साहेबास पांच वर्षें महकूब करण्याची शिक्षा दिली हें फार चांगलें केलें. याबद्दल प्रिव्ही कौन्सिल मध्यें अपील होणार आहे असें कळतें.

कराची कडील वर्तमान पत्रावरून कळतें कीं, तिकडे हल्लीं पाऊस पडल्यामुळें सिंध रेलवेस भारी नुकसान पोंचलें. किलेक पूल, कठडे वगैरे वाहून गेले. आणि कोट्रीस गाडी जाण्याचा प्रतिबंध झाला होता. पण रेलवे कामगारांच्या अतिशय मेहनतीनें सर्व यथास्थित झालें.

"गुजराथ मित्र" वरून कळतें कीं, सुरत म्युनिसिपालिटीनें जातीचीं जोणें हात असतां त्यावर हल्लीं कर बसविला आहे. हा कर चुकवण्यासाठीं जदुनाथजी महाराज यांणीं अशी तजवीज योजिली कीं, जोणेंच मुळीं करूं नयेत. आणि त्याप्रमाणें आपल्या अनुयायांमध्यें हुकूम फिरविला आहे.

ठकबाजी—मि. विनायकराव बाळकृष्ण, विनोबा व मि. कृष्णराव रघोबा यांणीं चांगला उमरावती कापूस म्हणून नेकरसन कंपनीजवळ आणि कंपनीस देऊन त्यावर कांहीं पैसा घेतला. पुढें तो माल विलायतेस पाठविल्यावर समजलें कीं, तो कापूस चांगला उमरावती नव्हे पण अगदीं नासका आहे यावरून त्या उभयतांवर कंपनीनें मुंबईच्या पोलीस कोर्टांत फिर्याद केली आहे.

गणेश बापूजी मलवणकर यांणी तारीख १७ एप्रिल सन १८७० इसवी रोजीं शंकराचार्य यांचे विद्व्हार्डी जी सभा झाली त्या सभेंत जें संभाषण केलें, त्यांत हें वर्तमानपत्र फार अप्रयोजक आहे, यांत सर्वथैव खोटा मजकूर असतो वगैरे अनेक प्रकारचीं विशेषणें देऊन फार निंदा केली होती. त्याबद्दल आम्हीं गणेशबापूजी यांजवर पिनलकोडचें कलम ४९९ व ५०४ प्रमाणें फिर्याद मे. डाकर फ्रेजर साहेब फुडपावर माजिस्ट्रेट जिल्हा पुणें यांजकडे केली आहे. तो कज्जा त्या कोर्टांतून काढून दुसरे कोडताकडे चौकशीस पाठविण्याविषयीं आरोपित गणोबा मजकूर यांणी मे. कालिफंट साहेब डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेट यांजकडे ता० २८ मे १८७० रोजीं अर्जी लोणवळें मुक्कामीं केली होती. पण योग्य सबब न दाखविल्यामुळें रद्द केला अर्ज रद्द झाला असें समजतें. या अर्जांत कारणें मोठीं चमत्कारिक लिहिलीं होतीं अशी समजतें. असो. आम्ही गणेश बापूजी यांस असें कळवितों कीं, आमचे फिर्यादीचा अमल मे. माजिस्ट्रेटानें फैसला करावा अशी आमची बिलकूल इच्छा नाहीं. आमची फिर्याद सर्वथैव खरी आहे सबब तिचा तपास कोणतेही अधिकाऱ्यानें केला तरी आम्हांस भीति नाहीं. खऱ्याचें खरें व खोट्याचें खोटेंच होतें. याचा अनुभव गणेश बापूजी यांस आल्यास फार दिवस झाले नाहीत. ज्ञा. प्र.

बाढ दिवसाचा दरबार—महाराणी क्वीन विक्टोरिया यांचा जन्म दिवस ता० २४ मे चा आहे. त्याबद्दल पुण्याचे एजंट साहेब यांणीं दरबार करून कांहीं शब्द संतोषाचे बोलून दाखविले. ते ऐकून लोकांस संतोष होऊन दरबार बरखास्त झाले. राणी साहेबांचा हा वाढदिवस ५१ वा आहे ही भाग्यवान महाराणी आज सुमारे ३१ वर्षें तक्तावर बसून झाली व संततीनें तर तीस नातू आणि पणतू पावली आहेत. या राणीचा दुसरा मुलगा हिंदुस्थानांत नुकताच येऊन परत स्वदेशीं गेला. त्यानें स्मरण तो राजपुत्र ज्या ज्या ठिकाणीं गेला तेथील लोकांस प्रत्यक्ष दर्शन झालें आहे. ज्ञा. प्र.

गोपाळराव हरी देशमुख—सुबोधपत्रांत असें लिहिलें आहे कीं, सदरील गृहस्थानें प्रायश्चित्त घेऊन पुनर्विवाह पक्ष सोडल्या गृहस्थांस कांहीं दिवस पर्यंत कुलीन लोकांनीं त्याचे कुटुंबाच मणसांकडून व त्यांच्या बहिणीकडून त्यांस इतका त्रास दिला कीं, कदाचित त्यांचे कटकट दूर करण्याकरितां त्यांणी प्रायश्चित घेण्याचें आरोप केलें नाहीं असें आमच्यानें म्हणवत नाहीं; परंतु ज्यांस विलक्षण विद्वान, उदार व न्यायी पुरुष ची योग्यता ठाऊक आहे ते, त्यांणीं खरोखर प्रायश्चित्त घेऊन पुनर्विवाहाचा पक्ष सोडला असें कधींही मानणार नाहींत. व असें म्हणणें हा काळ निषेधक पक्षाचा भ्रम आहे असें समजतील; कारण या गृहस्थानें वय प्रौढ सुमारें पन्नास वर्षांचें असून त्यांणीं आपलें सर्व आयुष्य शास्त्राचा शोध करण्यांत घालविलें आहे. आमच्या पहाण्यांत आज तीस वर्षें पर्यंत गोपाळराव हे पुनर्विवाहाचें प्रतिपादन करीत आले आहेत. आणि त्यांचे या विषयावरील सर्व लेख एकत्र केले तर त्याचा एक मोठा ग्रंथ होईल. आम्हीं पुण्यांतील वादविवादाचें व पंचाच्या मताचें पुस्तक छापलें आहे तें सर्व वाचून गोपाळरावजी यांणीं आम्हांस सुमारें आठ दिवसांपूर्वीं लिहून कळविलें आहे कीं, पुनर्विवाहाचा शास्त्रोक्त सिद्धता पूर्णपणें होऊन निषेधकाचें म्हणणें रास्त नाहीं. तर मग त्या विचारवान पुरुषाच्या चित्ताची शुद्धि कोणत्या पक्षाकडे झाली असेल हें उघडच दिसतें. कित्येकांचे म्हणण्यात येतें कीं, तुम्हीं जर आतां प्रायश्चित्त घ्याल तर आम्हीं पुढें तुमचा मुलगा विलायतेहून परत आल्यावर प्रायश्चित्तावांचून घेऊ, नाहींपेक्षां कधींही घेणार नाहीं. अशा लालूच व भीति त्यांस स्वामीच्या नांवानें देण्यांत आली आहे असें ऐकतों. बोलणार जर याप्रमाणें करतील तर त्यापासून आम्हांस मोठा आनंद आहे. दुष्ट लोकांनीं पाहिजे तशा नऱ्हा केल्या तथापि त्यांचें व आमचें स्नेहांत व मनांत एक क्षणभरही अंतर पडणार नाहीं.

गोऱ्या लोकांचीं गोरीं कृत्यें— विलियम केली वा नांवाच्या गोऱ्यानें पोलीस कमिशनराचा हातांतील एक बूट चोरला सबब त्यास गिरगांव पोलिस माजिस्ट्रेटानें एक महिन्याच्या कैदेची शिक्षा दिली.

तुतऱ्या एकया प्रसिद्ध आलेक्झांडर कामरन या नांवाच्या गोऱ्या चोरानें एक कोट व एक आणा चोरल्याबद्दल त्यांस मि० नानाभोरोजी माजिस्ट्रेट यांनीं सहा महिन्यांची सक्त मजुरीची ठेप दिली.

गेल्या एप्रिल महिन्यांत मुंबई बंदराहून परदेशास अजमासें ७७,१४६ खंडी किंमत रु० २,३२,१५० चा कापूस रवाना झाला असें सरकारी ग्याजेटवरून कळतें.

## जाहिरती.

### विचित्रपुरी

नवीन मनोरंजक पुस्तक.

सर्व लोकांस विनयपूर्वक कळविण्यांत येतें कीं, आम्हीं नव लिहिलेलें मनोरंजक पुस्तक मुंबईं येथें गणपत कृष्णाजी यांचे छापखान्यांत सुंदर टाइप छापाचे छापण्यास आरंभ केला आहे हें पुस्तक इंग्लिश भाषेंतील मनोरंजक पुस्तकें (नावेल्स) याच्या धाटणीवर केलें आहे. याचीं मराठी साहाव्या पुस्तकाच्या साच्याचीं सुमारें ३०० पृष्ठें होतील; म्हणजे मुक्तमाला वगैरे पुस्तकांच्या दुप्पट एवढें होईल.

या मध्यें पूर्वींच्या लोकांच्या वेड्या समजुती, मद्यादि व्यापार यागा, धर्मभोळेपणा, दानोर्ट्याचें वर्णन केलें आहे; व लहानपणीं लग्नकेल्याचे परिणाम. स्त्रीशिक्षणाची आवश्यकता, आणि पुनर्विवाहाची जरूरी स्पष्टरीतीनें दाखविली आहे. दुष्ट, आळशी, चोर, छिनाल, आणि ठक, यांचीं चरित्रें यांत आणिलीं आहेत; व मंत्र जादू भूतें हीं खोटीं ठरविलीं आहेत. आंगांत आणणें, जंगातिषें, कावडे, झडपी, मांत्रिकी हे लोकांत कसें फसवितात हे यांत वर्णिलें आहे.; व कुकर्म, दुर्व्यसनें, वगैरे मनुष्याचे परिणाम दाखविले आहेत. भूतें, संबंध ब्रह्मराक्षस, यांच विषयींची कल्पना यांत फारच चमत्कारिक रीतीनें उडविली आहे, व सुधारणा कशी करावी आणि कशा अडचणी येतात याचें विवेचन केलें आहे. या शिवाय स्त्रीपुरुषांची अत्यंत प्रीती, मित्रांचे खरोखर परस्पर प्रेम, उदार आणि परोपकारी लोकांची सत्कीर्ति, आणि पापभीरु लोकांची सत्यनिष्ठा, यांचें ही निरूपणांत केलें आहे. सारांश इंग्लिश वगैरे भाषांचा अभ्यास करून पदव्या मिळविलेल्या नवीन लोकांचीं मनें कशीं होतात हा यांतमुख्य विषय आहे; शृंगार, वीर, करुणा, इत्यादि नऊ रस उत्तम करून एकाच गोष्टींत हे सर्व विषय प्रसंगानुसार आणिले आहेत. अतिशय चित्तवेधक स्थळीं सुंदर चित्रें घालून उत्तम देखावे दाखविले आहेत.

हें पुस्तक पुढील महिन्याचे अखेरीस विक्रीकरितां तयार होईल. याची आगाऊ किंमत जुलैमहिन्याचे आंत पाठविल्यास १॥ दीड रुपया ठेविली आहे व मागाहून १॥। पावणे दोन रुपये पडतील. ज्यास हें पुस्तक घेणें असेल त्यांणीं डांक व बंगी खर्च याबद्दल दोन आण्यास रोख पैसा अगर एक आणा वर्तळासुद्धां तिकिटा मुंबई येथें गणपतकृष्णाजी यांच्या छापखान्यांत अगर खालीं सही करणाराकडे पाठविल्यास पुस्तकें रवाना केलीं जातील. नाट पेड पत्र पाठवूं नये. कळावें तारीख ३ जून सन १८७० इसवी

केशवलक्ष्मण जोरेकर. इंग्लिश टीचर इ. म. स्कूल अकोला वऱ्हाड

## नोटिसा

नोटिस गुणाजी वल्द महादाजी रासकुये रहाणार मौजे घुईखेड तालुके तळेगांव जिल्हा वणी यांशीं गहिनी मर्द गुणाजी रासकुये हल्लीं वस्ती जळम तालुके बाळापूर इजकडून नोटिस देण्यांत येते कीं तूं माझा लग्नाचा नवरा असून तुझ्याशीं लग्न होऊन सुमारें सोळा वर्षें झालीं लग्न झाल्यावर तुम्हीं मला कधीं नेले नाहीं, पण माझे बापभावांनीं मला तुमचे घरीं आणून दोनवेळ घातली पहिल्यानें दीड वर्ष होते त्यावर पुन्हा नेऊन घातली ते व्हां दोन वर्षें होते परंतु अलीकडेस तीन वर्षें झालीं मला तुम्हीं नेऊन वागवीत नाहीं माझे संसार सुखाचे दिवस अगदी फुकट गेले व आजपर्यंत मी आपला नवरीं देह जाळून भावाचें घरीं दिवस काढले आणि तुम्हीं न्याल अशी आज पर्यंत वाट पाहिली परंतु तुम्हीं दुसरी पटाची बायको केलीस म्हणून ऐकिलें, तर आतां माय व्यवस्था करावी या विषयीं कांहींच खुलासा नाहीं याजकरितां ही नोटिस देण्यांत आली आहे तरी ह्या नोटिशीचे तारखेपासून तीस दिवसांत आंत मजला आपले घरीं नेऊन नांदवावी मी येऊन रहाण्यास कबूल आहें आणि मी आपल्या भावाचे घरीं आज तीन वर्षें राहिलें त्याबद्दल खाण्याचा खर्च दरमहा पांच रुपयेप्रमाणें एकंदर रुपये १८० आणून देऊन मजला घेऊन जावें, जर न न्याल तर मी सदरीं लिहिलेले मुदती नंतर तुमची वाट न पहातां पाटाचा नवरा करीन मग तुमचा माझ्यावर हक्क बिलकूल चालणार नाहीं हें खचित समजावें, असें करण्यांत मी कधीं चुकणार नाहीं, ह्या नोटिशीचा जबाब सदरीं लिहिले मुदतींत पाठवावा कळावें तारीख ३१ माहे मे सन १८७० इसवी.

(सही) गहिनी मर्द गुणाजी इचे हातची निशाणी असे.

नोटिस. शामजी वल्द जानजी बाळापुरे राहणार मौजे सांडशाची पळशी तालुके बाळापूर यांशीं मंजायी मर्द शामजी वस्ती जळम इजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तू माझा लग्नाचा नवरा असून लग्न झाल्या दिवसापासून माझें तीन वर्षें पावेतों रितीनें पाळण पोषण केलें, पुढें बारा वर्षें रितीनें पाळण केलें नाहीं व बरोबर रितीनें मला वागविलें नाहीं आंत आज तीन वर्षें तर बिलकूल मला तूं वागविलें नाहींस आणि माझे आई बाप वगैरे कोणी नाहीं. माझी मावशी मजें पोषण करीत आहे यास्तव ही नोटिस तुम्हांस देण्यांत येते आहे तरी या नोटिशीचे तारखेपासून पंधरा दिवसांचे आंत मजला नेण्याची तजवीज करावी अगर नेत नाहीं म्हणून सदर मुदतींत जबाब द्यावा, माझी जवानी व्यर्थ जाते आतां माझ्यानें आगदीं जवानी जाळून रहावत नाहीं, तीन वर्षें मी मावशीचे घरीं काढलीं त्याचा खाण्याचा खर्च दरमाहा साहा रुपयेप्रमाणें २२५ रुपये देऊन मजला आपले घरीं नेऊन वागविण्याची तजवीज कराल तर बरें आहे नाहींपेक्षां मी तुमची वाट न पाहतां लिहिलेले मुदती बाहेर पाटाचा नवरा करीन मग तुमचा माझेवर हक्क रहाणार नाहीं हें समजावें तारीख १ जून सन १८७०

(सही) मंजाई मर्द शामजी बाळापुरे वस्ती जळम निशाणी खुद्द हातची

नोटिस सदू वल्द जानजी नागोलकार रहाणार मौजे जाफराबाद तालुका जळगांव यास खालीं सही करणार इज कडून देण्यांत येते ऐशीजे तूं माझा लग्नाचा नवरा असून मजला नांदवीत नाहीं सबब चार लोकांसमक्ष पंचाइत होऊन तूं मजला फारखत लिहून दिलें. त्याजवर सही साक्षीही झाल्या असून तुझे बापानें तें घेऊन फाडून टाकलें. व मजलाही नांदविण्यास घेऊन गेला नाहींस यास्तव या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं, आज पासून दहा दिवसांत तूं पूर्वीं लिहून दिल्याप्रमाणें फारकती द्यावी. किंवा मजला नांदविण्यास घेऊन जावें. दोहोंतून कोणतें एक तूं न करशील तर तुजला माझी जरूर नाहीं व मी पाट लावल्यास त्यास तुझी मनाई नाहीं असें समजून मी तुझे फारकतीची जरूर न ठेवितां पाट लावीन कळावें ता० ३ जून १८७० ई०

(सही) तानकी मर्द सदू नागोलकार इचे हातची आंगठी

नोटिस सूर्यभानजी वल्द रामभानजी पाटील रहाणार गाऊखेडें तालुके अकोट यांस खालीं सही करणार याजकडून तुम्हांकडे आमची खातें बाकी ६ पंच आहेत तर ते नोटिस पावल्या पासून चार दिवसांनें खर्च सुद्धां आणून द्यावे कळावें ता० ३० माहे मे सन १८७० ई०

(सही) चौथमल शिवनाथ साहू दु० आकोली ता० अकोट

ता तर

नोटिस रुकमण बल्लद सटवा धावण व भिवा बल्लद गोविंदा धावणे व साकुबल्लद गिन्यान देव धावणें व सटवा बल्लद पुंनांजी कारडे साळी मेहतर साकिन पठ देऊळगांवराजा यांस खालीं सही करणार इजकडून देण्यांत येतें कीं माझा नवरा आनाजी बल्लद गिन्यान देव धावणे साळी याजमध्यें पुरुषत्व नसून तो मजशीं जन रितिप्रमाणें संसार न करितां जालन्यास जाऊन राहिला आहे हें तुम्हांस विदितच आहे व म्हाण येऊन सात वर्षें झालीं असून त्याच्या न नेण्यानें माझें जिणें व्यर्थ होत आहे हें तुम्हीं पहातच आहां यास्तव त्यास याच आजच्या तारखेच्या वर्तमानपत्रांत नोटिस दिली आहे. तिजकडे लक्ष द्यावें व मज अनाथाचें आयुष्य सुखांत जाईल असें करावें. नवऱ्यास दिलेल्या नोटीशींत लिहिल्याप्रमाणें त्यानें न केल्यास मी पाटाचा दुसरा नवरा करीन आणि असें करण्यांत कांहीं बाध असल्यास आपण नोटीस पावल्याचे तारखे पासून आठदिवसांचे आंत मला हरकत कळवावी व मला योग्य मार्ग दाखवावा असें न केल्यास आपला व जातीचा मजवर कोणत्याही प्रकारें दोष लागत नाहीं असें समजून मी पाटचा दुसरा नवरा करीन आणि तसें केल्यावर आपली व जातीची मी कोणत्याही प्रकारें गुन्हेगार होणार नाहीं कळावें.

(सही) निशाणीची बांगडी भिवराबाई मर्द आनाजी बल्लद गिन्यान देव धावणे साळी इच्या हातची असे.

नोटिस—रावजी बल्लद लक्षुमणजी जैन शिंपी राहणार बडनेर गंगाई तालुके दर्यापूर यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, तुझें जागा सुद्धा आम्हांस दिलेस व त्याजबद्दल स्टांपाचा दस्तऐवज आम्हाजवळ आहे असें असतां परंतु त्या धावण्यावर आणीक वारसदार आहे विशीं तक्रार तर ती आम्ही ऐकत नाहीं नोटिस पावल्या पासून च्यार दिवसांत लिहून दिल्याप्रमाणें घर जागा सुद्धां स्वाधीन करून देणें व नोटिशीचा जाब द्यावा नाहीं तुजला फार हयराण केलें जाईल कळावें तारीख ३० माहे मे १८७०

[सही] चौथमल्ल शिवनाथ साहू दु० अकोली ता० अकोट.

नोटिस कसीराय सोळादनकार रहाणार अकोली तालुक अकोट यास खाली सही करणार याजकडून तुजकडे खाते बाकी बद्दल रुपये येणें आहेत तर ते नोटिस पावल्या पासून आठ दिवसांत नोटिशीचे खर्चा सुद्धां द्यावे कळावे तारिख ३० माहे मे सन १८७० इ०

(सही) चौथ मल्ल शिवनाथ साहू दु० अकोली.

नोटिस जना रावजी बल्लद खुशाल राव देशमुख राहणार गुळखड ता० अकोट यांस खाली सही करणार यांजकडून तुजकडे आमचें खातेबाकी बद्दल रुपये येणें आहेत तर च्यार दिवसांत नोटिशीचे खर्चसुद्धां आणून द्यावे कळावें ता- रीख ३० माहे मे सन १८७० इ०.

(सही) चौथमल्ल शिवनाथ दुकान अकोली.

नोटिस आनाजी बल्लद गिन्यानदेव धावणेसाळी साकिन पेठ देऊळगांव राजा हल्लीं वस्ती जालनापुर यांस खालीं सही करणार इजकडून देण्यांत येते, कीं, माझे बापानें तुजशीं माझे अज्ञानपणांत पांचवे वर्षीं लग्न करून दिलें त्यास हल्लीं चौदा वर्षें झालीं इतक्या काळांतां मला तुझे घरीं तुझे मामानें ऋतु प्राप्त होण्याचेपूर्वीं चार महिनें नेलें होतें त्याचार महिन्यांत माझे अन्नवस्त्राविना हाल होऊं लागले असें पाहून माझे बापानें मला माहेरी आणिलें मला ऋतु प्राप्तझाल्यावर माझे बापानें तू मला घेऊन जाऊन संसार करण्याविषयीं तुला बहुत वेळां कळविलें परंतु मला नेऊन तूं आजपर्यंत मजशीं संसार केला नाहीस. गुदस्त सालचे चैत्र मासीं तूं देऊळ गांव कामीं असतां जातीवाल्यांस व माझे बापास स्टयांपाचे कागदावर एक व साधे कागदावर एक असे दोन कारनामे लिहून दिले होतेस कीं मीं आजपासून रोजगार करून माझ्या बायकोशीं संसार करीन व देऊळ गांवींच राहीन आणि असें न करितां जालन्यास मीं निघून गेलोतर माझे बायकोची मनास येईल तशी व्यवस्था करण्यास तिचा बाप मुखत्यार आहे असें लिहून दिलें असतां तूं येथें न रहातां व मजशीं संसार न करितां लागलाच जालन्यास निघून गेलास याकारितां व तुजमध्यें स्त्रियांशीं संसार करण्याचें बीज जें पुरुषत्वतें तुजमध्यें बिलकूल नाहीं असें लोकांत प्रासिद्ध आहे यावरून तसेंच संसार सुखोपभोग घेण्याचा जो तारुण पणाचा काळ तो माझा व्यर्थ जातआहे यावरून व नवऱ्यावाचून स्त्रियांचें जिणें व्यर्थ असें समजून ही नोटिस तुला दिली आहे. तरी ही नोटिस पावल्याचें तारखे पासून दहा दिवसाचें आंत तुजमध्यें पुरुषत्व आहे याविषयीं व मजशीं जन रिति प्रमाणें संसार करीन याविषयीं माझे बापची व जातिच्या पंचाची खात्री करून देऊन माझे बापास मजकारितां चौदावर्षांत अन्नवस्त्राबद्दल दरमाहा तीन रुपयेप्रमाणें पांचशे च्यार रुपये खर्च जाला ते त्यास देऊन मला घेऊन जावें मुदतीच्या आंत सदरहुप्रमाणें न केल्यास तुझे स्तब्ध बसणें फारकती दाखल समजून मी मुदत संपल्यावर लागलीच पाटाचा दुसरा नवरा करीन मग मजवर तुझा लग्न संबंधी कोणताच हक्क रहाणार नाहीं हें खूप समजावे कळावें.

(सही) निशाणीची बांगडी भीवराबाइ मर्द आनाजी बल्लद गिन्यानदेव धावणे साळी इच्य हातची असे.

नोटिस—झांगा ठाकर राहणार अकोली तालुके अकोट यास खालीं सही करणार यांजकडून तुजकडे आमचे खातेबाकी बद्दल रुपये येणें आहेत ते च्यार दिवसांत नोटिशीचे खर्चसुधां उलगडा करून स्वावा कळावें ता० ३० माहे मे सन १८७० इ.

(सही) चौथमल शिवनाथ साहू दु० अकोली.

नोटिस—रा० परशराम बल्लद नवलाजी घोगरे रहाणार भरतपूर तालुके बाळापूर जि० अकोले यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते आहे कीं, तुमचेकडे आमचे खातेबाकी बद्दल रुपये येणें आहे ते आम्ही दोन च्यार वेळां तगादा केला परंतु आपण तें मनांत न आणता देऊं दिलाऊं असा जबाब आपल्याकडून मिळाला तर ही नोटिस पावल्यापासून १९ दिवसांत आमच्या रुपयांचा फडशा करून द्यावा न दिल्यास ज्या रितीनें आमच्यानें घेववेल त्या रितीनें आम्हीं घेऊं हें समजून वर्तणूक करावी कळावें तारीख ३० माहे मे सन १८७० इ.

(सही) हिरामल बलदेव तिव्हारी दु० गोरेगांव ता० अकोले.

## गोपीचंद नाटक.

या नावाचें हिंदुस्थानी भाषेंत व बाळबोध लिपींत एक नवीन पुस्तक सोलापुरास रा. रा. अण्णाजी गोविंद इनामदार यांनीं तयार करून आपले कल्पतरु छापखान्यांत छापिलें आहे व त्याच्या प्रती आमचे वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आल्या आहेत. याची किंमत ८।२ बारा आणे व डाकहशील एक आणा आहे. पुस्तक नाटकाचें असून चांगलें सुरस आहे.

## फौजदारी काम चालविण्याविषयीं कायदा सटीक.

हें नव्या क्रिमिनल प्रोसिजर (सन १८६९ च्या ८ वे) कायद्याचे माठें पुस्तक टीकेसुद्धां व त्यावरील हायकोर्टाचीं सर्क्युलरें, ठराव, व इतर ग्रंथकारांचे अभिप्राय यांसुद्धा रा. रा. नारायण बाळकृष्ण चितळे ऊर्फ रावजी भाजेकर ठाण्याचे वकील यांनीं तयार करून ज्ञानप्रकाश छापखान्यात छापिलें, त्याच्या प्रती आमचे वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आल्या आहेत. हें पुस्तक संग्रह करण्या लायक आहे. याची किंमत ७ रुपये व डाकहशील ७ आणे पडतें.

## कवितासारामृत
अथवा
महाराष्ट्र भाषेच्या कवितांतील वेंचे.

सर्वांस विनयपूर्वक कळविण्यांत येतें कीं वरील नांवाचा ग्रंथ आम्हीं तयार करून अकोलें येथें वऱ्हाड समाचार छापखान्यांत सुंदर टाइपांवर छापवीत आहो. सदहु ग्रंथांत वामन पंडित, मोरोपंत अनंत कवी आदिकरून कवींच्या कविता फारच सुरस, व मनाल्हादक अशा आहेत. तर सर्वत्र देशबांधवांनीं यास उदार आश्रय द्यावा. हा ग्रंथ घेणारास सुलभ पडावा म्हणून याची किंमत फारच थोडी ठेविली जो आगाऊ जूनमहिन्याचे आंत देणारास ८।२, फक्त सही देणारास ८।४ आणे, आणि मागाहून ग्रंथ तयार झाल्यावर देणारास १ रुपया पडेल याशिवाय टपाल खर्चाबद्दल दोन आणे पडतील. याप्रमाणें किंमत ठेविली आहे. तिकिटें पाठविणारांनीं अर्धआणे दराचीं वर्तोळ्यासह पाठवावीं. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं. सदहू ग्रंथ रा. रा. शोवचद बलदेवभाई मारवाडी दुकान भडगांव यांजकडे मागितला असतां मिळेल तारीख २० माहे एप्रिल सन १८७०

(सही) श्रीधर नारायण भडगांवकर जिल्हा खानदेश.

# जाहिरात.

केरोपंतांचीं पंचांगें या सालचीं ज० ग० छा० त छापलेलीं आम्हांकडे विक्रीस ठीं आलीं आहेत. किंमत दर प्रतीस ८३ आणे.

| किमतीचे ठराव. | रु. | आ |
|---|---|---|
| वर्षाची अगाऊ देणारास... | ...६ | ० |
| साल अखेर ... ... | ...७ | ० |
| सहा महिन्याची अगाऊ ... | ..३ | ८ |
| एक अंकास ... ... | | ९ |
| फुटकळ ... ... | .. ० | ४ |

या शहरा बाहेरील लोकांस वर्षाचे ९२ आठवड्यांबद्दल टपाल खर्च अगाऊ पडेल तो १ रु. ४ आणे व सालअखेर १ रु० ८ आणे.

☞ आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरु तारखेपासून २ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही त्यांचा मागील हिशेब सरून नवें साल चालू होईल तेथून २ महिन्यांची मुदत समजावी.

नोटिसा वगैरे छापण्याचे दर.

१० ओळी पर्यंत ... ... ... १ रुपया
१० ओळींवर प्रत्येक ओळीस ०।८६
इंग्लिश नोटिसीचे दर ओळीस ८८

एकच मजकूर वारंवार छापणें असल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

TO OUR SUBSCRIBERS.

We beg to request that our Subscribers will forward as soon as possible there subscriptions for the present year; and trust that they will be so good as to pay up all arrears without delay.

*Proprietors of Berar Samachar*

सूचना—नोटिसा व इतर मजकूर छापावयास पाठविणारांनीं ते बालबोध लिहिल्यास फार चांगलें. निदान मनुष्यांचीं व गावांचीं नावें तरी बालबोध असावीं. तसें नसून नोटिसांचे वगैरे कामीं नावागावांची चूक झाल्यास त्याची जबाबदारी आम्हांवर नाहीं.

एडिटर व० स०

# वर्गणीदारांस विनंती.

सन १८६७ चे अक्टोबर महिन्यांत आम्ही अकोल्यास वऱ्हाडसमाचारपत्र सुरु केलें त्यास अडीच वर्षें होऊन गेलीं तर अजून वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व हिला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं-

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्र घेण्याचें बंदकरून ज्या लोकांनीं त्याजबद्दलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दररुपयास अर्ध आणा प्रमाणें त्यांस व्याज द्यावें लागेल. ता १ माहे आक्टोबर सन १८६८

वऱ्हाडसमाचाराचे मालक

हें पत्र आकोळा येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकां करितां छा. म. केळे

# वऱ्हाडसमाचार.

**THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.**

VOL. 5 AKOLA :—SATURDAY EVENING, JUNE 11. 1870 NO. 20

पुस्तक ५. अकोला शनिवार सायंकाळ, तारीख ११ माहे जून सन १८७० इ०. अंक २०


## पुनर्विवाहसंबंधाची गडबड.

हल्लीं आमचे देशांत धर्माच्या बाबदींत मोठा गोंधळ होऊन गेला आहे व तो मिटून सुखकारक परिणाम कसा लवकर येईल याची मोठी काळजी लागली आहे. पुनर्विवाहास अनुकूल गोष्टी आज बीस वर्षे वर्तमानपत्रांतून आल्या, याच विषयावर दहा बारा पुस्तकें झालीं, सभांतून चर्चा झाल्या; पण तेव्हां निषेधक पक्षाकडून एक चकार शब्दही कधीं निघाला नाहीं, आणि गुदस्त सालीं वेणू बाईचा पुनर्विवाह झाल्याबरोबर निषेधक पक्षास चेतना आली व त्याबरोबर धर्मसभा, बहिष्कार, व शास्त्री भिक्षुक आणि समस्त ग्रामस्थ यांस सर्क्युलर पत्रें यांची टंकसाळ निघाली. अशी मोठी गर्दी निषेधक पक्षाकडे होऊन गेली या वरून तो पक्ष जरा प्रबल दिसला. इतक्याच सुमारास उत्तेजक पक्षानेंही पोकळ बहिष्कार न मानण्याची व त्याविरुध्ध शेकडो सह्यांच्या याद्दी छापून प्रसिध्ध करण्याची गर्दी उडविली. असे दोहो पक्षाचें तुमुल युध्ध पाहून कोल्हापुर व संकेश्वर मठाची संस्थान देवता म्हणजे श्रीमज्जगद्गुरु शंकराचार्य यांनीं या वादाची पंचाईत करून पुण्यास येऊन पुनर्विवाह सर्वथा अशास्त्र असा निर्णय दिला व पुनर्विवाहित आणि त्याचे संसर्गी यांस बहिष्कृत केलें. चमत्कार हा कीं नानाभिडे यांचा पुनर्विवाह होऊन कित्येक वर्षें झालीं पण त्यांच्या संसर्गी लोकांचें आजवर बहिष्कारांत नाव नाहीं. व नानाच्या बहिष्काराचा ठराव तरी वेणूबाईच्या ठरावांत होतो. म्हणजे, नानांनीं पुनर्विवाह केला, पुढें तीही बायको मेली, आणि त्याचा संबंध तुटला, असें असतां स्वामीनीं आतां शिळ्या कढीस ऊत आणिला. याप्रमाणें निषेधक पक्षाकडून पुन्हा गडबड झाली. नंतर उत्तेजक पक्षानें कायद्याचा प्रयोग चालविण्याचें सुरू केलें. गेल्या आठवड्यांत ज्ञानप्रकाशानें गणेश शास्त्री यांजवर अब्रूची फिर्याद केली त्या प्रकरणांत आमची साक्ष होती म्हणून आम्ही पुण्यास गेलों होतों तेव्हां जिकडे पहावें तिकडे पुनर्विवाह, बहिष्कार, प्रायश्चित्त, व फौजदारी खटले यांची चर्चा चाललेली दिसली. धर्मनियंतच्या अधिकारानें विभूषित शंकराचार्य महाराजांची स्वारी तर चक्रव्यूहांत पडल्याप्रमाणें फौजदारी कोर्टाच्या समानांनीं वरचेवर अडकली जाऊन तेथें भ्रमत आहे, व त्यांच्या विद्या शून्यत्वाची, आणि शास्त्रनिर्णयाची चिकित्सा चालली आहे असें दिसलें. धर्मप्रमुखांचेच असें मग इतरांचें काय पहावयाचें आहे! गणेशशास्त्री बुवा मालवणकर ज्यास आमचे प्रिय बंधु ज्ञानप्रकाशकर्ते "ग" म्हणतात व गचीश्रीस बाधा झाल्यामुळें तो फार घांटा कपांत आली म्हणतात ते गणेशशास्त्री तर क्षमा मागून माफी मिळविण्याकरितां दांतांत तृण धरून पुनर्विवाहोत्तेजक मंडळीच्या दारोदार जोडे फाडताहेत, असें पाहिलें. ही इकडची गडबड झाली. दुसरी कडची गोपाळराव हरी देशमुखासारखीं धेंडें प्रायश्चित्त घेताहेत, व शंकराचार्यांकडे दंड भरताहेत, कृष्ण शास्त्री चिपळुणकरासारखे क्षौर करून अंगवस्त्र झाडताहेत, व मोरोपंत छत्र्यासारखे स्वामीस नमस्कार घालून चुकलें म्हणताहेत व तोंडांत मारून घेताहेत. महादेव गोविंद रानडे कोल्हापुरास प्रायश्चित्त घेण्यास गेले व श्रीकृष्ण शास्त्रीही पुढें मागें प्रायश्चित्त घेणार अशा वार्ता येताहेत. हें आम्हीं तथेंच ऐकिलें. अशा प्रसंगीं पुनर्विवाहाच्या दुर्दशेची कल्पना लोक किती करितील बरें! आमच्या जुन्या लोकांस एवढासा पर मिळाला कीं त्याचा त्यानीं कावळा बनविलाच, त्याप्रमाणें ते बालू लागले कीं पुनर्विवाह पक्ष मोडला, त्याचें नेबूद झालें, व सातां पैकीं राहिलेल्या लोकांच्याही मिशावर आतां संक्रांत आलीच. शाबास! जगद्गुरु शंकराचार्य शाबास! भला खासा निर्णय दिला, व पुनर्विवाहाचें बंड मोडलें! भले गणेश शास्त्रे भले! खूप केलें! काय तुमच्या उद्योगाचा प्रताप व व्याख्यानाचा प्रभाव कीं सर्व उत्तेजक पक्ष जागच्या जागीं थिजून गेला! वा:! नारायणाचार्य, वा:! तुम्हीं गजेंद्र गडवालेच! किंवा तुमच्या दुसऱ्या गवर एक शून्य चढावें इतकी तुमची योग्यता खरी! म्हणजे गजेंद्रगड आहे तें गजेंद्रगड करावें म्हणजे इंद्राच्या ऐरावताचे गंडस्थळावर बसून भिरवावें अशा सारखा तुम्ही वादांत जय मिळविला! तुम्ही धन्य आहात! तुम्ही पट्टीत वाघ आहांत, तुम्ही भल्या नारबाराहात उड्या मारून अजाच्या बोकांड्या धरल्यात! शाबास, शाबास! अशा प्रकारच्या गप्पा जेव्हां निषेधक पक्षांत पुण्यांतील गटार यंत्रावर व इतर ठिकाणीं निघूं लागल्या तेव्हांची बहार काय विचाराची! त्यांच्या आवेशास तशा प्रसंगीं आकाशही ठेंगणेंच होतें. इतक्यांत दुसऱ्या पक्षीं आम्हीं शोध केला तों समजलें कीं त्याच्याही मंडळीचे वृध्धी आहे. सातांतून एक दान गळताहेत तों नवे पन्नास तयार होताहेत व तेही पुनर्विवाहिताशीं उघडपणें अन्नव्यवहारास तयार अशा सह्या [illegible] छापून प्रसिध्ध होण्यास उत्सुक असे तरुण विद्वान आहेत व रावबहादुर हरदीकरासारखे उद्योगी व श्रीमान गृहस्थ नीं गोपाळराव हरीची जागा पतकरिली. मंडळीच्या कामाकरितां आपला नवा वाडा दिला, शेकडो रुपये दिले, व कायावाचामनें करून या सत्कृत्यास झटण्याचें चालविलें आहे हें पाहून आम्हांस फार संतोष झाला. आम्हीं या तरुण व सुशील गृहस्थाची तारिफ करितों व त्यांस दीर्घायु आणि यश इच्छितों

साराश, याप्रमाणें दोन्ही पक्षाची गडबड चालली आहे, आतां निषेधक पक्षाची संख्या फार भारी आहे हें खरें तरी ती जुन्या नेटिव पध्धतीची म्हणजे बायबार होय. आणि उत्तेजक पक्षाची संख्या थोडीच आहे तरी ती नव्या पध्धतीची म्हणजे इंग्लिश दारू प्रमाणें जहाल व निश्चयात्मक होय. आणि कालांतरें करून जुन्यांची संख्या संपणार व स्कुलें, हायस्कुलें, आणि कालेजें यांतून जो भरणा तयार व्हावयाचा तो नव्या पध्धतीचा म्हणजे बहुधा उत्तेजक पक्षाकडील व्हावयाचा. तेव्हां त्या पक्षास आज थोडा आहे तरी पुढें पुष्कळ जय येईल.

## गणेश शास्त्री मालवणकर.

वारंवार या गृहस्थाविषयीं लिहिण्याचा प्रसंग येतो, हा त्याच्या अवतारकृत्याकरितां आहे त्यास उपाय नाहीं; तीं सर्वही म्हणतें देव संतापवावेच. यांनीं आपल्या कृत्याचा संपर्क आम्हांस पुण्याचा हेलपाटा पडण्यापर्यंत आणिला, म्हणजे व्याख्यानांत ज्ञानप्रकाशाची निंदा केली व त्या मुकदम्यांत ज्ञा. प्र. नीं आमची साक्ष दिली. कारण यांच्या व्याख्यानाचे रिपोर्टर त्या प्रसंगीं आम्ही होतों व तें आमच्या वर्तमानपत्रांत आम्ही छापिलें होतें. बरें आमच्या अवतारी बुवास फिर्यादीचा प्रतिपक्ष चालविण्याचें सामर्थ्य नव्हतें, व ज्ञानमठांतील वस्त्रें मिळण्याच्या पाळीची भीति होती तर प्रथमच क्षमा कां मागितली नाहीं? पण तसें झालें असतें तर आम्हांस हेलपाटा कां पडता? व त्यांच्या कृत्यास अवतारी कृत्य कां म्हणावें लागतें? असो, यांनीं क्षमा मागितली आहे ती अक्षरशः अशी:—

मेहेरबान डाक्तर फ्रेझर साहेब फु. मा. जिल्हा पुणें.

अर्ज गणेश बापूजी मालवणकर आरोपी. कारणें अर्ज करितो कीं, रा. रा. कृष्णाजी त्रिंबक रानडे ज्ञानप्रकाशाचे मालक यांनीं मजवर फिर्याद केली आहे त्या बाबतींत कळवितो कीं, मी ता॰ १७ एप्रिल सन १८७० रोजीं श्री जगद्गुरु शंकराचार्य स्वामी यांचे मठांत पुणे मुक्कामीं पुनर्विवाहाच्या निर्णयाचा ठराव सांगण्याकरितां सभा जमली होती त्या ठिकाणीं मी जें भाषण केलें त्यांत ज्ञानप्रकाश हें पत्र फार अप्रयोजक आहे. यांत सर्वथैव खोटा मजकूर असतो. यांत गुरूची निंदा, धर्माची निंदा असते वगैरे निराधार निंदास्पद भाषण बोललों. त्याबद्दल हल्लीं मला फार अनुताप झाला आहे सबब मी सदहू कृष्णाजी त्रिंबक यांची व सदरील वर्तमानपत्राचे मालकांत व एडिटर यांचे संबंधानें व इतर कोणतेही संबंधानें या पत्राशीं ज्यांचा ज्यांचा संबंध असेल त्यांची मी विनयपूर्वक माफी मागतों. ती सर्वांनीं मजवर कृपा करून द्यावी व कोर्टानेंही माफ करावें.

तारीख ३ जून सन १८७० इसवी.

गणेश बापूजी शास्त्री मालवणकर द. खु.

सदर्हू प्रमाणें माफी देण्यास आम्ही कबूल आहों.

नारायण बाळकृष्ण फिर्यादी तर्फे वकील

शास्त्री बावांस आपले हातां या पुनर्विवाह प्रकरणांत हें दुसऱ्यानें आरोपी म्हणून व्हावें लागलें व आणखी किती वेळा व्हावें लागेल कोण जाणें! आरोपी हा शब्द थोरास मोठा अपमानदायक आहे व तो शास्त्री म्हणविणारास त्यांचे प्रतापानें लागत आहे या विषयीं विचार केला असतां त्यांस वाईट वाटावें. दुसरें, त्या माफींत लिहिलें आहे कीं, या व्याख्यानांत निंदास्पद भाषण मी केवळ निराधार बोललों. काय हें धाडस व शिरजोरपणा! शास्त्री बुवा निराधार वाग्बाण बोलले पण तेंच त्यांचें बोलणें वाकिलांत साहेबांस कैदेची शिक्षा देण्यास आधार झालें. याजकरितां या पुढें तरी गणेश शास्त्र्यांनीं असें निराधार बकत जाऊं नये बोलतांनां उभें राहण्यास जसा मोठ्या व उंच टेबलाचा आधार यानीं घेतला होता तसा भाषणास कांहीं पुराव्याचा आधार घेते तर आज माफी करिता शत्रूजवळ दांत विचकण्याची व नाक घासण्याची पाळी त्यांवर न येती. आम्हीं असेंही ऐकिलें कीं या खटपटीकडे गुंतल्यानें त्यांची रेलवे कडील चाकरी गेली. व ही ज्ञा. प्र. नें आणलेली फिर्याद चालविण्याचा त्यांचा इरादा होता, पण खर्चास दामाशीपंत पाहिजेत त्याकरितां पुण्यास स्वामीकडे व मुंबईस त्यांच्या साच्छिष्याकडे बहुत याचना केली पण कांहीं लगा साधला नाहीं. म्हण आहे कीं "तुम्हीं आम्हीं एक आणि कंठाळीला मेख" म्हणजे तसेंच समसीधी आलें कीं कोणी कोणाचें नव्हे, हाही उपदेश त्यांनीं मनांत घेण्यास योग्य असल्यास या गोष्टींत मिळाला आहे. तिसरी गोष्ट, माफीपत्रांत लिहिली आहे कीं निराधार निंदा केल्याबद्दल हल्लीं मला फार अनुताप झाला आहे; अहाहा! शास्त्री बुवा, तुम्हांस जो अनुताप झाला तो उतरस्थळीं व एके बागीच्या प्रसंगीं झाला हें बरें झालें. अनुतापास योग्य स्थळ जगद्गुरु स्वामीचा पवित्र मठ, पण तेथें तुम्ही गरसहपानें अनावर झाले असल्या मुळें तुम्हां मान मिळा व मागील पुढील विचार केला नाहीं तेव्हां त्याचा अनुताप डा॰ फ्रेजर स्वामीच्या कोर्टमठांत तरी वेळेवर केलात, नाहीं वेळ जेलसुपरिंटेंडेंटाच्या कोठडींत मळ्या वस्त्रानिशी एकांतवासांत बसून फार मोठा अनुताप तुम्हांस करावा लागता तो टळला ही मोठी खैर झाली. असतु.

पुनर्विवाहोत्तेजक मंडळीस आतां गणेश शा॰ नीं वचन दिलें आहे कीं, दोहो पक्षांचा तंटा मिटाव। म्हणून मी आपणाकडे

लघुत्व घेऊन ही माफी मागितली आहे. व आतां पुनर्विवाहास अनुकूळ अशीं व्याख्यानें वगैरे मी देत नाईन. या त्यांच्या भाषणावर मंडळीनें थोडाच भरवसा ठेविला असेल, गणेश शास्त्री युक्तिवान आहेत व मनुष्य दगडाखालीं सांपडलेला हात युक्तीनेंच काढून घेतें. असो. ज्ञा. प्र. नें आपलें शील केलें व ग. शा. आपले शीलाप्रमाणेंच पुढें वर्तन करितील यांत संशय नाहीं.

उत्तेजक मंडळीची तारिफ करण्याजोगी एक गोष्ट आम्हांस या कामीं आढळली ती ही कीं ज्ञा. प्र. नें केलेल्या फिर्यादींत त्यास सहाय होण्याकरितां लोकांनीं वर्गणीची यादी केली होती तिची टोप १६०० रुपये पर्यंत दाहा बारा गृहस्थांतच झाली. वा:! शाबास मंडळी शाबास.

## महारांचीं मुलं व चंद्रपुरचें हायस्कूल.

आलीकडे शाळांचा कियेक ठिकाणीं विघाड होण्यास त्यांतून महारांच्या मुलांचा शिरकाव हें बीज झालें आहे व त्यामुळें शाळा नासत आहेत हें पाहून वाईट वाटतें. आमचे वऱ्हाडांत गुदस्तां खामगांवचे शाळेस हा रोग लागला होता व तेव्हां आम्हीं या विषयीं आपले विचार प्रकट केले होते. हल्लीं आमचे हदीवर चंद्रपुरास तो प्रसंग आला आहे. तेथील शाळा चांगली भरभराटींत होती. मुलें २५० पर्यंत होतीं. मास्तर उत्तम विद्वान आहेत व त्यांच्या हाताखालीं दहा आसिस्टंट आहेत पण आलीकडे महारांच्या मुलांस शाळेंत घेऊं देण्याचा तेथें ठराव झाल्यानें सर्व गावकऱ्यांस वाईट वाटून त्यांनीं आपलीं मुलें शाळेंतून काढिलीं. हल्लीं शाळेंत मुलें एकंदर ९ आहेत व त्यांत सहा महारांचीं आहेत. शाळेस दरमहा मास्तरांचाच पगार ११०० रुपये आहे व विद्यार्थ्यांची स्थिति अशी झाली आहे आणि सरकार अजून कांहीं विच्यार करीत नाहीं तर हें बरोबर नाहीं.

आमचे इंग्लिश सरकार ख्रिस्ती धर्मी आहे. व साधर्म्यांच्या मताप्रमाणें ब्राम्हण शूद्र, महार, मुसलमान हे भेद नाहींत, व स्पर्शाचा विटाळ तर त्यांच्यांत मुळींच नाहीं. म्हणून त्यांच्या व आमच्या मतांत फार फरक आहे. चांगल्या विद्येनें प्रकाशित झालेल्या मनाचे हे विच्यार आहेत हे इंग्लिशांस योग्यच आहेत व जुन्याकाळीं आमच्या हिंदुस्थानांतही असा विकट प्रकारचा जातिभेद नव्हता, कारण तेव्हां ज्ञानदृष्टी होती. असु. आतां तरी इंग्लिश सरकारच्या संबंधानें व नव्या विद्येच्या प्रभावानें जातिभेदाचें बंड कमी होत होत जाणारच आहे. परंतु एकदम शाळांत वगैरें असे प्रकार सुरू केला म्हणनें लोकांस बाऊ वाटतो सबब ही क्रमे शनैः शनैः झालीं पाहिजेत. व सरकार एकदम असा गोंधळ करिते तेव्हां लोक त्यांस असा टपका देतात कीं महाराणी साहिबांनीं जनरल जाहिरनामा लावून हिंदुस्थानचें राज्य आपले कडे घेतलें तेव्हां लोकांस जें अभय वचन दिलें आहे त्यांत सर्वांच्या धर्माचें योग्य रितीनें रक्षण केलें जाईल असें लिहिलें आहे आणि आतां महारांचीं मुलें आमच्या मताप्रमाणें स्पर्शास अपवित्र तीं आमच्या मुलांच्या शेजारीं बसवून अयोग्य रितीनें आमच्या धर्माची बुडवणूक मांडिली आहे हें काय? हें लोकांचें म्हणणें केवळ गैरवाजवी आहे असें नाहीं; तरी सरकार या यावर कदाचित असा जबाब येईल कीं आम्हीं कोणास अशा शाळेंत जाऊन विटाळ करून घ्यावा अशाविषयीं सक्ती करीत नाहीं. आमची शाळा आमचे धर्म मताप्रमाणें सर्व जातींचे लोकांकरितां आहे. तींत ज्यांस योग्य व बरें वाटेल त्यानें शिकावयास जावें व इतरांनीं जाऊ नये. आम्ही म्हणतों कीं सरकारचें हे म्हणणें एक प्रकारें वाजवी आहे, पण दुसऱ्या प्रकारें त्यावर दोष असा येतो कीं इंग्लिश सरकारचें राज्य होऊन आज ५१ वर्षें झालीं इतके दिवसांत महारास अशा शाळांतून पाठविण्याचा उपक्रम नव्हता, तर आतांच कां सुरू केला? जशी इतके दिवस वाट पाहिली तशी लोकांस चांगली ज्ञानदृष्टी येई पावेतों वाट पहावयाची होती. आणखी अवेळीं असें कृत्य केल्यानें लोकांची स्वस्थता मोडते, मनें व्यग्र होतात, व विश्वास उडतो; या गोष्टींचा सरकारी अधिकाऱ्यांनीं जरूर विच्यार केला पाहिजे आणि त्या प्रमाणें केला तर आजच्या काळास महार लोकांस वर्गांत इतर मुलांत मिसळून बसूं देणें बरें नाहीं, त्यांचा स्वतंत्र वर्ग करावा अगर वेगळी शाळा करावी हें चांगलें असें आमचें मत आहे. व या कामीं आम्हीं आमच्या वऱ्हाडच्या अधिकाऱ्यांची तारिफ करितों. खामगावच्या प्रसंगीं वरिष्ठ सरकारचा हुकूम झाला कीं महारांचीं मुलें घेण्याचें मना होणार नाहीं, व लोकांचीं मनें व्यग्र होणार नाहींत अशा विषयीं अधिकाऱ्यांनीं योग्य तजवीज करावी. पुढें त्या मुलांस वेगळ बसविण्याची तजवीज करून ता गडबड मोडली. अशी तजवीज चंद्रपुरास अजून कां होत नाहीं व कशावर ढिलाई आहे तें आम्हांस अजून समजलें नाहीं.

आमच्या हिंदु लोकांचाही आम्हांस मोठा चमत्कार वाटतो कीं महार मांग लोक हिंदू पैकीं असून ते त्यांचा विटाळ मानितात. व "न नीचो यवनात्पर:" या वाक्या प्रमाणें मुसलमान लोकां परतें कोणी नीच नाहीं असें असतां ते विन हरकत त्यांस शिवतात, त्यांच्या घरीं जातात, व त्यांशी बहुत प्रकारचा व्यवहार ठेवितात, तेव्हां हें कोणतें शास्त्र बरें! तेच महार लोक व मुसलमान लोक आली कडे ज्या हौदाचें पाणी भरतात त्याच हौदाचें पाणी ब्राम्हण व शूद्र निःशंक भरितात तेव्हां त्यांचा विटाळ कोठें जातो तें समजत नाहीं. असो. शास्त्र सवडी प्रमाणें असावें हे बरेंच आहे व दिवसानुदिवस लोकांनीं ज्यास्ती सवडी काढाव्या हेंच उत्तम, व कालानुरूप आणि विद्येच्या प्रभावानुरूप हें सर्व होणारच, पण तूर्त सरकारी अधिकाऱ्यांनीं चंद्रपुरचें हायस्कूल जेणेंकरून लवकर सुधारेल ती तजवीज अवश्य करावी अशी आम्ही त्यांस शिफारस करितों

## वऱ्हाड

तहाशिलदार—आमचे ऐकण्यांत आलें आहे कीं पश्चिम वऱ्हाडांत हल्लीं चार तहशिलदारीच्या जागा नव्या भरण्याचा समय आहे. खामगावास एक नवीन तहशिलदारी करण्याचा ठराव झाला, जळगावचे तहशिलदार पुसदेस नेमून ती जागा रिकामी होणार, बाळापुरचे तहशिलदारास पेनशन मिळणार, व मेहेकरचे तहशिलदार रा. रा. मल्हारराव सदाशिव यांनीं राजिनामा दिला; मिळून च्यार तहशिलदार नवे व्हावयाचे; तसेच दोन नायबतहाशिलदार व्हावयाचे म्हणजे अकोल्याचे रा. नारो अमृत यांनीं पेनशनाचा अर्ज केला आहे सबब तेथें एक आणि खामगावच्या नव्या कचेरीस एक अशा दोन जागा होताहेत. आतां या मोठाल्या जागांवर कमिशनर साहेब कोणाकोणाच्या नेमणुका करितात तें पहावें. उत्तम प्रकार म्हटला म्हणजे आमच्या मतें नवीन शिकलेले इंग्लिश विद्वान बी. ए. निवडून आणून त्यांस या तहशिलदारीच्या जागा दिल्या तर कमिशनर साहेबांनीं मोठी सुधारणेची गोष्ट केली असें होऊन त्यांची स्तुति होईल. परंतु वऱ्हाडासारख्या प्रांतांत आम्हीं असें इच्छितों ही चूक करितों असें कित्येकांस वाटेल यांत संशय नाहीं व आम्हांसही थोडें तसें वाटलेंच, पण चूक झाली तरी चांगल्या बाजूकडे व्हावी असें आहे म्हणून आम्हीं तिकडे डोल दिला. मागें वऱ्हाडांत शाळाखात्याची संस्थापना मेहेरबान डा॰ सिक्लेर साहेब यांनीं केली तेव्हां पोक्त विचारानें व चांगल्या निवडणुकीनें त्यांनीं कित्येक चांगले विद्वान व युनिवर्सिटीच्या पदव्या मिळविलेले लोक आणले व त्यावरून इकडील शाळाखात्याची स्थिति चांगली झाली आहे तिजकरितां सर्व लोक त्यांची स्तुती करितात व सरकारांतही या गोष्टीकरितां त्यास चांगलें नाव मिळालें आहे. आतां तहशिलदार नेमण्याचें काम आमचे कमिशनर मेहेरबान लायल साहेब यांचें आहे व ते शहाणे, आणि सिविलसर्विसवाले आहेत तेव्हां युनिवर्सिटीच्या पदव्या मिळविण्याचे श्रम, विद्वत्ता, व योग्यता ते चांगलें जाणत असावेत अशी कल्पना न करण्यास कांहीं आधार नाहीं; म्हणून आम्ही त्यांस आणखी एकवार म्हणतों कीं त्यांनीं सरकारच्या ठरावाप्रमाणें बी. ए. च्या परीक्षेचे लोक मिळवून त्यांस तहशिलदाऱ्या द्याव्या. व आमचे मेहेरबान रेसिडेंटसाहेब बहादुर यांनीं या गोष्टीकडे लक्ष द्यावें अशी आमची त्यांस शिफारस आहे.

आम्हांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं इलिचपुरचे डिपुटी इजुकेशनल इनस्पेक्टर रा॰ रा॰ बाळकृष्ण लक्ष्मण शास्त्री बापट यांची प्रकृती बरी होऊन ते इकडे आले व आपले कामावर रुजू झाले. यांचे रजेंत रा॰ रा॰ वामन गणेश परांजपे काम पहात होते ते जळगांवास आपले हेडमास्तरचे जागेवर परत येणार व तेथें रा॰ रा॰ वासुदेव सदाशिव पिसोळकर तूर्त नेमलेले आहेत ते रिकामे होणार.

खामगांवच्या तहशिलदारीवर रा॰ रा॰ रामराव गोविंद यांची नेमणूक झाली व ते हल्लीं एथें आले आहेत. येत्या आठवड्यांत नवे जागेवर जातील असें वाटतें.

## अकोला

एथील डिपुटि कमिशनर आफिसांतील कारकून रा. बापु मुकुंद यांस नायब तहशिलदारीची जागा मिळणार असें ऐकतों. व एथील पन्नास रुपयांच्या नायब तहशिलदारीवर रा. भिकाजी चिमणाजी बाळापुरचे येणार असें ऐकतों. बाळापुरचे नायबाचे जागेचा पगार पन्नास होता तो चाळिस केला आहे.

कमिशनर साहेबांची स्वारी अजून चिखलदऱ्यासच आहे. त्यांचे क्लार्क आफ धि कोर्ट रा. रा. विष्णु सदाशिव पिसोळकर हे परत आले.

डा॰ सिंक्लर साहेब डायरेक्टर आफ पब्लिक इनस्ट्रक्शन यांची स्वारी चिखलदऱ्यास आली व ती आणखी महिनाभर इकडे येत नाहीं असें ऐकतों.

मृग नक्षत्र लागतांच पर्जन्य सुरू झाला व गेल्या मंगळवारीं रात्रीं प्रहरभर चांगला पडला तेणेंकरून नदीला पाणी पुष्कळ आलें होतें. पुलाचा कारखाना मोठा चालला असून सालमजकुरीं त्या पासून लोकांस कांहीं उपयोग झाला नाहीं तरी हा पूल फार लौकर तयार होईल असें दिसतें. पाऊस लागला तरी पुलाचें काम चालू आहे.

गेले मंगळवारीं एथील तुरुंगांत वीज पडून एक मनुष्य मरण पावला.

रा. रा. श्रीकृष्ण नरहर एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर अडगावास आपले कामावर जाऊन रुजू झाले.

आमचे वाचकांस आठवण असेल कीं, एथील प्रसिद्ध मोठ्या रस्त्यावर कायत्री नाविक रांडा राहत होत्या त्याविषयीं लोकांचा गिल्ला ऐकून आम्ही एकवार लिहिलें होतें व त्यावरून मे. दस्तुर बहिरामजी साहेब असिस्टंट कमिशनर यांनीं त्यास तेथून काढून दुसरीकडे राहण्यास जागा नेमून दिली. तें ठीक झालें, पण हल्लीं असें पाहण्यांत आलें कीं, गावांत काळ्या मारुती जवळ गोडी विहीर आहे तेथें गावांतील सर्व लहान, थोर, कुलीन, व संभावित लोकांच्याही बायका पाण्यास जात असतात व तेथेंच वरती धर्मशाळा आहे तींत रांडा राहूं लागल्या आहेत तर आम्हांस वाटतें कीं, ती जागा पहिले जागेपेक्षां रांडांस राहूं देण्यात क्षणभरही योग्य नाहीं. तेणेंकरून नीति बिघडण्याचा व वाईट परिणाम होण्याचा संभव फार आहे.

मागाहून आलेल्या जाहिराती.

## जाहिरात.

क्लाक व टाइम पीस वा नातीचीं बिघडलेलीं घड्याळें वऱ्हाड समाचार छापखान्यांत दुरुस्त करून दिलीं जातात व मेहनतीप्रमाणें नेमस्त आकार घेतला जातो. सर्वांस कळावें.

नोटिस—रा॰ तुरेराव देशमुख रहाणार जामठी प्रगणें मोर्तिजापूर यांस कळावें कीं, तुम्ही ता॰ २१ मे सन १८७० चे वऱ्हाडसमाचार पत्रांत आमचे नांवें नोटिस पाठविली ती अज्ञान चंद्रभान देशमुखाचे नांवची असून त्यावर तुम्ही पाळण करणार अशी सही केली.

उघड आहे कीं, चंद्रभान देशमुख हे अज्ञान असल्यामुळें त्यास असे कुभाऊ लि

हिण्याचें ज्ञान नाहीं तुमचे मनांतून त्याजला जवळ ठेऊन याची बसायत आणि माल आपलेकडे घ्यावा या करितां तुम्ही या मुलास तिसरे ठिकाणाहून घेऊन गले आणि याची सोबही ठेवीत नाहीं.

आम्ही जरी चंद्रभान देशमुखाचे नांवावर मुखत्यार आहो तरी तो अज्ञान असल्यामुळें याचा प्रत्यक्ष चुकता पाळण करणार याचे दिले अखत्यारानें काम करित आहो तेव्हां तो मुखत्यारपत्र देणार जर आमचे मुखत्यारपत्र रद्द करील तर होणार आहे.

चंद्रभान याचे नुकसान किंवा नफा झाल्यास त्याबदल सज्ञान झाल्यावर त्याचे पाळण करणार रोडबा देशमुख याजवळ याचा हिशेब मागण्याचा अखत्यार आहे. चंद्रभान याचा रोडबा योग्य वारीस असल्यावर चंद्रभान सज्ञान होण्यापर्यंत जो फायदा तुम्ही पाहूं इच्छित आहा तो तुम्हास प्राप्त होणार नाहीं. मुलास रवागा करावें तुम्हाला जबाब देण्याविशी जो नोटिशीचा खर्च लागला हा पाठवावा कळावें ता० १० माहे जून सन १८७० इ०

(सही) गोपाळ बाबनाजी कुल मुखत्यार नि० चंद्रभान देशमुख

---

नोटिस—बनाम जानकी मर्द माहदु वस्ती इछापूर ता० बाळापूर इजला खालीं सही करणार नोटिस देतो ऐसाजे तूं ता० २९ मे सनमजकूरची नोटिस दिली त्याचे उत्तर

तूं माझी लग्नाची बायको असोन मजला नपूंसक असल्याचा दोष देऊन झालेला मुलगा अन्य बीजाचा असल्याचे म्हणतोस हें बरोबर नाहीं ह्या तुझ्या बोलण्यापासून तुझेंच कुळास बट्टा लागणार याजविशीचा विचार मनांत आणिला नाहीं. फार अपसोस आहे लोकांचे शिकविण्यावरून बदलौकिक करण्यास उत्सुक झाल्याचे दिसत आहे.

परिक्षा दाखवावी असे म्हणतोस परंतु खऱ्या नाण्यास कांहीं हरकत नाहीं. प्रत्यक्षास प्रमाण माझे पोटचा मुलगाच तुजला साक्षा आहे आणि हें सर्वांस माहित आहे जर अन्य बिजाचा होता तर तेच वेळेस कां पुकारा केला नाहींस? आतां कोणाचे शिकविण्याकडेस लक्ष न देतां माझे घरीं यावे आणि मर्दूमकीचा अनुभव घ्यावा म्हणजे तुझी इच्छा परिपूर्ण होईल त्याजविषयींची काळजी करूं नये इतक्यावरही वाटल्यास तुजला फिर्याद करण्यास सरकारचे द्वार मोकळें आहे.

या शिवाय तुजला फारकती मिळत नाहीं कारण मी नपुंसक नाहीं जर फारखती वांचून पाट लाविल्यास तुजवर फौजदारी कायद्याप्रमाणें फिर्याद होऊन शिक्षा मिळण्यास अधिकारी होशील याजवर खुब लक्ष द्यावें. कळावें ता० ११ जून १८७०

[सही] माहादू वलद तानाजी जोजार वस्ती झाडगांव ता० बाळापूर नि० द० खु० हातची

---

## वर्तमानसार

माहिसुरा कडील रेलवेचा रस्ता कांहीं लहान प्रमाणाचा करण्याविषयीं ठराव झाला आहे.

खर्च कमी करण्याकरितां मुंबई व मद्रास एथील मनी आर्डर आफिसें कमी करणार व अकौंटंट जनरलचे एका असिस्टंटकडे तें काम देणार.

कैलासवासी गोकुळदास तेजपाळ यांनीं मरण समयीं लक्षावधि रुपयांच्या धर्मार्थ देणग्या दिल्या त्यांत मुंबईस इस्पितळ बांधण्याकरितां दीड लक्ष रुपये दिले. व त्या कारखान्याचें काम हल्लीं कापावर पारशी तालिमखान्याजवळ सुरू झालें आहे.

राजकोटा जवळ सोनासार म्हणून एक खेडें आहे तें गेले महिन्याचे १३ वे तारखेस चोरट्यांनीं लुटलें व वीस हजार रुपयांची मिळकत लांबविली.

विषारी सर्प मारणारास बक्षिस देण्याचा ठराव होता तो हिंदुस्थान सरकारानें मना केला.

महाबळेश्वरास पर्जन्य चांगला झाला साहेब लोकांच्या स्वाऱ्या आप आपले ठिकाणीं परत जाताहेत.

नागपुरच्या सैन्यावर ब्रिगेडियर जनरल बेस्ट यांस नेमिलें.

होळकरांचे राज्यांतील चोरटे लोक त्यांस आवरत नाहींत असें दिसतें. एजन्सी खात्याकडून सर्क्युलर झालें आहे कीं मोलवान व जोखिमाचे जिन्नस बिनबंदोबस्तानें कोणी सरकारी कामदारांनीं घेऊन प्रांतांत फिरत जाऊ नये.

पतियाळचे राजे व सर जंग बहादुर यांस नाइट ग्रांड कम्यांडर स्टार आफ इंडिया चा किताब मिळाला.

तुंगभद्रा नदीच्या पुलावरून आगगाडी चालवून पाहिली. हा पूल गुटीपासून ३९ कोसांवर आहे. व मुंबईच्या आणि मद्रसच्या रेलवेचा जेथें सांधा होणार तेथून नजिक च्यार कोसावर कंट्राक्टरची गाडी जाऊ येऊं लागली असें समजतें.

---

राणीसाहेबांचे द्वितीय चिरंजीव जे कांहीं दिवसांपूर्वीं एथें आले होते त्यांणी हिंदुस्थानांतील लोकांनीं आपलें आदरआतिथ्य फार चांगल्या रीतीनें केलें या विषयींचे आभार प्रगट करण्याकरितां गवर्नर जनरल लार्ड मेयो साहेब यांस एक पत्र पाठविलें आहे त्याचा आह्मी आमच्या मराठी वाचकांसाठीं तर्जुमा करितों तो येणें-प्रमाणें,

प्रिय लार्ड मेयो यांशीं

माझें आतां हिंदुस्थानांतील पर्यटन संपलें, व मी ताकड लवकरच हिंदी महासागरांतून निघून जाणार तेव्हां आपण व इतर लोकांनीं माझा पाहुणचार केला तो व ज्या देशांतून मी फिरलों तेथील लोक ह्या सर्वांनीं माझें आतिथ्य व आगत स्वागत चांगल्या रीतीनें केलें ह्याबद्दल आपणांस व त्यांस माझे आभार जर मी प्रगट न केले तर माझ्या अंगीं कृतघ्नतेचा दोष येईल यास्तव माझे आभार प्रदर्शित करण्याची ह्या सागरांतून निघून जाण्याच्या पूर्वींची ही शेवटची संधी मला साधली पाहिजे. मला जीं मागोमाग मानपत्रें मिळालीं त्यांचीं उत्तरें देते वेळीं माझा हा मनोभाव निष्कपटपणें मी प्रदर्शित केला परंतु मला वाटतें कीं, ज्यांनीं माझ्यासाठीं इतकें केलें त्यांस मानपत्रांच्या उत्तरांपेक्षां कांहीं ज्यास्ती खासगी रीतीनें मजकडून आभार दर्शविले जावे. त्या अर्थीं आपणास जर हें माझें पत्र प्रसिद्ध करणें ठीक दिसेल तर आपण खुशाल करावें. दोन वर्षांपूर्वीं जेव्हां मी इंग्लंडांत होतों त्यावेळेस राजकुटुंबापैकीं हिंदुस्थान देश प्रथम पाहिल्याची कीर्ति मला मिळावी ह्मणून जो माझी राणी साहेबांस फार दिवसांपासून विनंती होती ती कृपाकरून त्यांणीं मान्य केली. प्लायमोथ येथून निघाल्यापासून तों कलकत्यास येईपर्यंत चौदा महिन्यांत हिंदुस्थानांत जाणें हा जो माझ्या जलपर्यटनाचा मुख्य उद्देश, त्याविषयींची उत्कंठेनें मी मार्गप्रतीक्षा करीत होतों. पूर्वेकडील भव्यपणाविषयीं, जे विच्यार व त्याच्या संबंधानें हिंदुस्थानाविषयीं जे माझ्या मनांत विचार आले ते सर्व खरे झाले. कलकत्यास उतरल्यावर माझ्या आगतस्वागताकरितां केलेला थाट व याहूनही शोभायमान असा राणी साहेबांकडून आपल्या तर्फे "स्टार आफ इंडिया" हा किताब मला देतेवेळीं झालेला समारंभ हे इतके चांगले झाले कीं असे समारंभ होतील हें माझ्या ध्यानीमनींही नव्हतें. व यांपासून काशी, लखनूर, दिल्ली, आग्रा इत्यादि शहरांत माझ्या आगतस्वागताकरितां केलेल्या थाटांस आरंभ झाला.

आग्रा येथें दरबार करण्याचा बेत रहित झाला असें ऐकून पहिल्यानें मला कांहींसें वाईट वाटलें, परंतु तुमचा हा निश्चय फार चांगला असें मला नंतर वाटूं लागलें व आतां मला फारच आनंद होतो कीं एतद्देशीय राजेरजवाडे व सरदार यांच्या भेटी त्यांच्या स्वतांच्या देशांत किंवा त्यांच्या देशानजिक दरबारांत झाल्या असत्या त्यापेक्षां चांगल्या झाल्या. कोणी म्हणाले कीं हिंदुस्थानांत माझें येणें त्या देशांतील सरकारी तिजोरींत खूट आली अशा दुर्दैवाच्या प्रसंगीं झालें. परंतु मी तसें मुळींच समजत नाहीं. तुम्ही आपल्या हुकमानें व उपदेशानें, राज्याचा खर्च जितका कमी करवेल तितका केला. व माझ्या येण्यानें राज्यावर केवळ थोडाच भार पडला असेल असें मी इच्छितों, परंतु यामुळें खासगी गृहस्थांनीं माझ्या आगतस्वागताकरितां उदारपणानें जो पैसा खर्च केला त्यास मुळींच अवरोध आला नाहीं.

आपण ज्याप्रमाणें माझें कलकत्यांत आगतस्वागत केलें त्याप्रमाणें सर्व ठिकाणीं झालें, व माझा जो आपण पाहुणचार केला व मजकडे जो लोभ दर्शविला तो मी कधीं विसरणार नाहीं. तुमच्याकडून निघाल्यानंतर ज्या ज्या गृहस्थांकडून मला पाहुणचार झाला त्यास मी आपलें अंत:करणपूर्वक आभार प्रगट करितों. हिंदुस्थानांतील ज्या राजे रजवाड्यांनीं माझें योग्य रीतीनें आगतस्वागत केलें त्यांचाही मी मोठा आभारी आहें. चकोया, डीग, अलवार या ठिकाणीं मोठ्या प्रीतीनें घालविलेल्या दिवसांचा मला कधीं विसर पडणार नाहीं, व तेथील राजे माझें आगमन जितकें रमणीय व मनोरंजक होईल तितकें करण्याविषयीं एकमेकांस मागें पाडण्यास प्रयत्न करीत होते त्यांचीही मला निरंतर आठवण राहील, व त्याचप्रमाणें नेपाळ देशांत मोठ्या उदारपणें केलेलें माझें आगतस्वागत सदोदित माझ्या मनांत राहील. इंग्रज व नेटिव लोक ज्यांणीं माझें इतकें आदरआतिथ्य केलें त्या सर्वांचे मीं आभार मानितों; माझी पुरी खात्री झाली कीं, हें सर्व करण्यांत त्यांची इच्छा इतकीच होती कीं आपल्या राणी साहेबांच्या चिरंजिवाचा चांगला सन्मान राखावा, व राणी साहेबांच्या कुटुंबाच्या ठायीं जी आपली भक्ती ती प्रदर्शित करावी. सर्व लोकांनीं मला पाहण्याविषयीं व माझें आगतस्वागत करण्याकरितां जी उत्कंठा दर्शविली ती पाहून माझ्या मनास द्रव आल्याशिवाय रहात नाहीं. सर्व प्रकारच्या लोकांनीं माझें आदर आतिथ्य केल्यानें राणी साहेबांच्या ठायीं जी त्यांची निष्ठा ती प्रगट केली; ह्या आगतस्वागतामुळें हिंदुस्थानांतील लोकांविषयीं राणी साहेबांच्या ठायीं जो लोभ व जी आस्था आहे ती वाढूं लागतील. ह्या देशांतून माझा प्रवास फारच जलद झाल्यामुळें, तेथील मुख्य मुख्य भाग मला चांगल्या रीतीनें पहावयास मिळाले नाहींत तरी हिंदुस्थानाच्या प्राचीन काळच्या व सध्याच्या स्थितीचा माझ्या मनावर चांगला ठसा उठण्यास एवढें पुरे आहे. गरीब प्रतीच्या लोकांची स्थिति एकंदर रीतीनें सर्व प्रकारें सुधारण्याचीं युरोपियन नेटिव लोकांच्या उत्सुकतेचीं पुष्कळ चिन्हे माझ्या नजरेस पडलीं. विद्यावृद्धीचें अमत्य लोकांस समजूं लागलें. माझ्या नांवाच्या पगारी विद्यार्थ्यांच्या जागा करणें, लोकांला मनोरंजनासाठीं बागा तयार करणें, माझ्या नांवानें हाय स्कुल स्थापणें, व कित्येक बंदरीं खलाश्यांसाठीं इमारती बांधण्यास पैसे देणें इत्यादि गोष्टी मी हिंदुस्थानांत आलों याचें स्मरण राहण्याकरितां केल्या हें पाहून मला फारच आनंद झाला. ह्या स्तुत्य कृत्यांस हिंदुस्थानांतील राजेरजवाड्यांनीं व खासगी गृहस्थांनीं पुष्कळ मदत केली. त्यांचीं नांवें व त्यांचें औदार्य यांविषयीं मी म्हणजे लिहावें असें नाहीं. हिंदुस्थानांत माझ्या येण्यापासून असे चांगले परिणाम झाले ही गोष्ट मला फार आनंद देते. आणि ती अशी आहे कीं तेणेंकरून माझें हिंदुस्थानांत राहणें थोडे दिवस जरी झालें तरीं त्याची मला आठवण राहील.

आगगाडींतून जे मीं लांबलांबचे पल्ले केले त्यावरून राणीसाहेबांचें हिंदुस्थानांत राज्य किती मोठें आहे याविषयींचा मला कांहींसा अनमास सांपडला. आगगाडींतून माझें येणें इतकें सुखावह झालें कीं असें मला कधींच झालें नव्हतें. हें म्हटल्यानें रेलवे कडील अधिकाऱ्यांनी मी जानबीपेक्षां जास्त तारीफ करीत आहे असें नाहीं. वेळच्यावेळीं व कांहीं अडचण आल्याशिवाय ठरविलेल्या ठिकाणीं माझें जाणें येणें झालें तें केवळ ज्यांच्याकडे माझ्या येण्याजाण्याची व्यवस्था सोंपली होती त्यांमुळें होय. बंगाला व वायव्य प्रांत येथील मैदानें पाहून मी कांहींसा निराश झालों परंतु देहरा, व मसोरी येथील डोंगर व बर्फानें आच्छादित अशा पर्वतांच्या रांगा यांवरील भव्य देखावे पाहून मला फारच समाधान वाटलें. हिंदुस्थानांत राहिलों या वेळांत कांहीं दिवस मला शिकारीकडे लावण्यास मिळाले ह्या गमतीनें जे मी थोडे दिवस घालविले ते मनापासून सुखोपभोगांतच घालविले असें म्हणण्यास कांहीं चिंता नाहीं, असें मला वाटतें. जरी मी योग्य वेळापूर्वीं एक महिना शिकारीस निघालों तरीं मला शिकार चांगली मिळाली हें मोठें नशीब समजलें पाहिजे. माझ्या शिकारीच्या स्वा

रीची ज्यांणीं व्यवस्था केली व ज्यांच्या योगानें संवून मी मी रहात होतों तरी जें जें सुख व जी जी छानछुकी मला पाहिजेशी वाटली ती ती मला सर्व मिळाली त्या सर्वांचा मी मोठा अभारी आहे. हें एक माझें सुदैव समजलें पाहिजे कीं मोठमोठाल्या कामगारांशीं माझ्या ओळखी झाल्या, जे कामगार आपल्या शूर कृत्यांमुळें हिंदुस्थानांतील योद्धे गणले जाण्यास लायक आहेत त्यांच्या मैत्रीचा मी मोठा अभिमान बाळगितों. हें माझें म्हणणें लष्करी व इतर अशा दोन्ही प्रकारच्या कामगारांस अनुलक्षून आहे. व हिंदुस्थानांत राणीसाहेबांचे नोकर राणीसाहेबांची चाकरी मोठ्या आस्थेनें व चांगल्या रीतीनें करितात त्याप्रमाणें दुसऱ्या कोणत्याही राजाचे नोकर करीत नाहींत हें जें आपण एका मोठ्या समारंभाच्या वेळीं बोलले होते तें अगदीं बरोबर आहे.

मुंबई शहर पाहून मी फार खुषी झालों. ह्या शहराचें बंदर फार चांगलें असल्यामुळें त्याकडे माझें खलाशी या नात्यानें विशेष लक्ष गेलेंच. दैवयोगें येथें माझें येणें अशा प्रसंगीं झालें कीं, असा प्रसंग ह्या शहराच्या इतिहासांत मागें कधींच आला नव्हता. ह्या प्रसंगीं ह्या शहराच्या भावी बढतीस जरूर अशा तीन मोठ्या गोष्टी घडून आल्या. त्या येणेंप्रमाणें. पूर्व व पश्चिम हिंदुस्थानामध्यें आगगाडीचा रस्ता पुरा होणें; सुवेज येथील कालवा सुरू होणें; व मुंबई व सुवेज ह्यांमध्यें समुद्रांतून तारायंत्र होणें. माझी अशी खात्री आहे कीं, ह्या गोष्टींमुळें मुंबई शहराच्या भावी उत्कर्षाविषयीं जी आशा उत्पन्न होते ती सर्व प्रकारें सफळ होईल, आणि मी असी अशा बाळगतों कीं, माझे मुंबईकर मित्रांस पुढें कधी तरी असी आठवण होईल कीं, त्यांच्या ऊर्जित काळाच्या प्रारंभींच मी राणी साहेबांची जी त्यांच्यावर ममता आहे ती, व त्यांची पुढील समृद्धि ऐकून जो राणी साहेबांस आनंद होईल तो ह्यांविषयींची त्यांची खात्री करण्यास आलों होतों. मद्रासेतील लोकांस मुंबई व कलकत्ता येथल्यापेक्षां विशेष गैर सोई आहेत तरी त्यांणीं माझें इतक्या उत्कंठेनें आगत स्वागत केलें, व इतका आदरमान राखिला कीं, ह्याच बंदरावरून मला पुनः माझ्या तारवावर चढण्याची संधी आली हें पाहून मला फार आनंद झाला. माझ्या रमणीय प्रवासाचा एथें केवळ कळसच झाला. हिंदुस्थानांतील माझा तीन महिन्याचा प्रवास मोठ्या मौजेनें व जलदी झाला. माझ्यावर उपकाराचें मोठें ओझें झालें, ह्या उपकाराचा मी अभिमान बाळगितों, परंतु ते फेडण्याची मला आशा नाहीं. ज्या ज्या गोष्टींचा हिंदुस्थानचे कल्याणाशीं संबंध असेल त्या त्या गोष्टींविषयीं मी नेहमी आस्था बाळगीन; कारण कीं, तेथील लोकांवर आतां माझी ममता बसली आहे. माझें हिंदुस्थानांत किती आस्थेनें व राजनिष्ठेनें आगत स्वागत झालें, व तें केवळ राणी साहेबांमुळेंच झालें, व राणी साहेबांच्या ठायीं तेथील लोकांची पूर्ण भक्ति व त्यांच्या हितकारक व नम्र राज्यरीतीची चहा ही प्रगट करण्यास माझ्या येण्याची संधी त्यांणीं साधली; हा आनंदाचा निरोप मी माझ्या मातोश्रीस कळवीन व हें ऐकून त्यांस अतिशय संतोष होईल.

आतां मी हिंदुस्थानांतील लोकांची प्रीतिपूर्वक रजा घेतों. ईश्वर त्यांचें सदा बरें करो.

सही आल्फ्रेड.

## जाहिराती.

## विचित्रपुरी

### नवीन मनोरंजक पुस्तक.

सर्व लोकांस विनयपूर्वक कळविण्यांत येतें कीं, आम्ही वर लिहिलेलें मनोरंजक पुस्तक मुंबई येथें गणपत कृष्णाजी यांचे छापखान्यांत सुंदर ठसे छापाचा छपण्यास आरंभ केला आहे हें पुस्तक इंग्लिश भाषेंतील मनोरंजक पुस्तकें ( नाव्हेल्स ) यांच्या धरणीवर केलें आहे. याचीं मराठी सहा ज्या पुस्तकाच्या साच्याचीं सुमारें ३०० पृष्ठें होतील; म्हणजे मुक्तमाला वगैरे पुस्तकांच्या दुपटी एवढें होईल.

या मध्यें पूर्वींच्या लोकांच्या वेड्या समजुती, सदसद्विचारत्याग, धर्मभोळेपणा, ह्या गोष्टींचें वर्णन केलें आहे; व लहानपणीं लग्न करण्याचे परिणाम. स्त्री शिक्षणाची अवश्यकता, आणि पुनर्विवाहाची जरूरी स्पष्टरीतीनें दाखविली आहे. दुष्ट, आळशी, चोर, छिनाल, आणि ठक, यांचीं चरित्रें यांत आणिलीं आहेत; व मंत्र जादू भविष्यें हीं खोटीं ठरविलीं आहेत. आंगांत आणणारे, ज्योतिषी, कापडी, इल्मी, गारूडी हे लोकांस कसें फसवितात हें यांत दखविलें आहे ब्रम्हराक्षस, यांच्या विषयींची कल्पना यांत फारच चमत्कारिक रीतीनें उडविली आहे, व कुस्वप्नें, दुश्चिन्हें, वगैरे मानिल्याचे परिणाम दाखविले आहेत. भुतें, समंध व सुधारणा करूं लागल्यास कशा अडचणी येतात याचें विवेचन केलें आहे.

या शिवाय स्त्रीपुरुषांची अत्यंत प्रीति मित्रांचें खरोखर परस्पर प्रेम, उदार आणि परोपकारी लोकांची सत्कृत्यें, आणि पापभीरु लोकांची सत्यनिष्ठा, यांचेंही निरूपण यांत केलें आहे. सारांश इंग्लिश वगैरे भाषांचा अभ्यास करून पदव्या मिळविलेल्या नवीन लोकांचीं मनें कशीं होतात हा यांत मुख्य विषय आहे; शृंगार, वीर, करुणा, इत्यादि नऊ रस उत्पन्न करून एकाच गोष्टींत हे सर्व विषय प्रसंगानुसार आणिले आहेत. अतिशय चित्तवेधक स्थळीं सुंदर चित्रें घालून उत्तम देखावे दाखविले आहेत.

हें पुस्तक पुढील महिन्याचे अखेरीस विक्रीकरितां तयार होईल. याची आगाऊ किंमत जुलै महिन्याचे आंत पाठविल्यास १॥- दीड रुपया ठेविली आहे व मागाहून १।||- पावणे दोन रुपये पडतील. ज्यास हें पुस्तक घेणें असेल त्यांणीं डाक व बंगी खर्च याबद्दल दोन आण्यासह रोख पैसे अगर एक आणा वर्ताळासुद्धां तिकिटां मुंबई येथें गणपत कृष्णाजी यांच्या छापखान्यांत अगर खालीं सही करणाराकडे पाठविल्यास पुस्तकें रवाना केलीं जातील. नाटपेड पत्र पाठवूं नये. कळावें तारीख ३ जून सन १८७० इसवी

केशव लक्ष्मण जोरनेकर. इंग्लिश टिचर
इं. म. स्कूल अकोला, वऱ्हाड

नोटिस—गजफरहुसेन व कृष्णाजी पाटील व येसू माळी व मानजी कुंभार व रामाजी निवाळे व रामाजी खडके व पिरखमनी तावले मौजे केळास तालुके बाळापूर तुम्हांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुम्हीं आमची जमीन आठ वर्षांचे करारानें करून रुपये १४०० ची सुंदरलाल याची रसीद द्यावी व सरकारी पैसा तुम्हीं देत जावा आणि तुम्हांस आम्हीं रजिष्टर करून द्यावें असें ठरलें असोन तुम्हीं लावणी यांचीं रसीद न आणतां रजिष्टर ही करून घेतलें नाहीं व हल्लीं जमिनीचा वक्त आला आहे तर तुम्हीं सदरहू बद्दल रजिष्टर करून घेऊन सुंदरलाल यांची रसीद आणून द्यावी जर करितां या नोटिशीचे तारखेपासून आठ दिवसांत निकाल न केल्यास व सरकार पैसा न दिल्यास सदरहू रुपये तुम्हापासून घेण्यांत येतील कळावें तारीख ८ माहे जून सन १८७० इसवी मुक्काम अकोलें.

( सही ) विठोबा वलद भिवाजी माळी.

### गोपीचंद नाटक.

या नावाचें हिंदुस्थानी भाषेंत व बाळबोध लिपींत एक नवीन पुस्तक सोलापुरास रा. रा. अण्णाजी गोविंद इनामदार यांनीं तयार करून आपले कल्पतरु छापखान्यांत छापिलें आहे व याच्या प्रती आमचे वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आल्या आहेत. याची किंमत ८१२ बारा आणे व डाकहशील एक आणा आहे. पुस्तक नाटकाचें असून चांगलें सुरस आहे.

### फौजदारी काम चालविण्याविषयीं कायदा साटिक.

हें नव्या क्रिमिनल प्रोसिजर ( सन १८६९ च्या ८ वे ) कायद्याचें माठें पुस्तक टीकेसुद्धां व यावरील हायकोर्टाचीं सर्क्युलरें, ठराव, व इतर ग्रंथकारांचे अभिप्राय यांसुद्धां रा. रा. नारायण बाळकृष्ण चितळे ऊर्फ रावजी भाजेकर ठाण्याचे वकील यांनीं तयार करून ज्ञानप्रकाश छापखान्यात छापिलें, याच्या प्रती आमचे वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आल्या आहेत. हें पुस्तक संग्रह करण्या लायक आहे. याची किंमत ७ रुपये व डाकहशील ७ आणे पडतें.

### कवितासारामृत

अथवा

महाराष्ट्र भाषेच्या कवितांतील वेंचे.

सर्वांस विनयपूर्वक कळविण्यांत येतें कीं वरील नांवाचा ग्रंथ आम्हीं तयार करून अकोलें येथें वऱ्हाड समाचार छापखान्यांत सुंदर टाइपांवर छापवीत आहों. सदहू ग्रंथांत वामन पंडित, मोरोपंत अनंत कवी आदिकरून कवींच्या कविता फारच सुरस, व मनाल्हादक अशा आहेत. तर सर्वत्र देशबांधवांनीं यास उदार आश्रय द्यावा. हा ग्रंथ घेणारास सुलभ पडावा म्हणून याची किंमत फारच थोडी ठेविली आहे आगाऊ जून महिन्याचे आंत देणारास ८१२. फक्त सही देणारास ८१४ आणे, आणि मागाहून ग्रंथ तयार झाल्यावर देणारास १ रुपया पडेल याशिवाय टपाल खर्चाबद्दल देन आणे पडतील. याप्रमाणें किंमत ठेविली आहे. तिकिटें पाठविणारांनीं अर्धआणे दराची वर्ताळ्यासह पाठवावीं. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं. सदहू ग्रंथ रा. रा. शिवचंद नलदवभाई मारवाडी दुकान भडगांव यांजकडे मागितला असतां मिळेल तारीख २० माहे एप्रिल सन १८७०

( सही ) श्रीधर नारायण भडगांवकर
जिल्हा खानदेश.


## जाहिरात.

केरोपंतांचीं पंचांगें या सालचीं म० ग० छा० त छापलेलीं आम्हांकडे विक्रीसाठीं आलीं आहेत. किंमत दर प्रतीस ८३ आणे.

| किमतीचे दराव. | रु. | आ |
|---|---|---|
| वर्षाची आगाऊ देणारास... ... | ६ | ० |
| साल अखेर ... ... ... | ७ | ० |
| सहा महिन्याची आगाऊ ... ... | ३ | ८ |
| एक अंकास ... ... | | ९ |
| फुटकळ ... ... ... | ० | ३ |

या शहरा बाहेरील लोकांस वर्षाचे ५२ आठवड्यांबद्दल टपाल खर्च आगाऊ पडेल तो १ रु. ४ आणे व सालअखेर १ रु० ८ आणे.

आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरू तारखेपासून २ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही ज्यांचा मागील हिशेब सरून नवें साल चालू होईल तेथून २ महिन्यांची मुदत समजावी.

### नोटिसा वगैरे छापण्याचे दर.

१० ओळी पर्यंत ... ... ... १ रुपया.
१० ओळींवर प्रत्येक ओळीस ० ८१६
इंग्लिश नोटिसीचें दर ओळीस ८६
एकच मजकूर वारंवार छापणें असल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.


TO OUR SUBSCRIBERS.

We beg to request that our Subscribers will forward as soon as possible there subscriptions for the present year; and trust that they will be so good as to pay up all arrears without delay.

*Proprietors of Berar Samachar*

सूचना—नोटिसा व इतर मजकूर छापावयास पाठविणारांनीं ते बालबोध लिहिल्यास फार चांगलें. निदान मनुष्यांचीं व गावांचीं नावें तरी बालबोध असावीं. तसें नसून नोटिसांचे वगैरे कामीं नावागावांची चूक झाल्यास त्याची जबाबदारी आम्हांवर नाहीं.

एडिटर व० स०

## वर्गणीदारांस विनंती.

सन १८६७ चे अक्टोबर महिन्यांत आम्ही अकोल्यास वऱ्हाडसमाचारपत्र सुरू केलें त्यास अडीच वर्षें होऊन गेलीं तर आजून वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व हिला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं.

वऱ्हाडसमाचाराचे मालक

वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्र घेण्याचें बंदकरून ज्या लोकांनीं त्याजबद्दलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दररुपयास अर्ध आणा प्रमाणें त्यांस व्याज द्यावें लागेल. ता १ माहे आक्टोबर सन १८६८

वऱ्हाडसमाचाराचे मालक

हें पत्र आकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकां करितां छा. म. केलें

# वऱ्हाडसमाचार.

**THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.**

VOL. 5 AKOLA :—SATURDAY EVENING, JUNE 18. 1870 NO. 22

पुस्तक ५. अकोला शनिवार सायंकाळ, तारीख १८ माहे जून सन १८७० इ०. अंक २२


## रा० ब० गोपाळराव हरी देशमुख.

जुने शिकलेले जे देशसुधारक आहेत त्यांपैकीं राव बहादुर गोपाळराव हरी देशमुख अमदाबादचे स्मालकाज जज्ज हे एक प्रमुख आहेत हें आमच्या बहुत वाचकांस माहित असेल. सुधारणेच्या कामीं आज पंचवीस वर्षें यांचा हात आहे व तोही लोकांचे सांगासांगीचा किंवा टाळाटाळीचा नव्हे,तर अंतःकरणपुरःसर घरच्या प्रपंच्यांत मनुष्य जसें झटतें तसे हे सुधारणेचे व लोकहिताचे कामीं झटलेले आहेत. एका प्रसिद्ध व कीर्तिमान वर्तमानपत्राचे हे जनक आहेत. व कित्येक वर्तमान पत्रांस जन्मास येण्यास हे कारण झाले आहेत; कित्येक पत्रांस यांच्यामुळें तेजी आली, व कित्येकांस यांच्या संबंधानें नफा झाला आहे. पुनर्विवाह विषयाचा तर सन १८४७ साला पासून हे विच्यार करित आहेत व तेव्हां पासून हे सतत त्याविषयास अनुकूळ असें लिहित आले आहेत. यांनीं कित्येक निबंध लिहिले आहेत त्यांतील विधवा दुःख प्रलाप वाचले ह्मणजे नेत्रांतून अश्रुपात येतात, तसेच लोकांस सुधारणेच्या कामीं उत्तेजन यावें एतदर्थ जे यांचे लेख आहेत ते वाचले ह्मणजे खरोखरच अंतःकरण गलबलून जाऊन वीरश्रीचा आविर्भाव उत्पन्न होतो. धर्माचे बाबदींत यांनीं बहुत माहिती करून घेतलेली आहे व ती व्यवस्थित रीतीनें गुणदोषांसह लोकांस सांगितली आहे असे प्रयत्न अशा विषयावर दुसऱ्या कोणाचे झाले असतील असें आम्हांस वाटत नाहीं. माहितीचा संग्रह डा. भाऊ दाजी सारख्यानीं कदाचित यांहूनही अधिक केला असेल तरी तो लोकांपुढें ठेवण्याचें काम देशमुख यांचें सर्वांहून अधिक आहे. अस्तु.पुनर्विवाहास अनुकूल असें शास्त्रवचनांसहित सौभाग्यरत्न नावाचें पुस्तक यांनीं केलें आहे,पुनर्विवाहोत्तेजक सभा यांच्या प्रयत्नांनीं स्थापन झाली,नानाभिडे यांचा पुनर्विवाह जमविण्यांत हेच अग्रणी होते, वेणूबाईच्या पुनर्विवाहाच्या कुकुमपत्रिकांवर यांची सही होती, बहिष्काराचें बंड माजलें तेव्हां बडोद्याचे दरबारांत सशास्त्रतच्या निर्णयाचा घाट यांनीं घातला. फार तर काय परंतु पुण्यास शंकराचार्य आले तेव्हां देखील या वादाची जमवाजमव अमदाबादेहून गोपाळरावजीनीं पुण्यास येऊन स्वतां केली, इत्यादि प्रकारांवरून गोपाळरावजीचें मत पुनर्विवाहाविषयीं कसें निश्चायक होतें याची वाचकांस कल्पना झाली असेल, परंतु त्याप्रमाणें त्यांकडून शेवटास नांदणूक झाली नाहीं हें पाहून अत्यंत दुःख वाटतें. म्हणजे त्यांनीं पुनर्विवाहसंसर्ग दोषाबद्दल गेल्यामहिन्यांत प्रायश्चित्त घतलें व पांचशें रुपये ब्रम्हदंड देऊन नऊशे ब्राम्हणांची समाराधना घातली असें कळतें.

गोपाळ रावजींनीं आपल्या पंचवीस व र्षांच्या सत्कृत्यांवर एकदम काळा बोळा पुसण्याचें हें लाजिरवाणें कृत्य कां केलें याविषयीं विच्यार केला तर समाधानकारक कांहीं अनुमान निघत नाहीं. बडोद्यास त्यांचो एक लहान मुलगी दिलेली आहे तिच्या सासूनें गोपाळरावास गांजिलें व निक्षुन सांगितलें कीं तुम्हो प्रायश्चित्त घ्या, नाहीं. तर मी आपल्या मुलाचें दुसरें लग्न करिते तेव्हां यांनीं भिऊन मुलीच्या मोहाकारितां प्रायश्चित्त घेतलें असें कळतें. असें करणें गोपाळरावजीस शोभतें कां? गोपाळरावजीस मुलेंग व मुली पुष्कळ आहेत, सखे भाऊ आहेत, घराणें मोठें आहे, व पुनर्विवाह विषयाचा २५ वर्षें ते विच्यार करित आहेत तेव्हां आजच्या अडचणी मागेंच त्यांस दिसल्या नसाव्या काय? व ते मोठे मुत्सद्दी म्हणवतात तर त्यांची मुत्सद्दिरी एथें कशी फसली? पुनर्विवाह पक्षास ते मिळाले होते तर त्यांनीं आपले कच्चाबच्चांस फसविलें होतें व आतां त्यांनीं ती गोष्ट सुधारण्या साठीं प्रायश्चित्त घेतलें असेल तर पुनर्विवाहोत्तेजक मंडळीस व गरीब बिचाऱ्या वणूबाईस फसविलें असें ह्मटलें पाहिजे. नावे मध्यें बसवून नेऊन अर्ध्या नदींत ढकलून देणारे हे आपले साथीदार आहेत असें त्या वेळीं त्या अनाथ वेणूस कळतें तर यांच्या सूत्रानें नाचून ती अशा नव्या परीच्या विडंबनेंत आपणास पाडून न घेती. अस्तु. शहाण्या व मुत्सद्दी मनुष्यासही लोकार्थ बुडाला तरी चिंता नाहीं तिकडे नजर न देतां स्वार्थ साधावा लागतो असें देशमुख यांनीं मंडळीस चांगलें दाखवून दिलें. देशमुखाविषयीं मंडळीस मोठा भरवसा होता, पण भरवशाचे ह्मशीस टोणगा ह्मणतात त्याप्रमाणें हें झालें. यांनीं या कामास आरंभ करून पंचवीस वर्षें झालीं आहेत तर पुढें येणाऱ्या अडचणी विषयीं यांस कळूंनये असें नाहीं. असें असतां यांनीं तसें केलें ही एक मुत्सद्दगिरीच होय. बरें इकडे प्रायश्चित्त घेतात आणि याच्या पूर्वीं च्यार दिवस पुनर्विवाह पक्षाकडे कळवितात कीं, शास्त्रार्थाचा वाद झाल्याचे कागद पत्र आम्हीं पाहिले त्यांत पुनर्विवाह सशास्त्र आहे असें स्पष्ट दिसतें. विष्णुशास्त्री यांनीं उत्तम कोट्या केल्या. नारायणाच्यार्य यांनीं, मार्गें नगरास दुगल यानीं महेश्वराशी केल्या प्रमाणें, कुटिल वर्तन केलें. याप्रमाणें लिहून नंतर मुलीच्या मोहार्थ प्रायश्चित्त घेतात. यांत एक मुत्सदागिरी दिसते कीं, पुनर्विवाहोत्तेजक मंडळीस त्यांचा पक्ष देशमुखांनीं सोडल्याबद्दल वाईट वाटूंनये म्हणून शास्त्रार्थाविषयीं तसें लिहिलें, बरें प्रायश्चित्त घेतल्यावर शंकराच्यार्यांनीं कदाचित विच्यारिलें कीं अनुताप झाल्यावर आणखी अशी करणी कां? तरीही त्यावर त्यांस मुत्सदगिरीचा जबाब देतां येईल कीं, तें पत्र प्रायश्चित्त घेतल्याच्या पूर्वील काळचें आहे. सारांश ही लपंडायी आहे व अशा शोधूं गेल्यास पुष्कळ मिळतील. वेणूबाईच्या पुनर्विवाहाच्या कुंकुम पत्रिकांवर गोपाळ रावजीची सही होती, पण गोपाळरावजी लग्नाचे दिवशीं जेव्हां गैरहजर तेव्हां जमलेल्या मंडळीस फार वाईट वाटलें व त्यांनीं गोपाळरावजीस जरूर येण्याविषयीं तारायंत्रांतून निरोप पाठविला. त्याचा त्यांनीं उलट निरोप पाठविला कीं आगगाडीवर येण्यास उशीर झाल्यानें गाडी चुकली. पुन्हा मंडळीनें कळविलें कीं दुसरें दिवशीं यावें. तरी त्यांनीं न येतां वेळ मारून नेली, व वाईट न दिसावें ह्मणून पुढें कांहीं दिवसांनीं मुंबईस गेले. असेंच मागें एका प्रसंगीं दक्षिणेचे पैसे सरकारानें भटाभिक्षुकांस न देतां इंग्लिश ग्रंथांचे तर्जुमे करणारांस देत जावे असें यांनीं वर्तमानपत्रांत लिहिलें होतें पुढें त्याबद्दल पुण्याचें भिक्षुकमंडळ गोपाळरावांवर रागावलें तेव्हां त्यांनीं भरसभेंत ब्रम्हवृंदास नमस्कार घालून त्यांची क्षमा मागितली. सारांश प्रसंग पडेल तेव्हां मतलब साधेल तशा बेतानें बागण्याची ही कोटि आहे. पण अशी अशा महत्कृत्याच्या कामीं उपयोगीं नाहीं असें आमचें मत आहे. देशसुधारणेच्या कामाचे पुढारी दृढनिश्चयी व रामबाणासारखे एकवचनी पाहिजेत. व त्यांचीं कृत्यें लोकांस कित्ता घेण्यासारखीं पाहिजेत आणि अशांची तर प्रस्तुत बरीच कोताई दिसते मग पुढील परिणाम काय?

## नित्याचें मराठी वर्तमानपत्र.

आमच्या वाचणारांतून कित्येकांस ठाऊक असेल कीं, मुंबईस सुज्ञान बोधक या नावाचें एक मराठी वर्तमानपत्र दररोज निघत असे तें या महिन्यापासून बंद झालें त्याचें कारण पत्रकर्त्यानें असें लिहिलें आहे कीं आश्रयदात्यांनीं वेळच्या वेळीं वर्तमान पत्राचा पैसा पाठविला नाहीं व त्यामुळें कारखान्याचा खर्च भागला नाहीं म्हणून निरुपायास्तव नित्याचें वर्तमान पत्र बंद करावें लागलें. व त्या ऐवजीं आठवड्यांतून दोनदां त्याच नावाचें पत्र काढण्याचा त्यानीं क्रम चालू केला आहे.

आमच्या एवढ्या विस्तीर्ण महाराष्ट्र भाषेच्या प्रदेशांत अजून एकही नित्याचें मराठी वर्तमान पत्र चालू होऊन निभत नाहीं ही देशास मोठी लाजेची गोष्ट आहे. आठवड्याचीं वर्तमानपत्रें महाराष्ट्र भाषेत तूर्त बरींच चालू झालीं आहेत म्हणजे सुमारें वीस आहेत. आतां तीं सर्वच चांगलीं नाहींत ही गोष्ट खरी आहे व तसें कोठें असणारही नाहीं हाताचीं पाची बोटें सारखीं नसतात, असो, असें म्हटलें तरी यांतून पांचच्यार वर्तमान पत्रें फार चांगलीं चालून योग्यतेस आलीं आहेत व त्यांतून लिहिणारे जे उत्तम विद्वान आहेत त्यांच्या विद्वत्तेवरून पाहतां नित्याचें वर्तमानपत्र चालविण्यास त्यांस अशक्य आहे असें नाहीं. तेव्हां तसें वर्तमानपत्र चालू न राहण्यास मुख्य अडचण म्हटली म्हणजे टपाल खर्चाची व आश्रयदात्यांची होय. इंदुप्रकाश, नेटिव ओपिनियन हीं सुंदर पत्रें हजारपर्यंत खपतात तथापि हींच नित्याचीं केलीं तर यांची संख्या वाढण्याचें दूरच पण आहेत इतकेही वर्गणीदार कायम ठरणार नाहींत. याचें कारण इंदुप्रकाशास किंमत सात रुपये आहे आणि तें नित्याचें केलें तर त्यास हल्लींचे मानानें डाकहाशिल वीस रुपये लागेल म्हणजे अडक्याची भवानी आणि टक्याचा शेंदूर या म्हणीप्रमाणें किमतीच्या तिप्पट डाकहाशिल पडणार या भयानें एकादें नित्याचें वर्तमानपत्र सुरु करण्यास चांगले पत्रकर्ते धजत नाहींत.

दुसरें एक कारण असें आहे कीं चांगलें वर्तमानपत्र आणि तें नित्य चालविणें म्हणजे सामान्य विद्वानाचें व एकट्याचें काम नव्हे. त्यांत पुष्कळ चांगल्या विद्वानांचे हात पाहिजेत. व अशा मासल्याच्या पाच च्यार लोकांचे श्रम मजुरा घेण्यास छापखान्यांतून हजार निदान सात आठशे रुपयांची तरी त्यांस महिन्यास पोंच झाली पाहिजे, तर इतका पैसा वर्तमानपत्रास देण्याजोगीं आमच्या देशास अजून शक्ती आली नाहीं व ती लवकर येईल कीं नाहीं हें कळत नाहीं व यावरुन आम्हांस फार वाईट वाटतें.

इंग्लिश वर्तमानपत्रें नित्याचीं मुंबईस दोन निघतात व त्यांच्या किमतीही बहात्तर बहात्तर रुपये आहेत असें असतां तीं, प्रत्येकी दीड हजार, दोन हजार अशीं, खपतात हें पाहिलें म्हणजे, आपली नेटिवांची उणीव दिसून येते. इंग्रजी वर्तमानपत्रांचे ग्राहक बहुतेक युरोपियन लोक असतात| व त्यांस पगार मोठाले असतात त्यामुळें ' खर्चाचे दृष्टीनें त्यांस दोन च्यार वर्तमानपत्रें घेणें म्हणजे कांहींच वाटत नाहीं. दुसरें, विद्येच्या अधिकत्वामुळें व त्यांच्या देशांत एक वळणच पडून गेलेलें असल्यामुळें वर्तमानपत्र घेणें हें त्यांस लत्याकपड्याच्या किंवा भोजनाच्या आवश्यक खर्चाप्रमाणेंच वाटतें. व त्यांस वर्तमानपत्राची इतकी चटक लागलेली असते कीं एक दिवस डाक चुकली किंवा तिला विलंब झाला तर त्यांस भांगट मनुष्याप्रमाणें कांहीं| सुचेनासें होतें- या कारणावरुन त्यांच्या पत्राचा खप अधि

क आहे ती निरंबर चालली आहेत. आत्या देशांत अजून रुचि वाढली पाहिजे व विद्याही वाढून लहान गावांतूनही पुस्तकालयें झाली पाहिजेत. म्हणजे तीं, समाजाच्या द्रव्यसहायानें नित्याचें मराठी वर्तमान पत्र चांगलें निघूं लागेल तर, त्यास आश्रयदाते होतील. व सरकारानें वर्तमान पत्रांवरील डाक हाशिल तर मकर कमी केलें पाहिजे. त्यावाचून निग्राच्या वर्तमान पत्राची संस्थापना चांगली व्हावयाची नाहीं.

आता एक शेवटची गोष्ट ही आहे कीं, वर्गणीदार लोकांस आपआपल्याकडील वाकया पाठविण्याविषयीं काळजीचें वळण लागलें पाहिजे. आम्हांस अनुभवावरून वाटतें कीं, शेकडा नव्वद इसम वाकया पाठविण्यास निष्काळजी असतात. व्यवहारकावा म्हटला तर बिल पाठवीपर्यंत आपण होऊन पैसे न पाठविल्यास चालेल पण शेकडा निम्याहून अधिक खप्पी लोक तीन तीन वर्षे होत आलीं तरी पैसे पाठवीत नाहींत ही त्यांस मोठी लाजेची गोष्ट आहे. बाकी वर्तमानपत्राचें कांहीं धर्मखातें नव्हे, त्याचे मालक कधीं कधीं फिर्यादी करून खर्चसहित रुपये भरून घेतात. आम्हास वाटतें कीं, अशी गैरअब्रू करून घेणें फार वाईट होय. सारांश यादेशाच्या लोकांस वर्तमान पत्रांची आवड अजून लागावी तशी लागली नाहीं व त्या कामीं ते असावे तसे दक्ष नाहींत.

सुज्ञान बोधकपत्र निघाचें बंद झाल्याबद्दल आम्हांस वाईट वाटतें. याचे मालक व कर्ते रा. रा. विश्वेश्वर सदाशिव ऊर्फ तात्याछत्रे हे आहेत. यांचा हात आज बहुत वर्षे वर्तमानपत्राच्या कामीं आहे, पुष्कळ पत्रांस यांनीं जन्म दिलें व तीं निजधामास गेलीं आहेत. यांची लिहिण्याची तऱ्हा व नमनदारी कांहीं वेगळ्या प्रकारची आहे म्हणून यांचें पत्र लोकांस फारसें प्रिय नसतें व त्याचा खप थोडा होतो. यांच्या नित्याचे वर्तमान पत्राच्या दोनशेही प्रती खपत नव्हत्या व तसेंच रखडत तें पत्र त्यांनीं अकरा महिने टाइपावर चालविलें त्यायोगें त्यांस पुष्कळ कर्ज झालें व त्यामुळें आतां तें पत्र बंद करावें लागलें. हा विचार आमचे प्रिय बंधु व मित्र छत्रेमनकूर पूर्वीच करते तर बरें होतें.

## वऱ्हाड.

उमरावतीस अशी बोलवा असल्याचें सत्यप्रकाशांत लिहिलें आहे कीं पश्चिम वऱ्हाडचे कमिशनर मि० लायल साहेब यांस पंनावांत १९०० रुपये दरमहाची कमिशनरची जागा मिळून ते लवकरच तिकडे जाणार आहेत, व ते गेल्यावर पूर्व वऱ्हाडचे कमिशनर मेजर नेंभार्ड साहेब दोन्ही भागचे कमिशनर होतील.

आम्हांस ही बोलवा खरी दिसत नाहीं व याप्रमाणें एथें कोणी बोलतही नाहीं, तथापि ही बातमी खरी असून अफिशियल रितीनें गुप्त असल्यास लायल साहेबांचे पगारखडतींचा लोक आनंदच मानितील व अकोल्याहून ते जाण्यानें त्यांचा वियोग होतो याबद्दल कांहीं दुःख मानणार नाहींत. नेंभार्ड साहेबांसारखे सरदार पश्चिम वऱ्हाडाव अधिपति झाले तर ते फारच भले गृहस्थ आहत म्हणून लोक अति आनंदित होतील यांत संशय नाहीं, परंतु सदरील बातमी वरूनच इतकें कल्पिणें हें खुशीत केली खाणें आहे. व याखेरीज लायल साहिबांस लोक वाईट म्हणतात असें नाहीं ते सिविल सर्व्हंट असून हुशार आहेत. असो. दोन्ही भागास एकच कमिशनर कसे होतील व ते आपलें सदर स्टेशन कोणतें करितील व मग दुसऱ्या सदर स्टेशनाचें काय होईल याविषयीं कांहीं नेम सांगवत नाहीं.

मेहकरचे तहशीलदार रा. रा. मल्हारराव सदाशिव यांनीं राजिनामा दिला असल्याचें मागें वर्तमान लिहिलें आहे तो अमलांत आल्याचें अजून कळलें नाहीं. परंतु त्यांचे पहिले अर्जावरून त्यांची रुहा महिन्यांची रजा मंजूर होऊन आली आहे व नरूर असेल तर उपयोगांत आणण्यास त्यांस कमिशनर साहेबांची परमाणगी मिळाली आहे असें ऐकतों.

उमरावती—गेल्या सोमवारीं मृगनक्षत्र लागलें तेव्हांपासून मेघ राजानें आपला अमल बसविण्याचा क्रम चालू ठेविला. गेल्या शनवार पर्यंत थोडासा पाऊस पडला व मेघ गर्जना, विजा लवण्याचा तडाका चालला होता. परंतु काल तिसरा प्रहरीं चांगला पाऊस पडला तो सुमारे ३ तास पडत होता. ह्या मुळें रस्तोरस्तीं पाणीच पाणी झालें. ह्या मुळें आतां हवेंत गारठा आला व जमिनींत ओलावा आल्यामुळें लवकरच पेरण्याचें काम जारी होईल. ह्मणण्यासारखी रोग राई नाहीं.

क्यापटन रैट उमरावतीचे पोलिस सुपरिंटेंडेंट हे येत्या जुलै महिन्यांत रजा घेऊन विलायतेस जाणार आहेत व ते गेल्या नंतर त्यांचें काम पाहण्या करितां आकोल्याचे पोलिस सुपरिंटेंडेंट जातील असें दिसतें.

उमरावतीचे तहशीलदार व सब मानिस्त्रेट मि. अबदुल वारी यांचे विरुद्ध कांहीं बाबदींत पोलीस लोकांनीं आपल्या अधिकाऱ्याकडे अर्ज केला म्हणून त्यांपैकीं रा० जगजीवनराव स्टेशनांतील हेडकान्स्टेबल ह्यास बरतर्फ केलें. ह्या अर्जांत काय इंगित आहे ह्याची अद्याप परिस्फुटता झाली नाहीं वाकीचे लोकां विषयीं अंतरंग तजविज चालली आहे.

वऱ्हाडचे कायम इन्स्पेक्टर जनरल आफ पोलिस मेजर मिकेट ह्यांची रजा सप्टेंबर महिन्यांत भरते व ते आल्यावर क्यापटन डेन साहेब फिरून उम०चे पोलिस सुपरिंटेंडेंटचें काम पहातील. स. प्र.

### अकोला

खामगावचे स्मालकाजनज्ज क्या० अलेक्झांडर साहेब ११ वे तारखेस रजेवर गेले त्यांचे जागेवर मे० हस्तुर बाहिमनजी साहेब यांस नेमून अडगावचे रा० रा० श्रीकृष्ण नरहर यांस पुन्हा अकोल्यास आणून रा० रा० रामराव गोविंद यांस पुन्हां अडगावास पाठविण्याचा विच्यार झाला आहे. अलेकझांडर सा. ची रजा च्यार महिन्याची आहे.

आनंदाचें वर्तमान आम्हांस असें समजलें आहे कीं रा० रा० सखाराम दत्तात्रय एथील जुडिशियल शिरस्तेदार यांस तहशिलदारी देण्याचा नेम झाला आहे. यांच्या इतके भले, सरळ, सात्विक, व हुशारींत कमी नाहींत असे मनुष्य थोडे असतील. मनुष्य जाणणारे व हक्क पाहणारे अधिकारी असते आणि दैवाची अनुकूलता असती तर हे केव्हांच तहशिलदार नव्हे पण एकस्टाही झाले असते; असतु. मे. हार्डन साहेबांनीं ही उत्तम निवडणूक केली याबद्दल त्यांची आम्ही तारिफ करितों. सखारामबाबा यांस बढती मिळण्यांत असंतोष दाखविणारा साऱ्या वऱ्हाडांत बहुधा कोणी नसावा अशी आमची अटकळ आहे, आणि तशांतून कोणी निघेल तर तो सामान्यतः विघ्नसंतोषीच असेल. सारांश हें सांगण्यांत आमचा मुद्दा इतकाच आहे कीं ते जगामित्र व मनाचे फार थोर आहेत.

दुसरें असें वर्तमान ऐकतों कीं एथील जुडिशल शिरस्तेदारीची जागा कमी करणार व तिच्या शंभर रुपयांतून चाळिस रुपये रा० रा० माधवराव हरी क्लार्क आफ दि कोर्ट यांस देणार व साठ रुपयांचा एक मनुष्य इंग्लिश जाणणाराच ठवणार. ही योजना एकाच जिल्ह्याकरिता नशी कीं होणार तें कळलें नाहीं. पण झाल्यास वावगेही नाहीं. या योजनेंत आमचे माधवराव बजीस १६० रुपये दरमहा मिळेल हें छान आहे

रेवरेंड नारायण शेषाद्री एथें आले होते व गुरुवारीं शहरांतील शाळेंत त्यांनीं एक व्याख्यान दिलें.

### हैदराबाद रेसिडेन्सी आर्डर वरून.

हिं. सर. चा जाहिरनामा नं. १८ ता. २० माहे मे सन १८७० इ०—कोर्ट फीचा आकट वऱ्हाडास लागू केला.

जे जी कार्डरी हैदराबादचे असिस्टंट रेसिडेंट यांची रजा सपटंबरचे २९ वे तारखेस पुरी होईल.

हिं. सर चें जंगलखात्याकडील सारक्युलर नं ४ ता. १२ मे १८७०—जंगलखात्याचे कन्सरवेटर आपले थर्डक्लास असि० ची पायरी वाढविण्याविषयीं शिफारस करतील तेव्हां त्यांनीं एक प्रकारचें सर्टिफिकेट पाठवित जावें. [त्याचा नमुना पहा रेसि० आर्डर० तारीख ६ जू. १८७० इ०]

मुंबई इलाख्यांतील भडगाव, कोत्री, आणि पंढरपुर एथील मनीआर्डर आफिसें बंद केली.

मि० रिचर्डसन साहेब पोलिस इन्स्पेक्टर यांनीं ठरावाप्रमाणें पोलिस परीक्षा दिली ती पसंत झाली.

मि० कृष्णाजी दिनकर सहस्रबुद्धे सेकंड क्लास कोन्डरासियर यांस फर्स्ट क्लास केलें

रेसिडेंट सा० चा जाहि० नं. १९ ता. २१ मे १८७०—वऱ्हाडाकरितां स्यानिटरी कमिशनर, व तुरुंग, दवाखाने, आणि देवी काढणें यावर सुपरइंटेंडेंट असे हुद्दे देऊन त्यांजकडे नवीन अधिकारी नेमिले आहे सबब यापुढें वऱ्हाडांतील धर्मार्थ दवाखान्यावरील कामदारांनीं आपले सर्व रिपोर्ट, पत्रकें, इस्टमेटें आणि बिलें वगैरे दुसरीकडे न पाठवितां त्यांकडे पाठवित जावीं

रेस. सा. ची नोटिस—टपालाचीं अर्धे आणा व एक आणा दराचे हशिलाचे ठसा मारलेलीं सरकारी पाकिटें बहोकडे विकत मिळण्याची तजवीज केली आहे. अर्ध आणा दराच्या सोळा पाकिटांना दहा आणे, व एक आणा दराच्या सोळा पाकिटांना एक रुपया दर आहे. जेथें जेथें टपालचा टिकिटें विकावयाचीं तेथें तेथे हीं ठेविलीं जातील. व पांच रुपयांचीं एकदम घेणारांस दर रुप्यास अर्धे आण्याप्रमाणें बतांळा मिळेल.

मि० डेंजरफील्ड पूर्व वऱ्हाडांतील असि० इंजि० यांस वर्धा रेल्वेच्या पैमाषीकडे नेमिलें.

पोलिस इन्स्पेक्टर जनरलचें सरक्युलर नंबर ७ सन १८७० इ०—रेसिडेंट साहेबांच्या मंजुरातीनें खालील नियम ठरविले आहेत.

१. आग लागल्याचे ठिकाणीं पोलिसानें जावयाचें तें जमावानें जावें. एकटें दुकटें जाऊं नये.

२. जमावातील कांहीं मनुष्यें लोकांचे बंदोबस्ताकरितां वाटून द्यावीं, व बाकीचीं आग विजविणारांस मदत करण्याकरितां द्यावीं.

३. पोलिसचा सिनियर कामदार त्यावेळीं तेथें हजर असेल त्यानें आगींतून बहेर काढलेला माल सुरक्षित ठेवण्याकरितां जागा निवडावी. व तेथे माल ठेवून बंदोबस्त राखावा. व मालकाशिवाय दुसरे कोणास तो माल तेथून उचलूं देऊं नये.

याप्रमाणें सर्व साधारण नियम ठरविले आहेत. या शिवाय ठिकठिकाणच्या सोईप्रमाणें कांहीं अधिक उणी व्यवस्था करावयाची ती पोलिस सुपरइंटेंडेंट यांनीं डिपुटि कमिशनरच्या संमतानें करावी. व आग विजविण्याकरितां पार्टी मिळवावयाची यांच्या पगड्या एकसारख्या असाव्यां म्हणून झालें.

पोलिसान जुलै महिन्यापासून दर गांवाचे जनन मरणाचे रिपोर्ट पहिले तारखेस पाठवीत जावे असा ठराव झाला.

क्या० एच स्प्यानस्की मेळघाटच्या असिस्टंट कमिशनरचे कामावर रुजू झाले.

क्या० डी डब्ल्यु लाटण उमरावतीच्या डिपुटि कमिशनरचें काम पाहूं लागले.

इन्स्पेक्टर एस डब्ल्यु सानियल यांनीं बुलढाणे जिल्ह्याच्या पोलिसचा च्यार्ज घेतला.

## वर्तमानसार

रजपुत संस्थानांवरील गवरनर जनरल साहेबांचे एजंट कर्नल किटिंग व्ही. सी., सी. एस. आय. हे सेंट्रल प्राव्हिन्सेसचे आफिशियेटिंग चीफ कमिशनर झाले.

मि० ई. एच. पर्सिवल बेळगांवचे फर्स्ट असि० कलेक्टर यांस भावनगराचा पोलिटिकल एजंट नेमिलें.

मुंबईस अशी बातमी आहे कीं, राणीसाहेबांचे पहिले चिरंजीव प्रिन्स आफ वेल्स आपले कुटुंबासहित येते हिवाळ्यामध्यें हिंदुस्थान पहाण्यास येणार. पण आम्हांस वाटतें कीं, इतक्या लवकर येणार नाहींत.

मद्रास इलाख्याला पुढीलवर्षीं नवीन गवरनर सर हर्कुलस राबिनसन हे होणार अशी विलायतेकडील बातमी आहे.

गणेश शास्त्री वाळवणकर यांनवर इंदु प्रकाश कर्त्यांनीं अब्रूची फिर्याद पुण्यास केली आहे. तशीच शंकरभट यानवरील खोट्या साक्षीच्या मुकदम्यांत गणेशशास्त्री यांनीं खोटी साक्ष दिली म्हणून त्यांस डा. फ्रेजर साहेबांनीं सेशन कमिट केलें आहे. रा. काशिनाथपंत लेंडे व गणुबाबा वाम वरील मुकदमे फिर्यादीनीं चालविण्याचें नाकबूल केले व बाकीचे दोन असामी अजून मिळाले नाहींत.

रा. रा. महादेव गोविंद रानडे व रा. व. विष्णू मोरेश्वर भिडे हे प्रायश्चित्त घेणार असें अरुणोदयांत छापलें होतें तें खोटें असें इं. प्र. त छापलें आहे.

मुंबईचे गवरनर साहेबांची स्वारी महाबळेश्वराहून पुण्यास आली.

मि॰ कैंवाल साहेब सुरतेचे जज्ज मुंबईचे हाय कोर्टांत गेले त्यांचे जागेवर मि॰ मेलाविक किंवा मि॰ न्यूनहाम साहेब होतील असें वर्तमान आहे.

मि. ग्राट साहेब धारवाडचे जज्ज चाकरी सोडून विलायतेस जाणार.

पुण्यास गणेश खिंडींत सरकारी बंगल्याचें काम पुष्कळ दिवस चालू होतें त या महिन्या अखेर अगदीं पुरें होणार. हे फारच सुंदर असून हिंदुस्थानांतील उत्तम कामें म्हणून गणलेलीं आहेत त्यांपैकीं आहे.

पुण्यास शंकराचार्यांच्या दक्षिणेकरित पट्टी जमली होती तींतून श्री. रा. आपा साहेब नातू यांनीं स्वामीस न पुसतां १३०० रु० गणेश शास्त्र्याचे मुकदम्यत बारिस्टराप्रीत्यर्थ खर्चिले यावद्दल गेल्या अठवड्याचे ज्ञा. प्र. त चर्चा झाली आहे ती पहाण्यास आम्ही आपले वाचकांस शिफारस करितों.

इनकम ट्याक्स आक्ट बहुधा बंद होईल असें पार्लमेंट सभेंत मे॰ ग्रांट डफ साहेब बोलले त्यावरून अनुमान होतें

रा. रा. धोंडो शामराव गरूड यांस मुंबईचे हाय कोर्टांत वकीली करण्याची परवानगी मिळाली

गेले रविवारीं तळघाटांत मोठ्या पावसाचें पाणी रेलावर आल्यानें जबलपुर ट्रेनची मध्यान रात्र पर्यंत खोटी झाली होती पुढें दुसरे दिवशीं सर्व सुरळीत झालें

मि॰ मारीस साहेबांची सेंट्रल प्राविन्सेसच्या चीफ कामिशनरीची कायम नेमणूक सरकारी ग्याझेटांत छापून आली.

रेवाचे राज्यांत महामारीचा आजार उद्भवला आहे. राजेसाहेब राजधानी सोडून दुसरे ठिकाणीं गेले. असें म्हणतात कीं, आठा दिवसांत १६००० मनुष्यें मेलीं.

नाशिकचे मि॰ ओव्हन साहेब ठाण्यास जाणार असें वर्तमान आहे.

साताऱ्याचे प्रसिध्द गृहस्थ रा. रा. भास्कर भिकाजी फाटक राजापुरास मुनसफ होते ते मरण पावल्याचें वाईट वर्तमान समजलें आहे. हे फार सज्जन होते.

पुणें— येथें गेल्या आठवड्यांत दोन पाऊस पडले, परंतु हवा अद्यापि थंड झाली नाहीं. शहरांत तापाचा आजार ज्यास्त झाला आहे. ज्ञ. प्र.

सातारा— अद्याप हवेंत म्हणण्यासारखा ऊष्मा कमी झाला नाहीं. मृगनक्षत्रा लागलें तथापि शहरांत पाऊस पडला नसून अजूबाजूनें बराच पाऊस पडल्याची खबर आहे. वेणा व कोयना ह्या नद्यांस बरेंच पाणी आलें आहे.

येथील शहर चीफ कन्स्टेबल माणकोजी याणीं नगर जिल्ह्यांत बदली करण्याविषयीं अधिकारी याजकडे एक दोन अर्ज केले आहेत.

श्रीगुरु रामदास महाराज यांचे वंशज दादासाहेब हल्लीं परळीस येऊन राहिले आहेत.

भोर— श्रीमंत सचिव सरकार यांची स्वारी नहराहून पुण्यास निघून गेली. चिरंजीव विद्याभ्यासाकरितां पुण्यास जाऊन राहिले आहेत. म. मि.

बेळगांव— मृगनक्षत्रास प्रारंभ होऊन एक आठवडा झाला, त्यांत एक दिवस रात्रीं बरीच वृष्टी झाली त्या शिवाय पर्जन्य मुळींच नाहीं. केव्हां केव्हां अभ्रें येतात परंतु बहुतकरून दिवसास चांगलें ऊन पडतें व रात्रीं चांदणेंही असतें. अशा स्थितीमुळें लोक फार गडबडले आहेत.

एथील कलेक्टरचे चिटणीस रा॰ रा॰ श्रीनिवास बापुराव यांस एकाएकी देवाज्ञा झाली. यांचे जागा रा. रा. गणपतराव गोपाळ उक्षगांवकर रजिस्टरकडील हेड क्लार्क यांस दिली.

नासिक— येथील कलेक्टरचे चिटणिशीचे जागेविषयीं रा. रा. शेषकृष्ण मुकदवी बेळगाव डि. चे शिरस्तेदार यांची शिफारस झाली आहे. व बहुत करून ती जागा त्यांस मिळेल असें ऐकतों.

कलादगी— एथील कलेक्टरचे चिटणीस रा. रा. हणमंतराव शिवाजी यांस धारवाड जिल्ह्यांत करजगी येथें मामलेदार नेमल्याचें वर्तमान आहे. वे. स.

बंगाल्यामध्यें गोरी फौज आहे ती:— घोडेस्वार २००८, तोफखान्याकडील लोक ६६८९, पायदळ २४९१०, व इंजिनियर ४१ मिळून एकंदर ३२५४९

जंजिरा म्हणून मुंबई जवळ हबशांचें संस्थान आहे तेथें पुन्हा कांहीं गडबड दिसते, काळ्या पायदळ पलटणीच्या दोन कंपन्या आगबोटींतून तिकडे गेल्या आहेत.

मुंबईचे कायदे कौन्सल १९ वे तारखेच्या सुमारास पुण्यास जाणार आहे.

मुंबईस राणी साहेबांचे चिरंजीव आले होते व त्या वेळीं रोशनाईचा आणि दारूकामाचा समारंभ झाला त्या गडबडींत एक हिंदुजातीचा मुलगा पडून मरण पावला. त्याचे आई बापांस मि॰ क्राफर्ड साहेबांनीं फंडांतून १२०० रुपये बक्षिस दिले.

कर्नल अंडरसन साहेब काटेवाडचे पोलिटिकल एजंट तीन महिन्यांचे रजेवर विलायतेस गेले. व फर्स्ट असि॰ मेजर का यांस त्यांचें काम पाहाण्यास नेमिलें.

## जाहिराती.

नोटिस—धनाजी वल्लद लक्ष्मणजी राहुडे रहाणार बेलुडे व अकोट तालुके अकोट यांस खालीं सही करणार इजकडून देण्यांत येते कीं माझे भावानीं तुजशीं माझें लग्न करून दिलें त्यास आजमारें वीस वर्षें झालीं इतक्या काळांत मजला ऋतुप्राप्त होण्यापूर्वी पांच वर्षें पर्यंत आपलें घरीं ने आण करीत होतास परंतु मजला ऋतु प्राप्त होऊन १८।१९ वर्षें झालीं तेव्हांपासून नेलें नाहीं. माझे भावानें तुम्हांस पुष्कळ प्रकारें सांगितलें परंतु तुम्हीं आज उद्या नेऊ म्हणून सांगितलें आणि आतां मुळींच नेत नाहीं म्हणता यावरून तुमचे मनांत मजशी संसार करण्याचा बेत दिसत नाहीं व तुम्हीं पुष्कळ लोकांत बोलून ही दाखविलें कीं मी इच्याबरोबर संसार करणार नाहीं तर असा मनकडून कोणत्याही प्रकारें वाकडा पाय पडला नाहीं. संसार सुखोपभोग घेण्याचा जो तारुण्यपणाचा काळ तो व्यर्थ जात आहे. इतके दिवस आपले मांजावर राहिलें परंतु आतां माइबाप्यानें राहवत नाहीं. आपण रात्रंदिवस आफू गांजा याप्रकारचे कैफांत निमग्न असता सबब जून ही नोटिस तुम्हांस दिली आहे तरी नोटिस पोंचले तारखेपासून १९ दिवसांचे आंत मजशीं जनरीतिप्रमाणें संसार करीन व कोणत्याही प्रकारें अम्मल करणार नाहीं अशी माझे भावाची व जातीचे पंचाची खात्री करून द्यावी आणि माझे भावास मजकरितां एकुणीस वीस वर्षें अन्नवस्त्राबद्दल दरमहा रुपये ३ प्रमाणें रुपये ६८४ सहाशे चवऱ्यांशी रुपये खर्च झाला तो त्यास देऊन मला घेऊन जावे. मुदतीचे आंत सदरहुप्रमाणें न केल्यास तुमचें सुख व स्तब्ध बसणें फारकती दाखल समजून मी मुदत संपल्यावर लागलीच पाटाचा दुसरा नवरा करीन मग मजवर तुमचा पूर्वीचे लग्नासंबंधीं कोणत्याही प्रकारें हक्क रहाणार नाहीं हें खूप समजावें कळावें तारीख १९ माहे जून सन १८७० इसवी मुक्काम अकोलें.

( सही ) लक्षुमी बाई मर्द धनाजी वल्लद लक्षुमण राहुडे हिचे हातची निशाणी बांगडी असे.

नोटिस—जानकी वल्लद महादाजी घाटगे वस्ती मौजे बोडखे परगणे बडनेर गंगाई तालुके जळगांव जिल्हा अकोलें यांस खालीं सही करणार इजकडून देण्यांत येते कीं माझा पाट होऊन सुमारें ४ वर्षें झालीं तेव्हांपासून मजला घरीं एक वेळा नेलें होतें पुढें आज तारखेपर्यंत मजला नेलें नाहीं. मध्यंतरी माझे बापाजवळ कबूल केलें कीं मी चांगले प्रकारें नांदवीन याजबद्दल स्टांप कागदावर तुझें लिहिलेलें आहे असें असून तूं मजला नांदविलें नाहीं व माझे बापाचे घरून नेलें नाहीं याजकरितां मला माझे बापानें ४ वर्षें आपले घरीं पोसिलें आहे तरी माझे खाण्याबद्दलचे दरमहा ४ रुपये प्रमाणें आकार रुपये २०० झाला आहे तो ही नोटिस पावल्या तारखेपासून आठ दिवसांचे आंत देऊन मजला आपले घरीं घेऊन जावें. नाहीं पेक्षां मी हीच तुजला फारकत दिली आहे असें समजावें व मला आठ दिवसांचे आंत न नेल्यास पुढें मजवर तुझा हक्क रहाणार नाहीं व मी पाटाचा नवरा करीन व ह्या नोटिशीबद्दल कांहीं तक्रार पडल्यास मी तिजबद्दल गुन्हेगार होईन कळावें तारीख ११ माह जून सन १८७० इसवी मुक्काम अकोलें.

( सही ) जानकी मर्द जानजी वस्ती भोटे परगणे बाळापूर इचे हातची बांगडी असे.

नोटिस राघो गंगाराम शाहामृग रहाणार आकोले यांस खालीं सही करणार याजकडोन नोटिस देण्यांत येते ऐशीजे भाऊबापु वैद्य नाशिककर यांनकडेस आमची खाते बाकी रुपये १६॥— येणें असोन ते रुपये तुम्हीं त्यानपासून घेतले असें तुम्हीं नंबर ७१ सन १८७० चे मुकदम्यांत तुमची जबानीचालू असतां बोलला सबब तुम्हांस या नोटिशीनें कळविण्यात येतें कीं, सदरहू रुपये तुम्हीं घेतले आहेत किंवा कसें? घेतले असल्यास कोणते मितीस घेतले व त्या घेतले मिती पासून आज पावेतों सव्याज व या नोटिशीचे खर्चासह ८ दिवसांत पाठवावेत. नसले घेतल्यास तसें कळवावें. सदरील मुदतींत दोहोंतून कोणतेच न कळविल्यास कायदेशिर तजाविज केली जाईल

या प्रमाणें गंगाराम छबिलदास येवलेकर याजकडेस ही खाते बाकी रुपये ३३८१ येणें तेही रुपये तुम्हीं घेतले आहेत किंवा कसें? घेतले असल्यास कोणते मितीस घेतले तें कबूल त्यामिति पासून आजपावेतों सव्याज सदरी मुदतील पाठवावे अगर घेतले नसल्यास तसें कळवावें वरील मुदतित दोहोंतून कोणतेच न कळविल्यांस ह्याविशीही कायदेशिर तजविज केली जाईल कळावें तारिख १७ जुलई सन १८७० इसवि.

(सही वारवाडि रामदत किसनदयाळ साहू वहिवाट दार तनसुकदास दस्तूरखुद

नोटिस—विठोबा वल्लद लक्ष्मण व वल्लद हरिबा राहुडे राहणार नेकूर तालुके आकोट यास खालीं सही करणार इजकडून देण्यांत येते कीं, माझा नवरा धनाजी वल्लद लक्ष्मणजी राहुडे हा मजशीं जनरीतिप्रमाणें संसार न करितां आफू, गांज्या, मद्य वगैरे कैफांत निमग्न असून गांवोगांव फिरतो हें तुम्हांस विदितच आहे. व मजला न्हाण येऊन १८ | १९ वर्षें झालीं असून त्याच्या न नेण्यानें माझें जिणें व्यर्थ होत आहे हें तुम्ही पहातच आहां यास्तव त्यास आपल्या बरोबरच्याच तारखेचे वर्तमानपत्रांत नोटिस दिली आहे तिजकडे लक्ष द्यावें. नवऱ्यास दिलेल्या नोटिशींत लिहिल्याप्रमाणें त्यानें न केल्यास मी पाटाचा दुसरा नवरा करीन आणि असें करण्यांस कांहीं बाध असल्यास आपण नोटिस पोंचल्यापासून १९ दिवसांचे आंत मला हरकत कळवावी व मला योग्य मार्ग दाखवावा व मी आपले भावाचे एथें एकुणीस वर्षें राहिलें आहे त्याबद्दल त्यास दरमहा अन्नवस्त्राबद्दल रुपये ३ प्रमाणें साहाशें चवऱ्यांशी रुपये झाले ते त्यास देऊन मजला घेऊन जावें. मी नांदण्यास कबूल आहे सदरहु लिहिल्याप्रमाणें आपणाकडून न करवल्यास आपला व जातीचा मजवर कोणत्याही प्रकारें दोष लागत नाहीं. असें समजून मी पाटाचा दुसरा नवरा करीन आणि तसें मी केल्यावर आपला पूर्वीचे लग्नाबद्दलचा हक्क व जातीची कोणत्याही प्रकारें गुन्हेगार होणार नाहीं कळावें. तारीख १९ माहे जून सन १८७० इसवी. मुकाम अकोलें.

( सही ) लक्ष्मी मर्द धनाजी वल्लद लक्ष्मण राहुडे हिचे हातची नि॰ बांगडी.

**नोटिस—** हिरालाल शेट रहाणार कसबे जामोद तालुके जळगांव यांस खालीं सही करणार याजकडून नोटिसीनें उत्तर देण्यांत येतें कीं, तुम्हीं मजला नोटीस ता० २४ माहे मेची दिल्ही कीं, मौजे खेर्डे व लाडनापूर दुकानाचा मोहसना पाच क्यारेवळ मागितला असोन दिल्हा नाहीं हाली आठदिवसांत द्यावा नाहीं तर रीतीप्रमाणें तजवीज केली जाईल यास्तव उत्तर देण्यांतयेते कीं, आम्ही नवकरी आजपर्यंत मुळचंद गंगाराम साहु दुकान जामोद वगैरे याची करून मोहासबा हिसेब वगैरे आजपर्यंत साहु मजकुराची सुन म्हणजे मोहसबा समजुन घेणारी आहे तिजला देऊन तिची पावती ता० २७ एप्रील सन १८७० इसवीची एक रुपयाचे कागदावर घेतलेली माझेपासी दाखल आहे. तु म्हाशीं व आम्हाशी कारण नाहीं. विनाकारण आम्हांस नोटिस देऊन तुमची खर्चाची नुकसानी जाली हें नीट नसोन समजुन वारंवार तकलीफ देणें कारण नाहीं या नोटिसा विशी आम्हास जो खर्च लागला तो ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांत द्यावा नाहींतर रीती प्रमाणें तजवीज करण्यांत येईल कळावे ता० १३ माहे जून सन १८७०

(सही) एंडापा वलद ईसापा वाणी

---

**नोटिस—** नागाजी वलद जानजी भिसे यांस खालीं सही करणारी नोटीस देते कीं, मी तुझी लग्नाची बायको असून सुमारे साहा वर्षे झालीं तूं मजला विनाकारण मारहाण केली व उपाशीं ठेविलें यामुळें मी कारलें येथें आपले बापाचे घरीं राहिलें आहे व मला अन्नवस्त्राबद्दल तीनशें रुपये कर्ज झाले आहे. यास्तव कळविते कीं, ही नोटिस तुम्हांस पोचल्यापासून बारा दिवसाचे आंत सदरहू कर्जाचे रुपये देऊन मला आपले घरीं घेऊन जावें येणे न केल्यास सदरहू तीनशें रुपयांबद्दल आणि पुढें दरसालचे अन्नवस्त्राबद्दल दावा करण्यात येईल कळावें तारीख २९ मे इसवी.

(सही) हवशी मर्द नागोजी भिशे निशाणी खुद्द बांगडी.

---

**नोटिस—** चुणीलाल यादोशेट अगरवाल वस्ती वडनेर भोजनी तालुके मलकापूर जिल्हा बुलढाणें यास खालीं सही करणार याजकडून देण्यांत येते ऐसाजे तुम्ही व मी सापत्न बंधू असोन आज पावेतों एकत्र रहात आहों हल्लीं आपसांत ब मत नसल्यामुळें मी वेगळा राहण्यास इच्छून वडिलार्जित जिंदगीची वाटणी करून मागत असतां तुम्ही देत नाहीं याजकरितां तुम्हास ह्या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, आज पासून ३० दिवसांचे आंत तुम्ही मजला वडिलार्जित समाईक जिंदगीचा हिस्सा माझे हिशाप्रमाणें माझे रुजुवातीनें दावा न दिल्यास तुम्हावर रीतीप्रमाणें दिवाणींत दावा केला जाईल कळावें तारीख १९ जून १८७० इ.

( सही ) कन्हय्यालाल वलद पाबोगय रहाणार वडनेर.

---

पंथा.

मराठी स्कूलमास्तरांकरितां.

हा ग्रंथ, मेहेरबान डायरेक्टर साहेब बहादूर व ए. इ. साहेब बहादूर आणि डे. ए. इ. साहेब खानदेश सब् डिव्हिजन यांजकडून झालेली वहिवाटीचीं सरक्युलरें आणि हुकूम साग्र एकत्र करून सुबोध समजुतीच्या टिपा, शिक्षणाविषयीं निबंध मार्ण मराठी क्रमिक पुस्तकांतील कठीण कावितांचा अन्वय लाऊन अर्थ यांसह तयार केला आहे. स्कूलमास्तर लोकांस अल्पकाळांत आणि श्रमांत शाळेसंबंधीं वहिवाटीची चांगली माहिती होऊन, त्यांच्या शिक्षणक्रमासही कांहीं साह्य व्हावें. अशा हेतूनें सरक्युलरावरील टिपा, शिक्षणाविषयीं निबंध आणि कवितांचा अर्थ, हे विषय सुबोध केले आहेत. ह्याचा उपयोग सर्व जिल्ह्यांतील स्कूलमास्तर लोकांस आहे. यास्तव त्यांनीं या ग्रंथास उदार आश्रय द्यावा. अशी त्यांस विनंती आहे. या पुस्तकाला चांगला आश्रय मिळाला, असें झाल्यावर छापविण्याचा इरादा आहे. किंमत नेमस्त ठेवण्यात येईल. ज्यांची हा ग्रंथ घेण्याची इच्छा असेल, त्यांनीं खालीं सही करणाराकडे पोस्टपेड पत्रानें कळविण्याचें करावें.

धुळे, तारीख १० माहे जून १८७०इ. } बाळकृष्ण मल्हार नीडकर शिरस्तेदार नि. डे- इ. खानदेश.

---

## विचित्रपुरी

### नवीन मनोरंजक पुस्तक.

सर्व लोकांस विनय पूर्वक कळविण्यांत येतें कीं, आम्ही वर लिहिलेलें मनोरंजक पुस्तक मुंबई येथें गणपत कृष्णाजी यांचे छापखान्यांत सुंदर ठसे छापावे छापण्यास आरंभ केला आहे. हें पुस्तक इंग्लिश भाषेंतील मनोरंजक पुस्तकें ( नाव्हेल्स ) यांच्या धाटणीवर केलें आहे. याचीं मराठी सहा ज्यापुस्तकाच्या साच्याचीं सुमारें ३००पृष्ठें होतील; म्हणजे मुक्तमाला वगैरे पुस्तकांच्या दुपटी एवढें होईल.

या मध्यें पूर्वीच्या लोकांच्या वेड्या समजुती, सदसद्विचाराचा त्याग, धर्म भोळेपणा, ह्या गोष्टींचें वर्णन केलें आहे; व लहानपणीं लग्न केल्याचे परिणाम, स्त्रीशिक्षणाची अवश्यकता, आणि पुनर्विवा हाची जरूरी स्पष्टरीतीनें दाखविली आहे. दुष्ट, आळशी, चोर छिनाल, आणि ठक, यांचीं चरित्रें यांत आणिलीं आहेत; व मंत्र जादू भविष्यें हीं खोटीं ठरविलीं आहेत. भांगांत आणणारे, ज्योतिषी, कापडी, इलमी, गारुडी हे लोकांस कसे फसावितात हे यांत दाखविलें आहे. ब्रम्हराक्षस, यांच्या विषयींची कल्पना यांत फारच चमत्कारिक रीतीनें उडविली आहे, व कुस्वप्नें, दुश्चिन्हें, वगैरे मानिल्याचे परिणाम दाखविले आहेत. भूतें, समंध व सुधारणा करूं लागल्यास कशा अडचणी येतात याचें विवेचन केलें आहे.

या शिवाय स्त्रीपुरुषांची अत्यंत प्रीती मित्रांचे खरोखर परस्पर प्रेम, उदार आणि परोपकारी लोकांची सत्कृत्य, आणि पापभीरु लोकांची सत्यनिष्ठा, यांचेंही निरूपण यांत केलें आहे. सारांश इंग्लिश वगैरे भाषांचा अभ्यास करून पदव्या मिळविलेल्या नवी लोकांचीं मनें कशीं होतात हा यांत नविषय आहे; वशृंगार, वीर, करुणा, इत्यादि नऊ रस उत्पन्न करून एकाच गोष्टींत हे सर्व विषय प्रसंगानुसार आणिले आहेत. अतिशय चित्तवेधक स्थलीं सुंदर चित्रें घालून उत्तम देखावे दाखविले आहेत.

हें पुस्तक पुढील महिन्याचे अखेरीस विक्रीकारितां तयार होईल. याची अगाऊ किंमत जुलै महिन्याचे आंत पाठविल्यास १॥- दीड रुपया ठावला आहे व मागाहून १॥।- पावणें दोन रुपये पडतील. ज्यास हें पुस्तक घेणें असेल त्यांणीं डांक व बंगी खर्च याबद्दल दोन आण्यासह रोख पैसे अगर एक आणा वर्ताळ्यासुध्धां तिकिटा मुंबई येथें गणपतकृष्णाजी यांच्या छापखान्यांत खालीं सही करणाराकडे पाठविल्यास पुस्तकें रवाना केलीं जातील. नाटपेड पत्र पाठवूं नये. कळावें तारीख ३ जून सन १८७० इसवी

केशव लक्ष्मण जोरवेकर. इंग्लिश टीचर इं म. स्कूल आकोला, वऱ्हाड

---

### गोपीचंद नाटक.

या नावाचें हिंदुस्थानी भाषेंत व बाळबोध लिपींत एक नवीन पुस्तक सोलापुरास रा. रा. अण्णाजी गोविंद इनामदार यांनीं तयार करून आपले कल्पतरू छापखान्यांत छापिलें आहे म त्याच्या प्रती आमचे वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आल्या आहेत. याची किंमत ०१२ बारा आणे व डाकहशील एक आणा आहे. पुस्तक नाटकाचें असून चांगलें सुरस आहे

---

### फौजदारी काम चालविण्याविषयीं कयदा सटीक.

हें नव्या क्रिमिनल प्रोसिजर ( सन १८६९ च्या ८ वे ) कायद्याचे माठें पुस्तक टीकेसुद्धां व त्यावरील हायकोर्टाचीं सक्यूलरें, ठराव, व इतर ग्रंथकारांचे अभिप्राय यांसुद्धा रा. रा. नारायण बाळकृष्ण चितळे ऊर्फ रावजी भाजेकर ठाण्याचे वकील यांनीं तयार करून ज्ञानप्रकाश छापखान्यात छापिलें, त्याच्या प्रती आमचे वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आल्या आहेत. हें पुस्तक संग्रह करण्या लायक आहे. याची किंमत ७ रुपये व डाकहशील ७ आणे पडतें.

---

### कावितासारामृत

अथवा

महाराष्ट्र भाषेच्या कावितांतील वेंचे.

**स**र्वांस विनयपूर्वक कळविण्यांत येतें कीं वरील नांवाचा ग्रंथ आम्हीं तयार करून अकोलें येथें वऱ्हाड समाचार छापखान्यांत सुंदर टाइपांवर छापवीत आहो. सदरहु ग्रंथांत वामन पंडित, मोरोपंत, अनंत कवी आदिकरून कवींच्या कविता फारच सुरस, व मनाल्हादक अशा आहेत. तर सर्वत्र देशबांधवांनीं यास उदार आश्रय द्यावा. हा ग्रंथ घेणारास सुलभ पडावा म्हणून याची किंमत फारच थोडी ठेविली आहे आगाऊ जून महिन्याचे आंत देणारास०१२. फक्त सही देणारास ०१४ आणे, आणि मागाहून ग्रंथ तयार झाल्यावर देणारास १ रुपया पडेल याशिवाय टपाल खर्चाबद्दल दोन आणे पडतील. याप्रमाणें किंमत ठेविली आहे. तिकिटें पाठविणारांनीं अर्धआणा दराची वर्ताळ्यासह पाठवावीं. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं. सदहू ग्रंथ रा. रा. शिवचंद वलदवभाई मारवाडी दुकान भडगांव यांजकडे मागितला असता मिळेल

तारीख २० माहे एप्रिल सन १८७०

( सही ) श्रीधर नारायण भडगांवकर जिल्हा खानदेश.

---

## जाहिरात.

केरोपंतांचीं पंचांगें या सालचीं ज० ग० छा० त छापलेलीं आम्हांकडे विक्रीस ठीं आलीं आहेत. किंमत दर प्रतीस ०३ आणे

---

| किमतीचे ठराव. | रु. | आं |
|---|---|---|
| वर्षाची अगाऊ देणारास ... | ६ | ० |
| साल अखेर ... .. | ७ | ० |
| सहा महिन्याची अगाऊ ... | ३ | ८ |
| एक अंकास ... ... | | ९ |
| फुटकळ .. ... .. | ० | ४ |

या शहरा बाहेरील लोकांस वर्षांचे ९२ आठवड्यांबद्दल टपाल खर्च अगाऊ पडेल तो ३ रु. ४ आणे व सालअखेर ३ रु० ८ आणे.

आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरू तारखेपासून २ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही त्यांचा मागील हिशेब सरून नवें साल चालू होईल तेथून २ महिन्यांची मुदत समजावी.

---

नोटिसा वगैरे छापण्याचे दर.

| | |
|---|---|
| १० ओळी पर्यंत ... ... ... | १ रुपया |
| १० ओळींवर प्रत्येक ओळीस | ०१०६ |
| इंग्लिश नोटिसीचे दर ओळीस | ०४ |

एकच मजकूर वारंवार छापणें असल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किमत पडेल.

---

TO OUR SUBSCRIBERS.

We beg to request that our Subscribers will forward as soon as possible there subscriptions for the present year; and trust that they will be so good as to pay up all arrears without delay.

*Proprietors of Berar Samachar*

---

**सूचना—** नोटिसा व इतर मजकूर छापावयास पाठविणारांनीं ते बालबोध लिहिल्यास फार चांगलें. निदान मनुष्यांचीं व गावांचीं नावें तरी बालबोध असावीं. तसें नसून नोटिसांचे वगैरे कामीं नावागावांची चूक झाल्यास त्याची जमाबदारी आम्हांवर नाहीं.

एडिटर व० स०

---

## वर्गणीदारांस विनंती.

सन १८६७ चे अक्टोबर महिन्यांत ही अकोल्यास वऱ्हाडसमाचारपत्र सुरू केले त्यास अडीच वर्षें होऊन गेलीं तर अजून वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस हो विनंती आहे. व हि ला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं-

वऱ्हाडसमाचाराचे मालक

---

वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्र घेण्या बंदकरून ज्या लोकांनीं त्याजबद्दलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दररुपयास अर्ध आणा प्रमाणें त्यांस व्याज द्यावें लागेल. ता. १ माहे आक्टोबर सन १८६८

वऱ्हाडसमाचाराचे मालक

---

हें पत्र आकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकां करितां छा. प्र. केलें

# वऱ्हाडसमाचार.

THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.

VOL. 5 AKOLA :—SATURDAY EVENING —JUNE, 25. 1870 NO 23.

पुस्तक ५ अकोला शनिवार सायंकाळ, तारीख २५ माहे जून सन १८७० इ०. अंक २३

## हिंदुस्थानांतील आगगाड्या.

मागें आपला हिंदुस्थान देश धनकनकसंपन्न होता, विद्या व चातुर्यही यांत पुष्कळ होतें, वायुवेगाचे रथ व आकाश यानें वगैरे विषयींचें वर्णन आपण ग्रंथांतून पहातों त्यांतून जरी थोडा बहुत कवींच्या अतिशयोक्तीचा अलंकार असला तरी सामान्यतः वऱ्हाडांतील बैलांच्या खाचर गाड्यांपेक्षां फार उत्तम तऱ्हेचीं वाहनें त्या कालीं असतील यांत संशय नाहीं. परंतु पुढें हिंदुस्थानची स्थिति निकृष्टावस्थेस आल्यामुळें त्या शूर, पराक्रमी, चतुर, व वैभवशाली पुरुषांचे वंशज आपण खरे आहों किंवा नाहीं याची निशाणी सुद्धा आपणामध्यें राहिली नाहीं इतके आपण निस्तेज होऊन गेलों आहों. व औदासीन्य आणि आळस तर आपणामध्यें इतका भरून गेला कीं प्रतापी आणि शहाणे इंग्लिश सरकार आपणावर प्रभुत्व करण्यास हल्लीं आलें आहे हें आलें नसतें तर आपण केवळ कलाहीन झालों असतों. असो.

आगगाडीची कला पहिली आपल्या देशांत होती. असें कोणा कोणा जुन्या लोकांचे बोलण्यांत आहे. परंतु त्यास कांहीं योग्य ग्रंथाधार आहे किंवा मागील लौकिकावर नुसता स्वाभिमान बाळगून ते बोलतात हें आम्हांस ठाऊक नाहीं. कदाचित ती कला होती अशी कल्पना केली तरी प्रस्तुत कालास ती मागें पडली होती तेव्हां इंग्लिशांनीं आपल्या या पिढीस आपले देशांत अत्युत्तम ज्ञानाचें अत्युपयोगी साधन आणून आपणास सुखवस्तु केलें व हें त्यांनीं स्वतांच्या फायद्याकरितां जरी केलें तरी तेणें करून त्यांचे आम्हांवर अनंत उपकार झाले आहेत यांत संशय नाहीं. व अशा महत्तम गोष्टी दुसऱ्याही त्यांनीं आम्हां करितां बहुत केल्या आहेत त्या प्रसंगानुसार सांगण्यांत येतील, आज आगगाड्यांविषयीं थोडी माहिती सांगतों.

हिंदुस्थानांत आगगाड्यांच्या ज्या कंपन्या आहेत त्या व्यापाऱ्यांच्या आहेत. सरकारची राष्ट्रांची जशी देवघेव व खटाटोप आहे तशी या रेलवे कंपन्यांची कोट्यावधी रुपयांची घडामोड व खटाटोप आहे. या व्यापारी लोकांशीं इंग्लिश सरकारानें करार केला आहे कीं तुम्ही आपले कोट्यावधि रुपये आमचे राज्यांत मातींत टाकिता अहा व देशाच्या सोईचें एक उत्तम काम करिता अहा तर तुमचे सर्व भांडवलास आम्हीं तारण आहों व तुमच्या रकमेस अमुक एक दराच्या व्याजाचे जबाबदार आम्हीं आहों. तेव्हां त्यांनीं हीं कामें मनावर घेतलीं. खरेंच आहे. अशा पक्क्या भरवशाखेरीज असे कोट्यावधी रुपये कोण रानांत टाकून देईल! एक मैल रेलवे करण्यास पाऊण लाख रुपये लागतात. व अशी हजारो मैल रेलवे झाली आहे. पुलास लाखो रुपये लागतात व असे हजारो पूल झाले आहेत. एका आगगाडीच यंत्रास सुमारे ऐंशी हजार रुपये लागतात अशीं यंत्रें हजारो आहेत. शिवाय स्टेशनें व कामदार लोक यांचे खर्च किती अफाट आहेत याची कल्पना केली म्हणजे प्रत्येक रेलवे कंपनीचें एकेक निराळें राज्य आहे व त्याजवर लाखो माणसांचा गुजारा होत आहे आणि कोट्यावधी रुपयांची घडामोड होत आहे हें पाहिलें म्हणजे आपले हिंदुस्थान देशांत उद्योग वाढला व सुखाचें साधन झालें याजबद्दल समाधान वाटतें.

आपले हिंदुस्थानांत चालू आगगाड्यांच्या कंपन्या आहेत त्याः—

१. ईस्ट इंडिया रेलवे कंपनी.

२. ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवे कंपनी.

३. मुंबई बडोदा आणि सेंट्रल इंडिया रेलवे कंपनी.

४, पंजाब आणि दिल्ली रेलवे कंपनी.

५. सिंध रेलवेकंपनी.

६. इस्टर्न बेंगाल रेलवे कंपनी.

७. कलकत्ता आणि सौथ इस्टर्न रेलवे कंपनी.

८. ग्रेट सदर्न आफ इंडिया रेलवे कंपनी.

९. मद्रास रेलवेकंपनी.

यांतील एक ईस्ट इंडिया रेलवे कंपनी विषयीं आज थोडें सांगू.

ईस्ट इंडिया रेलवेचा दिल्लीस आरंभ होऊन पूर्वेकडे १०१९ मैलांवर कलकत्यास समाप्ती झाली आहे व शिवाय मधून अलाहाबादेपासून दक्षिणेस जबलपुरापर्यंत हिची एक शाखा २३७ मैल लांबीची आहे व दुसऱ्या आणखी आमच्या खमगांव शाखेसारख्या पांच शाखा एकंदर १०९ मैलांच्या आहेत मिळून सुमारें १३६५ मैलांची ही ईस्ट इंडिया रेलवे आहे. व दिल्लीहून वायव्येस पंजाब आणि दिल्ली रेलवेची आगगाडी ५५४ मैल आहे असें हिंदुस्थानचें पूर्व टोकापासून पश्चिम टोकापर्यंत २००० मैलांचें लोखंडी घोड्याचें हें भ्रमण आहे.

या रेलवे कंपनीनें जबलपूर एक्स्टेन्शन नांवाची शाखा प्रयागापासून जबलपुरापर्यंत आणिली व इकडील ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवेशी तिचा संयोग केला येणेंकरून लोकांची फार चांगली सोय झाली. आतां मुलतान, लाहोर, अमृतसर, अंबाला, मिरत, दिल्ली, आग्रा लखनौ, प्रयाग, काशी, पाटणा, मोंगीर, मूर्शीदाबाद, कलकत्ता वगैरे शहरांस इकडून अगर मुंबई पुण्याकडून जाणें झालें किंवा तिकडून इकडे येणें झालें तर मध्यें कोठें न उतरतां येण्या जाण्यास उत्तम सोय झाली आहे. अशीच आतां दक्षिणेस मद्रासेकडील आगगाडी ग्रे. इंडि. आगगाडीस मिळाली म्हणजे सर्व हिंदुस्थानाचा दक्षिणोत्तर सांधाही मिळाला असें होईल. मग या रेलवे कंपन्यांचें कृतकार्य झालें. नंतर लहान सान शाखांचीं कामें सुरू होतील व बहुतेक मोठ्या व्यापाराच्या शहरास आगगाडीचा लाभ मिळेल.

उत्तरहिंदुस्थानांत जाणारे लोक पुण्याहून सकाळचे नऊ वाजतां किंवा मुंबईहून दुपारचे दीड वाजतां आगगाडींत बसतात ते पाहाटेचे तीन वाजतां भुसावळेस येतात व बऱ्हाणपुर, हर्दा, सोहागपुर, नरशिंगपुर मार्गानें दिवसभर प्रवास करून रात्रीं सवासात वाजतां जबलपुरास जातात. व तेथें ईस्ट इंडिया रेलवेच्या जबलपुर शाखेच्या गाडींत आठ वाजतां बसून पाहाटेच साडेपांच वाजतां अलाहाबादेस म्हणजे प्रयागास पोंचतात. तेथून कलकत्ता आग्नेयीस ६३० मैलांवर व दिल्ली वायव्येस ३९० मैलांवर आहे. कलकत्ताबाजूकडे जाणारे लोक लागलींच साडेसहा वाजतां तेथून निघतात तों पहिलें स्टेशन मिरजापूर ५६ मैल व तेथून मोगलसरायी ३९ मैल आहे. काशीस जाणारे यात्रेकरू मोगलसरायीवर उतरतात तेथून काशीपर्यंत रेलवेची शाखा ७ मैल आहे. दुसरी शाखा जबालपुरापासून मोंगीरपर्यंत ६ मैलांची आहे, तिसरी शाखा तीन पहाडापासून राजमहाल पर्यंत ८ मैलांची व चौथी बराकर पासून बरद्वानपर्यंत ७६ मैलांची आहे. तशीच अलाहाबादेहून दिल्लीस जाण्याच्या वाटेवर अग्रयाहून तुंडल्यापर्यंत १३ मैलांची एक पाचवी शाखा आहे, व सहावी जबलपूर शाखा होय! अलाहाबादेहून साडेसहा वाजतां निघालेले मनुष्य दुसरे दिवशीं सकाळीं नऊ वाजतां म्हणजे २६॥ तासांत कलकत्यास पोंचतें. व या गाडीशिवाय आणखी दुसऱ्याही दोन गाड्या दररोज जात असतात. अलाहाबादेपासून कलकत्यापर्यंत पहिले प्रतीचे आगगाडीचें भाडें ५९८१ दुसरे प्रतीचें २९८८६ व तिसरे प्रतीचें ९८१३८६ पडतें. तिकडे इंटरमीजिएट क्लास म्हणून एक प्रत तिसरे व दुसरे प्रतीच्या दरम्यानच्या भाड्याची आहे. व ती दिवसांतून ज्या एका गाडीस असते तिला तिसरा क्लास नसतो. अलाहाबादचे सदरीं लिहिलेले सकाळचे गाडीस तिसरा क्लास नसून हा व पहिला आणि दुसरा क्लास असतो. दिल्लीहून ही अलाहाबादची पाहटेची गाडी साधण्याकरितां यावयाचें असेल तर तेथून दुपारचें एक अवर वीस मिनिटास निघावें लागतें. दिल्लीपासून अलाहाबादचें हाशील पहिले क्लासास ३६ ८९ दुसरे क्लासास १८ ८९८६ व तिसरे क्लासास ६८१८६ पडते. दिल्लीहून कलकत्यास पोंचण्यास सुमारें ४२ तास लागतात व तिसरे प्रतीचें भाडें १९८१५ पडतें.

ईस्ट इंडिया रेलवेचा दिल्लीस शेवट आहे व तेथून पंजाब रेलवेस आरंभ आहे तशीच बडोदा रेलवेचीही लांबी दिल्लीस नेऊन मिळविणार आहेत; याचप्रमाणें कलकत्यापासून कांहीं रेलवेचा आरंभ आहे परंतु त्याविषयीं आज सांगण्यास अवसर नाहीं.

---

## सुवर्णतुलादान.

मद्रास इलाख्यांत त्रावणकोरचें राज्य आहे. तेथील राजे महाराज रामवर्म नावाचे आहेत, त्यांस स्टार आफ इंडियाचा महाराणी साहेबांकडून मान मिळालेला आहे. हें नेटिव राज्य असतां इतकें उत्तम रितीनें चाललें आहे कीं इंग्लिश सरकार त्याचें गुण घेतें व दुसऱ्या नेटिव संस्थानास सुधारण्यास लोक तो कित्ता दाखवितात. असो. या राजाचे वाडवडिलीं असा कुळाच्यार आहे कीं राज्यावर बसल्यानंतर आपली सुवर्णतुला करून तिचें दान करावें. यांच्याच नावाचे त्रावणकोरचे पूर्वींचे महाराज ज्यांचें तिसरे ज्यार्ज राजाशी सख्य होतें व टिपु सुलतानाशीं वैर होतें व जे च्याळिस वर्षें राज्य पदावर होते त्यांनीं आपले राज्याच्या आरंभीं आपली सुवर्णतुला करून दान दिली होती, व राज्यसमाप्तीचे वेळेस रुप्याची केली होती. तशीच या महाराजांच्या मागिल दोन पुरुषांनीं अनुक्रमें सन १८२९ व १८५० या सालीं आपल्या सुवर्णतुला करून दान दिल्या होत्या, हल्लींचे महाराजांचें वय ३८ वर्षांचें आहे व यांस गादीवर बसून दहा वर्षें झालीं आहेत. यांच्या सुवर्णतुलेचा समारंभ फेब्रुवारी महिन्याच्या सातवे तारखेस झाला. या तुळेकरितां सोनें सुमारें ८००० तोळे कलकत्याहून आणविलें होतें. त्यास व इतर समारंभास मिळून १६०००० रुपये खर्च झाला. सुवर्णतुला म्हणजे तराजूंच एका पारड्यांत आपण बसावें व दुसऱ्यांत सोन्याची प्रतिमा भारंभार वजनाची करून घालावी. याप्रमाणें तुळा झाल्यावर त्यांतील चतुर्थांश सोनें याज्ञिकीं ब्राम्हणांस दान दिलें व बाकीचें तीन चतुर्थांश इतर ब्राम्हणांस दिलें. पुण्याहवाचन, मिरवणूक, अन्नसंतर्पण मंडपशोभन वगैरे समारंभ फार उत्तम झाला. या महाराजांच्या राज्याभिषेक समयीं ही सुमारें दोन लक्षांचा धर्मादाय खर्च झाला होता. तरी धर्मसंबंधानें, व कुळाचारानें अवश्यक म्हणून इतकी रकम खर्च झाल्या बद्दल त्यांस कोणी टपका देऊं शकणार नाहीं. कारण लोकहिताचीं, व देशसुधारणेचीं कामें या राज्यांत प्रतिवर्षीं अनेक होतात आणि हें काम महाराजांचे सारे जन्मांत एक वेळच काय तें होतें म्हणून तें निर्विघ्न पणें सिद्धीस जाण्यास इंग्लिश रेसिडेंट वगैरे अधिकाऱ्यांनीं सुध्धा पुष्कळ मदत केली.

---

## रा० नारायण मोरेश्वर केळकर.

हें नांव आमचे वाचकांपैकीं कित्येकांस ठाऊक असेल. हे उद्योगी व खटपटी फार मोठे व यांस इंग्लिश येत नाहीं तरी यांचा शोध मोठा आहे, व हे कायदेपंडित आहेत. यांनीं दिवाणी, फौजदारी, व मुलकी खात्यांचे सरकारचे कायदे आक्ट व इतर ठराव वगैरेंचीं बुकें कित्येक वेळ छापून विकलीं आहेत त्यामुळें यांची प्रसिध्दी बरीच आहे. हे पूर्वी वकील होते नंतर वृत्तपत्राचा पत्राचे कर्ते होते पुढें कांहीं व्यापारावरून व कर्जावरून वगैरे यांस नादारी घ्यावी लागली व त्याच संबंधानें कारागृहवासाचें दुःख कांहीं दिवस यांस भोगावें लागलें. तरी हल्लीं आम्हांस कळविण्यास बरें वाटतें कीं ते पुन्हां अंधारांतून प्रकाशांत आले आहेत व लोकांचा उपयोगी पडण्याचें काम त्यांनीं सुरू केलें आहे. म्हणजे फौजदारी सर्वसंग्रह नांवाचें कायदे बुक हल्लीं ते छापित आहेत व त्यासंबंधाच्या त्यांच्या जाहिराती चहूंकडे गेल्या आहेत. आम्हांकडे आलेली जाहिरात पुढील पत्रीं प्रसिध्द करूं. त्यांचीं पुस्तकें लोकांनीं घेऊन त्यांस सहाय करावें असें आम्हीं इच्छितों.

नारायण मोरेश्वर आमचे स्नेही असून बंधुवर्गांतील आहेत म्हणून त्यांस आम्ही असें सुचवितों कीं त्यांनीं नीति, लौकिक, व सचोटी यांकडे चांगलें लक्ष्य देऊन आपल्या कीर्तिवृक्षाचें पुनरुज्जीवन करावें वृथा उपद्व्याप, व पोकळ उलाढाली करूं नयेत. चांगल्या व्यापारांत दोन पैसे कमी मिळाले तरी चिंता नाहीं. फार हव्यास करून कोणाची भर करावयाची आहे? अंगावर बेतली म्हणजे सख्खे भाऊ देखील उपयोगी पडत नाहींत याची त्यांनीं चांगली आठवण ठेवावी.

## वऱ्हाड.

या प्रांतांत दिवाणी समन्स भत्ता व वारंट भत्ता याजबद्दल नवीन नियम झालेले कमिशनर साहेबांनीं आम्हांकडे पाठविले आहेत त्यांवरून कळतें कीं.

१ तीनशें रुपयांचे आंतील दाव्यास समन्स भत्ता सहा आणे व त्यावरील दाव्यास बारा आणे

१ तीनशें रुपयांचे आंतील दाव्यास वारंट भत्ता एक रुपया व त्यावरील दाव्यास दोन रुपये.

कोर्टें जीं सरकारानें ठिकठिकाणीं केलीं आहेत तीं लोकांच्या सोयीकरितां व न्यायाकरितां आहेत. सरकारचे गौरव किंवा अधिकाऱ्यांचे सबडीवर त्यांचे अवलंबन नसावें असें आम्हीं समजतों; आणि जर हें आमचें मत खरें आहे तर युरोपियन लोक विलायतेस जातात, हवा घेण्यास जातात, मेजवान्या खाण्यास जातात तर त्यांच्या करितां हजारों लोकांचे गैरसोय करून कोर्टास कुलुप लावणें हे न्यायाचें काम आहे असें कोणी म्हणणार नाहीं. काय चमत्कार आहे कीं वऱ्हाडच्या सहा जिल्ह्यांत तीन स्मालकाज कोर्टें आहेत व तीं तिन्हीही चालून पालून वरचेवर [illegible] होतात व बंद आहेत. [illegible] न बडा खर्च [illegible] व बडा [illegible] त रयतेची बडी नुकसानी होते ती न व्हावी म्हणून या छोट्या कोर्टांच्या योजना, आणि तीं तर प्रतिवर्षाच्या महिने बंद होतात तेव्हां या सुट्या बस्येत काय म्हणावें? अधिकारी लोकांत रजा देण्याच्या पूर्वी त्यांच्या बदली काम करणाराची योजना करून ठेवणें अवश्य आहे आणि अशा गोष्टींवर वऱ्हाडांत फारसें लक्ष आहे असें दिसत नाहीं. व कमिशनर साहेब किंवा रेसिडेंट साहेब यांतून कोणास तसें करणें आवडत नाहीं किंवा करण्यास कांहीं अपरिहार्य अडचणी आहेत असें ते कळवीत पर्यंत या गोष्टीविषयींचें लोकांचें गाऱ्हाणें कधीं संपावयाचें नाहीं असें दिसतें. या गोष्टीकडे सरकारानें लक्ष द्यावें.

उमरावतीच्या स्मालकाज कोर्टांत अजून नव्या कोर्टफीच्या आक्टाप्रमाणें स्टांप कागद घेत नाहींत असें सत्यप्रकाशावरून कळतें. बाकीचीं सर्व कोर्टें हिंदुस्थान सरकारचा कायदा व रेसिडेंट साहेबांची आर्डर शिरसावंद्य करितात आणि उमरावतीचे स्मालकाज जज्ज तीं मानित नाहींत इतके ते शिरजोर कां ते कळत नाहीं. आतां कदाचित त्यांस आणखी कोणाचे प्रत्यक्ष हुकुमाची अपेक्षा असली आणि ती त्यांचे समजुतीप्रमाणें खरी असली तर तो हुकुम त्या अंमलदारांनीं तरी अजून कां दिला नाहीं याबद्दल त्यांस त्यांचे वरिष्ठांनीं विचारूं नये काय? पण दाद लागली तेव्हां! अस्तु. आमच्या बंधूनें सुचविल्याप्रमाणें अधिक फी भरण्यांत ज्यांचें नुकसान झालें असेल त्यांनीं फिर्यादी कराव्या हें आम्हांसही योग्य दिसतें व अशानें कांहीं दाद तरी ( लागल्यास ) लागेल.

पूर्व वऱ्हाडांत कोर्टांनिहाय वकिलांच्या वाटण्या करून दिल्या आहेत. अलीकडे उमरावतीचें एक्स्ट्रा असिस्टंट कोर्ट रा० रा० आत्माराम भिकाजी बदलून गेल्यामुळें तूर्त बंद झालें आहे तर अधिकाऱ्यांनीं त्या कोर्टाचे वकिलांस असें सांगितलें कीं दुसरें कोणे कोर्टानें तुम्हांस पत्र करल्यास तुम्ही तिकडे जा ( नाहीं तर तुम्हांस बुका आहे! ) हा हुकूम योग्य नाहीं असें आम्हांस वाटतें. जिकडे त्या कोर्टाचें काम गेलें तिकडे त्यांस नेमून दिलें पाहिजे होतें. आमच्या पश्चिम वऱ्हाडास अजून नेमणुका नाहींत हें एक यावरून एथील वकीलांनीं सुखच मानिलें पाहिजे.

### अकोला

मे० दस्तुर बहिमनजी साहेब असिस्टंट कमिशनर यांची खामगावास तूर्त नेमणूक झाल्या प्रमाणें त्यास तिकडे जाण्याचा हुकूम मिळाला.

रा. रा. श्रीकृष्ण नरहर हे नेमणुकी प्रमाणें काल रोजीं येऊन असिस्टंट कमिशनरचें काम पाहूं लागले.

या आठवड्यांत आरंभीं दोन दिवस पर्जन्यानें अक्षय वास केला होता परंतु आतां नाहीं. हवा चांगली असून रोगराई नाहीं.

थोड्या दिवसांमागें काळ्या मारुती जवळ विठोबा खाणावळवाला याचे घरीं एक पांथस्थ वस्तीस राहिला होता त्याच्या ७० रुपयांच्या नोटी चोरीस गेल्या. त्याचा शोध लागला नाहीं. फिर्यादीनें चोरी होण्याच्या पूर्व वेळची जी हकीकत सांगितली तिजवरून असें वाटतें कीं चांगला प्रयत्न झाला असता तर चोर सांपडला असता. परंतु आम्हांस वाटतें तसेंच आमचे पोलिसचे चीफ कानस्टेबल मि० येरिस यांस वाटतें तर बरें होतें किंवा असें ही कां न म्हणावें कीं त्याच्या नुसत्या नांटण्यापासून लोकांस कांहीं उपयोग नाहीं. अशा कामीं उत्तम हस्तकौशल्यच पाहिजे. असो, या गावांत मुली खानावळ एकच आहे आणि तींत अशा चोऱ्या होऊं लागल्या तर वाघाचे घरांत बिऱ्हाड ठेवल्या प्रमाणेंच लोकांस वाटेल.

मे० कमिशनर साहेबांची स्वारी काल रात्रीं एथें आली.

मे० हार्डीन साहेब डिपुटी कमिशनर यांचे बंगल्यावरील हरणास मि० बर्न साहेब यांचे चाकरानें एक खडा मारिला त्याबद्दल आमचे साहेब बहादुरांनीं फिर्याद देवविली होती तिची चौकशी दुसरे साल केंड साहेब यांनीं केली व गुन्हा नाशाबित म्हणून सोडून दिला. या मुकदम्यापासून एथील सरदार लोकांची भूतदयाव्याप्ती पाळिल्या जनावरांवरील ममता, अपराधाची गैर छपावणी, व कोर्टांतील मुकदम्याचें स्वरूप इतक्या गोष्टी दिसून येतात.

## वर्तमानसार

भावनगरचा दिवाण व मि० पर्सिवल आहेत नामदार गवरनर साहेबांचे भेटीकरितां पुण्यास गेले आहेत. कित्येक प्रकरणांचे खुलासे होणार आहेत त्यांत नारस नवीन गादीवर बसले असवा आठ आणे नजराणा देण्याचें कलम निघणार आहे.

कलकत्याचे हायकोर्टांत एक दत्तकप्रकरणीं मोठा भानगडीचा खटला कित्येक दिवस चालला होता त्याचा नामदार नार्मन साहेबांनीं फैसल केला आणि ठरविलें कीं व्यभिचारिणी स्त्रीला दत्तक घेण्याचा अधिकार नाहीं, तिनें जो मुलगा घेतला त्याचें दत्तविधान रद्द आहे.

बोरघाटांत एका बोगद्यांत कांहीं मुरुम वगैरे पडून एक दिवस आगगाडी जाण्या येण्याचें बंद झालें होतें ते पुन्हां सुरू झालें.

पुण्यांत जगद्गुरु शंकराचार्य यांनीं डा० फ्रेजर साहेब माजिस्ट्रेट यांजकडे अर्ज केला आहे कीं आमचे हिंदुधर्माप्रमाणें आम्ही न्यायाचे कोर्टांत साक्षी देण्यास येऊं नये असें आहे त्यास गणेशशास्त्री यांजवरील सडामांतील मुकदम्यांत आमची साक्ष योजिली आहे ती घेऊं नये. हा स्वामीचा अर्ज फ्रेजर सा० नीं माजिस्ट्रेट मार्फत हायकोर्टाकडे पाठविला आहे व त्याचा निकाल अजून समजला नाहीं.

मि० हावलाक साहेब दक्षिण भागचे रेविन्यू कमिशनर पुण्याहून कोंकण्याकडे गेले आहेत.

मि० सी ने बेलाक हायकोर्टाचे जज्ज २१ वे तारखेस मुंबईंत जाऊन कामावर रुजू झाले.

ईस्ट इंडिया असोसिएशनाची मुंबई शाखेची गेल्या बुधवारीं सभा भरली होती. तींतील विषयांविषयीं पुढें कळेल.

गुजराथमध्ये पर्जन्य गेल्या शनवारीं व सोमवारीं सर्व प्रांतभर मोठा पडला.

कोटाचे राणीनें अमदाबादचे जज्ज कोर्टांत मि० रिचीसाहेबावर १०००० रुपयांची नुकसानीची फिर्याद आणिली आहे.

नाशिक—ह्या आठवड्यांत पर्जन्यानें मनाजोगा करून दिली आहे. शुक्रवारापासून मात्र उघाड कमी झाला आहे. गोदावरीस येथे कदर तीन वेळां पूर येऊन गेला. हवेत गारठा बराच आला आहे; तथापि अजून गर्मी कमी झाली नाहीं. पुरामध्यें एक मनुष्य वाहवत होता परंतु सुदैवानें वांचला.

वे. रा. सदाशिव शास्त्री जोशी यांस सेशन कोर्टांतून समन्स लागलें आहे. मागील वारंटाचा अमल तेथेंच होईल असें वाटतें.

रा. रा. विष्णु बापूजी सोमण यांस निफाडास मामलेदार नेमून त्यांचे चिटणीशीचे कामावर रे० क० चे कचेरी पैकीं रा. रा. माधवराव सखाराम वैद्य यांस नेमिलें.

मे० चाटफिल्ड सा. यांची स्वारी येथील इंग्रजी शाळेकरितां जागेची तजवीज पाहण्याकरितां आली आहे. साहेब बहादुरांनीं मराठी इंग्रजी शाळा पाहिल्या.

ज्ञा. मं.

संयोगजन्य रोगाचा बंदोबस्त करण्याकरितां झालेला कायदा मुंबईस चालू ठेविल्यानें मोठा चमत्कार झाला आहे. हा कायदा करून सरकारानें गंडांच्या खटपटींत पदरच्यापोंचे भर टाकून धरलें आहे हें बरें केलें नाहीं, व यापासून कांहीं चांगलें फळ होणार नाहीं, असें बहुतांस वाटलें होतें. पण हें काम चालू झाल्यापासून याच्या उलट प्रकार झाला आहे. जिकडे तिकडे वेश्यांची व फालतू बायकांची तपासणी होऊन त्यांतून ज्यांस रोग आहे त्यांस लाक आस्पिटलांत ठेवतात. यावरून अशा बहुतेक स्त्रियास मोठा दरारा बसून त्यांतून कित्येक मुंबई सोडून पळून गेल्या, कित्येक लपून बसल्या आहेत. कित्येकींनीं नवरे करून किंवा दुसऱ्या रीतीनीं हा धंदा सोडून दिला, व बाकीच्या सरकारच्या हुकुमास मान्य होऊन लाक आस्पिटलांत गेल्या. त्यांनीं कांहीं लबाडीचे काम केलें त्यांस आगचुकवून फुपाऱ्यांत पडल्याची गत झाली व, हे. या खात्याकरितां सरकारानें जे नियम केले आहेत ते आम्ही पाहिले; ते फार चांगले आहेत. त्यावरून दुराचारी पुरुषास कांहीं धाक बसणार नाहीं, तरी स्त्रियांस नसेलच व बऱ्याच अंशीं बसला आहे. ज्या निःसंग आहेत त्या खेरीज करून बाकीच्या हा धंदा सोडतील व ज्या पुढें या मार्गास लागणार त्या मागें हटतील. ईश्वर करो कीं, सरकारच्या या तजविजीनें ही दुष्टाई अगदीं नाहींशी होवो.

इंग्लंड—विलायतेकडील पत्रांवरून समजतें कीं, मिसमेरी कार्पेंटर इने हिंदुस्थानांत स्त्री शिक्षणाच्या उत्कर्षार्थ यत्न करण्यास हात टेंकिले. ती म्हणती कीं, आतां मी आपल्या देशांतील लोकांच्या हिताकरितांच श्रम करीन!

पुढील महिन्यांत इंग्लंडांत कारागिरी मालाचें मोठें प्रदर्शन होणार आहे. त्याकरितांच मागें मुंबईस सरकारच्या सूचनेवरून डा० भाऊ दाजी यांनी कांहीं जिन्नस पाठविले. ज्ञा. द.

सातारा—मृगनक्षत्राचा अंमल सुरू होऊन स्वारी शहरांत कधीं येणार म्हणून लोक वाट पहात होते इतक्यांत गेले रविवारीं त्यांचे मेघ दूत सरदार पुढें येऊन त्यांणीं प्रथम विद्युल्लतेची परेड करून वातास्त्रानें चारी दिशा भरून टाकिल्या. दोनपहरीं २ वाजण्याचे सुमारास खाशी स्वारी येऊन धडकली. सुमारें एक घटका पर्यंत त्यांणीं आपला दरबार करून लोकांस गार केलें. पुढें दररोज स्वारी क्वचित हवेकरितां बाहेर पडे तेव्हां लोकास धूळ दर्शन होत असे. पण आज प्रात:काळ पासून आपल्या सर्व कामगारासह त्यांणीं पुन्हा येथें ठाणे दिलें तेणेंकरून लोकांची मुखकमलें प्रफुल्लित दिसूं लागलीं आहेत.

श्रीमंत आईसाहेब महाराज सातारकर यांणीं घेतलेले दत्तक चिरंजिवांचा इंग्रजी, मराठी व फारशी अभ्यास करून चालविल्याचें कळतें. ह्या महाराजांनीं शहरांतील जुने अनुभवी लोकांच्या भेटी घेऊन दररोज ते नव्या जुन्या गोष्टी ऐकण्याची वहिवाट चालू करतील तर ह्यापेक्षां त्यांस विद्येची ज्यास्त गोडी लागणार आहे.

संगमेश्वर येथील मामलेदार रा. सिताराम शंकर यांची नेमणूक खानापूर तालुक्यास झाल्याप्रमाणे ते काल रोजीं येथें येऊन दाखल झाले व रा. रा. विनायक श्रीनिवास ह्यांस आपले कामावर जाण्याविषयीं हुकूम झाला.

हणमंतराव माने यांणीं अकलूज व बेरगांव येथें वाटर पंप चालू करण्याचे उद्देशानें सुमारें ७५० रुपयेपर्यंत तें यंत्र आणण्याकरितां डि० हे० कलेक्टर यांजकडे पाठऊन दिले.

ह्या जिल्ह्यांतील बहुतेक ठिकाणीं पेरण्यांचें काम आतां सुरू झालें.

ब. मि.

नगर एथें पोलिस इन्स्पेक्टरांच्या परिक्षा जुलईचे १ ले किंवा ३ रे तारखेस होणार असें कळतें.

जुलई महिन्यांत चीफ कान्स्टेबल व हेड कान्स्टेबल यांच्या परिक्षा होणार असें समजतें. वृ. वै.

खेतर मोहनदत्त—ह्या बंगाली गृहस्थानीं मागल्या सिव्हिल सर्विसच्या वेळीं दोघां नेटिवास संकटांत घालून बरीच कीर्ति मिळविली. यांनीं विलायतेंतच एका गोऱ्या बायकोशीं लग्न केलें होतें. हल्लीं हें लग्न हिंदु धर्माचा नवरा आणि ख्रिस्ती धर्मांतील बायको असल्यामुळें कायदेशीर आहे कीं काय, याबद्दल खटला उपस्थित झाल्याचें कलकत्यांतील वर्तमानपत्रावरून कळतें.

√ कैदी वकील—"पिओनीर" वरून कळतें कीं, गोल्डस्मिथ उर्फ गोल्डमन ह्मणून एक युरोपियन यास १८६७ सालीं, खोटा चेक केल्यावरून कलकत्ता हायकोर्टानें शिक्षा दिली होती. तो हल्लीं जबलपूर येथें प्लिडरचें काम करित आहे. यानें परिक्षा वगैरे कधीं दिली हें समजत नाहीं. पण जरी परीक्षा दिली असली तथापि याची वर्तणूक मनांत आणणें अंमलदारांस योग्य होतें. महेश्वर हरी खरे यांची परिक्षा झाली असतां व त्याणें तुरुंगाची हवा पाहिली नसतांही मुं[illegible] हायकोर्टानें त्याच्या गैरचालमुळें त्यास वकिली करण्याची परवानगी दिली नाहीं, आणि गोल्डस्मिथ यास मध्यप्रांतांत तिकडील अंमलदारांनीं वकीली करण्यास कशी परवानगी दिली? कातडी गोरी म्हणून? ने. ओ.

बंगाली लोकांत स्त्री शिक्षणाविषयीं कळकळ. थोड्या दिवसांपूर्वीं कलकत्यास एक मुलगी ख्रिस्ती झाल्यामुळें ख्रिस्ती धर्मानुयायी स्त्रियांकडून बंगाली स्त्रियांस शिक्षण मिळत होतें तें बंद होत चाललें परंतु त्याच्या बदला दुसरे उपाय ते योजूं लागले आहेत. लखनौ येथें कांहीं बंगाली आहेत त्यांणीं सभा भरवून ख्रिस्ती धर्माच्या स्त्रियांच्या मार्फत घरोघर शिकविण्याच्या चालीची बंदी केली. नवीन स्त्रीशिक्षक नेमून तिच्या जवळ स्त्रियांनीं शिकावें असा ठराव केला. यावरून या कामांत त्यांची विशेष कळकळ दिसते. स्त्रीशिक्षक कोठून मिळणार हें मात्र कळत नाहीं. आमच्या इकडे अशी कळकळ पुढीं च नाहीं म्हटलें तरी चालेल. हिं. रि.

फ्रेंड आफ इंडिया चे ऐकण्यांत असें आलें आहे कीं, वायव्य प्रांतांत मुलीस मारणें हें बंद करण्याविषयींचा कायदा लवकर अमलांत येणार आहे. ने. ओ.

धुळें—या आठवड्यांत हवा अति उष्ण झाली आहे. आकाश नेहमीं अभ्राच्छादित असतें वायु अति रोधल्या प्रमाणें झाला. अशा कुंद हवे मुळें तलखी मनस्वी होऊन घर्मस्राव होत आहे. भरपूर पर्जन्य पडून जमीनीची वाफ कधीं शांत होईल ती होवो. हल्लीं रोगराई विशेष म्हणण्या सारखी नाहीं.

ता० १२ रोजीं एथें व आसपासचे गांवीं कोठें कोठें इंच व कोठें १। इंच पाऊस पडला.

आमचे जिल्ह्यांतील सर्व गायरानें व किर्कोळ पडीत जमिनी नदीच्या कडा व घराचा आगवडा व पिछवडा व नाल्याच्या काठची जमनि या सर्व ठिकाणीं झाड लावावीं अशा बद्दल मामलेदार लोक आपआपले तालुक्यांतील, पाटील कुळकर्णी लोकांस बोलावून हुकुमा प्रमाणें सभा करून सबब देत आहेत. खा. वै

व्यंकट शास्त्री माटे.

आम्हास लिहिण्यास आनंद वाटतो कीं, इतक्या परिणामास गोष्टी आल्या तेव्हां शेवटीं एकदां वे० शा० व्यंकटशास्त्री माटे ह्यांनीं आपला खरा अभिप्राय सांगितला. थोडे दिवसांपूर्वीं रेलवे माजिस्त्रेट साहेबांच्या कचेरींत शास्त्रीबोवांची साक्ष होती त्या प्रसंगीं शपथ घेऊन रा० रा० रावसाहेब भांडकर वकील ह्यांचे प्रश्नावरून माटे ह्यांनीं सांगितलें कीं, कलियुगाचें प्रमाण आम्ही विष्णुशास्त्र्यांस सुचविलें असें वाटतें. आम्ही पुनर्विवाहाचे वादाविषयीं जेव्हां मत दिलें त्या वेळेस ह्या कलियुगाचे प्रमाणाचा विचार केला नाहीं; व अद्यापपर्यंतही त्यावर उत्तर आम्हांस सुचलें नाहीं. ह्याकरितां आम्हीं अद्याप असेंच मानतो कीं, खऱ्या कलियुगास अजून आरंभ नाहीं व पुनर्विवाहाचे निषेधार्थ जीं वाक्यें आहेत तीं लागू होण्याचा अद्याप कालच आला नाहीं. आतां तर एकीकडे चार पंच व एकीकडे सहा झाले असें म्हणणें सर्वस्वी अयोग्य होय.

असा, ह्या संबंधानें शंकराचार्य स्वामीस आम्हास इतकेंच सुचविणें आहे कीं, त्यांनीं जें निर्णयपत्र केलें आहे त्यामध्यें कांहीं तफावत करणें आतां त्यांचा धर्म होय. वे० शा० व्यंकटशास्त्री ह्यांचें मत त्यांनीं पाहिजे तर मुळींच गाळावें किंवा पुनर्विवाह पक्षास अनुकूळ असें धरावें. असें जर स्वामी करतील व दुसऱ्याही कित्येक गोष्टी त्या निर्णय पत्रांत बदलण्यासारख्या आहेत त्या बदलतील तर आम्ही सत्याचा अपलाप करणार नाहीं ही जी त्यांनीं प्रतिज्ञा केली होती तिच्या अनुरोधानें ते चालले असें होईल. नाहीं तर बोलण्याप्रमाणें करणें नाहीं असा स्वामीवर दोष येईल व त्यांच्या निर्णयपत्रांतही अर्थ नाहींसा होईल; कारण ह्या निर्णयपत्रांत व्यंकटशास्त्री ह्यांचें मत पुनर्विवाहास प्रतिकूल म्हणून लिहिलें आहे पण इकडे शपथ घेऊन शास्त्रीबोवांनीं आपलें खरें मत वर सांगितल्याप्रमाणें आहे म्हणून सांगितलें. ह्या सर्व गोष्टींचा विचार करून स्वामी आपल्या निर्णय पत्रांत फेरफार करतील अशी आम्हीं आशा करतों.

ज्ञा. प्र.

ज्ञानप्रकाशकर्ते यांस विनंती
रा. रा. वे. स. कर्वे यांस

वि. वि. महाराज आमच्या या इलाख्यांत पिनल् कोडांतील बहुतेक गुन्ह्यांचीं उदाहरणें वारंवार पहाण्यांत व ऐकण्यांत, येतात. परंतु "अब्रूनुकसानी" बाबद गुन्हे कोर्टापुढें आलेले बहुतकरून ऐकण्यांत येत नाहींत याचें कारण काय असेल तें असो, तथापि हालमध्ये कुर्गी तुमच्या सुधारलेल्या व शाहण्या लोकांनीं तशा फिर्यादीचें वेड मानविलें आहे. आणि त्याचें कारण पुनर्विवाह संबंधीं सूड उगविणें हें होय; परंतु अशा फिर्यादीपासून उत्तेजक पक्षास किती मदत मिळणार आहे याविषयीं आपण आपल्या पत्रांत थोड्या दिवसां खालीं लिहिलेंच आहे. म्हणून त्याविषयीं मी विशेष लिहित नाहीं. आपणास व विशेषेंकरून आपले शाहणे व कायदे कानू जाणणार बंधू जे ज्ञानप्रकाश कर्ते यांस माझें विचारणें असें आहे कीं, ज्ञानप्रकाश कर्त्यांविषयीं सरकारानें कांहीं निराळा कायदा केला आहे काय? त्यांणीं आपल्या पत्रांत पाहिजे तसें लिहावें, लोकांस व व्यक्तीस उद्देशून पाहिजे त्या शब्दाचा उपयोग करावा, अशी त्यांस निराळ्या आक्टानें परवानगी आहे कीं काय? त्यांच्या तोंडांत जरी कोणी मारिली किंवा त्यांस कोणीं शिव्या दिल्या तर त्यांणीं त्या अपराध्यावर सरकारांत फिर्याद न करितां उलट च्यार तोंडात माराव्या किंवा १० शिव्या द्याव्या अशी परवानगी त्यांस आहे की, काय? पहा तारीख १३ च्या ज्ञानप्रकाशांत त्याच्या कर्त्यानें गणेश बापूजी मालवणकर यांच्या संबंधानें लिहित असतां त्यांस मानलेल्या टोणग्याची उपमा दिली आहे. तसेंच नातू यांत 'वेदशास्त्र शून्य' 'हिंदुधर्मांतील किडे' इत्यादि उपा, अडाणपणाच्या शिव्या दिल्या आहेत, तसेंच मागें खंडेराव माहाराजा सारख्या थोर कुळांतील राजाधिकारी पुरुषास 'खंडजी पाटील' 'खंडोबा' 'खंडोपंत, इत्यादि हलके शब्दाचे लेख ज्ञानप्रकाशांत नेहमी असतात ते शब्द मात्र पिनल कोडच्या ४९९ कलमांत किंवा त्याचे जवळ जवळ येत नाहींत; परंतु ज्ञानचक्षूनें आपल्या पत्रांत 'उत्तेजक पक्षाकडील लोक थोडावशीला पोंचवून आपला मतलब साध्य करितात असें लिहिलें होतें हे शब्द मात्र ४९९ कलमाजवळ जवळ येतात याचें कारण काय? ज्ञानप्रकाश कर्त्यानें पाहिजे तसें लोकांवर तोंड सोडावें व्याजोक्तीनें शिव्या द्याव्या व त्या लोकांनीं सहन कराव्या अशी त्यास परवानगी आहे किंवा कसें? या विषयीं जर ते कृपा करून कळवितील तर फार उपकार होतील; परंतु माझ्या बुद्धी प्रमाणें मी या प्रसंगीं इतकेंच कळवितों कीं, हा जो अब्रूनुकसानीच्या फिर्यादीचा वूट निघाला आहे त्याचा उपयोग भस्मासुरा प्रमाणें न होऊं म्हणजे झालें. नाहींपेक्षां आपले कपोस सरकारच्या वड्या घरांत शेवटचा काळ घालवावा लागेल असें वाटतें. आज पावेतों लोक स्वस्थ बसले हा त्यांचा थोरपणा आहे; परंतु असेंच सदोदित दिवस येतील असें नाहीं.

एक पत्रे वाचणारा.

## जाहिराती.

नोटिस गंगाजी वल्लद दौलजी वाकर रहाणार पिंपळखुंटें तालुके बाळापूर जिल्हा अकोलें यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, सन १२७६ चे कार्तिक महिन्यांत आह्यांजवळून कर्ज रुपये ५९ व शिवाय व्याज दर रुपयास एक पैसा प्रमाणें येणें आहे. तें आज तारखेपासून १५ दिवसांत आमचे दुकानीं आणून द्यावें. न दिल्यास शिरस्ते प्रमाणें दिवाणी मार्फत घेण्यांत येतील. कळावें तारीख १८ माहे जून सन १८७० इसवी.

सही हंसराज वल्लद हेटुमल मारवाडी दुकान नागगांव तालुके मेहेकर.

नोटिस यादव वल्लद नानजी पारधी रहाणार कडणापूर तालुके जळगांव जिल्हा अकोलें यांस खालीं सही करणार याजकडोन नोटिस देण्यांत येते कीं तुमचे नांवें दोन शेती नंबर १०।।९२ याजबद्दल आम्हीं अपील केलें आहे. तर आपण या आपिलांत खुद मुद्याचे साक्षीदार इसम कुळवी घेऊन तारीख ५ जुलईस खुशीनें सोडलें किंवा जबरीनें घेतलें याबद्दल पुरावा करावा अगर याप्रमाणें पुरावा न होईल किंवा खोटा पुरावा देशील तर पिनल कोर्ट कायद्याप्रमाणें शिक्षा देण्यांत येईल व शेत ही तुम्हांस मिळणार नाहीं व सदरी लिहिल्या तारखेस आपिलाचा निकाल होणे आहे. हें आपणास कळावें तारीख २० माहे जून सन १८७० इसवी मुक्काम अकोलें.

सदरील शेताची किस्तकारी आम्हीं केली आहे. तर आपणास असें कळवितों कीं आपिलाचा निकाल होई पर्यंत कोणतेही प्रकारें शेताची किस्तकारी करूं नये जर तुहीं केल्यास नुकसानी बद्दल पैसा दावा लागेल कळावें तालुके मजकूर.

(सही) नारायणराव वल्लद दिपचंद जी देशमुख कांडणापूरकर द. ख.

नोटिस बिठु वल्लद रामजी वारकशी वस्ती पातूर शेखबाबू तालुके अकोलें यांस व इतर सर्वांस ठाऊक होण्यासाठीं खालीं सही करणार यांजकडून कळविण्य[illegible] कीं भवानी वल्लद नेराम कास

पातूरकर यानवर माझा हुकूमनामा सुमारें १०० रुपयांचा झालेला असून त्याचे फेडीसाठीं आपला माल जप्त होऊं नये या हेतूनें भवानी हा आपलीं शेतें वगैरे जिनगी गाहण व खरेदी करूं इच्छीत आहे सबब या नोटिशीनें कळविलें जातें कीं या हुकूमनाम्याची अदाई होई तों पावेतों त्याणें वदील प्रमाणें जिनगी गाहण वगैरे लिहवाल तो योग्य प्रकारें दिली नाहीं असें समजलें जाईल करितां विठूनें किंवा दुसरे कोणी ती जिनगी कोणतेही प्रकारें घेऊं नये तारीख २७ जून सन १८७० इसवी.

( सही ) महादू वल्लद बाबूजी अकोलें निशाणी खुद.

**नो**टिस—जगन वलद भिवाजी जेंगळे माळी हल्लीं वस्ती पेठ पागोळें तालुके भडगांव जिल्हा खानदेश यांस खालीं सही करणार इजकडून कळविण्यांत येतें कीं, तूं माझा कायदाचा नवरा असून मजला विनाकारण माहेरीं टाकून एथून पळून पारोळ्यास जाऊन जातवाल्यापाशीं मी मेलें असे सांगून तेथें पाटाची दुसरी बायको केली. त्याला अदीच वर्षे झालीं. व मी बापाचे घरीं सुमारें ७ वर्षे आहे. गेले मार्च महिन्यांत माझे तारुण्य व्यर्थ जातें असें जाणून माझा भाऊ रामजी गवर पारोळ्यास येऊन जातीच्या पंचासमक्ष नांदविण्याविषयीं तुला विचारतां तूं आव दिलास कीं, येत असल्यास तिचे घर आहे. नाहीं तर तिला चारा वाटा मोकळया आहेत. याप्रमाणें पंचांचा दस्तऐवजही मजपाशीं आहे. तरी आतां सवतीसह तुजबरोबर संसार करण्यास माझें धैर्य होत नाहीं. तथापि सवतीपासून व तिजमुळें तुजपासून व तुझे बापापासून माझे शरिरास इजा, किंवा जिवास धोका होणार नाहीं. असा खातीचा जामीन माझे बापास व तेथील पंचास देऊन सात वर्षांचे माझे अन्नवस्त्राच्या खर्चाबद्दल रुपये साडेतीनशें आणि सदरहू पारोळ्याचे पंचाइतीस पंचांमध्येंच माझे भावानें खर्च केले ते रुपये १०० एकुण रुपये ४५० ही नोटिस तुला पावल्यतारखेपासून एक महिन्याचे आंत माझे बापास तूं पटऊन देशील तर मी तुजबरोबर नांदण्यास कबूल होईन. याजकरितां तुला माझें अगत्य असल्यास वर, लिहिलें प्रमाणें जामीन व ४५० रुपये मुदतवारीं तूं पाठवावे. न पाठविल्यास किंवा या विषयीं तुजकडून मुदतींत कांहींच जाब न आल्यास मुदत सरल्यानंतर मी तुझा व तुझे बापाची व जातवाल्यांची बिलकूल हरकत राहिली नाहीं असें समजून व तुझे उगीच बसणें हेंच मला फारकत आहे असें जाणून माझें जिणें व्यर्थ न व्हावें म्हणून मी पाटाचा दुसरा नवरा करीन हें खास तुला कळावें तारीख २२ माहे जून सन १८७० इसवी.

( सही ) जमना मर्द जगन जेंगळे साळी पेठ देऊळगांवराजा ता० चिखली जि० बुलढाणें इचे हातची निशाणी बांगडी.

पंथा.

मराठी स्कूलमास्तरांकरितां.

हा ग्रंथ, मेहेरबान डायरेक्टर साहेब बहादूर व ए. इ. साहेब बहादूर आणि डे. ए. इ. साहेब खानदेश सब्‌डिव्हिजन यांजकडून झालेली वहिवाटीचीं सरक्युलरें आणि हुकूम साग्र एकत्र करून सुबोध समजुतीच्या टिपा, शिक्षणाविषयीं निबंध आणि मराठी क्रमिक पुस्तकांतील कठीण कवितांचा अन्वय लाऊन अर्थांसह तयार केला आहे. स्कूलमास्तर लोकांस अल्पकाळांत आणि श्रमांत शाळेसंबंधीं वहिवाटीची बहुतेक माहिती होऊन, त्यांजला शिक्षणकामासही कांहीं साह्य व्हावें. अशा हेतूनें सरक्युलरावरील टिपा, शिक्षणाविषयीं निबंध आणि कवितांचा अर्थ, हे विषय, सुबोध केले आहेत. ह्यांचा उपयोग सर्व जिल्ह्यांतील स्कूलमास्तर लोकांस आहे. यास्तव त्यांनीं या ग्रथास उदार आश्रय द्यावा. अशी त्यांस विनंती आहे. या पुस्तकाला चांगला आश्रय मिळाला, असें झाल्यावर छापविण्याचा इरादा आहे. किंमत नेमस्त ठेवण्यांत येईल. ज्यांची हा ग्रंथ घेण्याची इच्छा असेल, त्यांनीं खालीं सही करणाराकडे पोस्टपेड पत्रानें कळविणाचें करावें.

धुळें, तारीख १० माहे जून १८७० इ. } बाळकृष्ण मल्हार नीडकर शिरस्तेदार नि. डे. इ. खानदेश

## विचित्रपुरी

### नवीन मनोरंजक पुस्तक.

सर्व लोकांस विनय पूर्वक कळविण्यांत येतें कीं, आम्ही वर लिहिलेलें मनोरंजक पुस्तक मुंबई येथें गणपत कृष्णाजी याचे छापखान्यांत सुंदर ठसे छापावया छापण्यास आरंभ केला आहे. हें पुस्तक इंग्लिश भाषेंतील मनोरंजक पुस्तकें ( नावेल्स ) यांच्या धाटणीवर केलें आहे. याचीं मराठी सहाच्या पुस्तकाच्या साच्याचीं सुमारें ३०० पृष्ठें होतील; म्हणजे मुक्ताबाळा वगैरे पुस्तकच्या दुपटी एवढें होईल.

या मध्यें पूर्वीच्या लोकांच्या वेड्या समजुती, सदसद्विचारत्याग, धर्म भोळेपणा, या गोष्टींचें वर्णन केलें आहे; व लहानपणीं लग्न केल्याचे परिणाम, स्त्रीशिक्षणाची अवश्यकता, आणि पुनर्विवाहाची जरूरी स्पष्टरीतीनें दाखविली आहे. दुष्ट, आळशी, चोर छिनाल, आणि ठक, यांचीं चरित्रें यांत आणिलीं आहेत; व मंत्र जादू भविष्यें हीं खोटीं ठरविलीं आहेत. सांगांत आणणारे, ज्योतिषी, कापडी, इलमी, गारुडी हे लोकांस कसे फसवितात हें यांत दाखविलें आहे. ब्रम्हराक्षस, यांच्या विषयींची कल्पना यांत फारच चमत्कारिक रीतीनें उडविली आहे, व कुस्वप्नें, दुश्चिन्हें, वगैरे मानिल्याचे परिणाम दाखविले आहेत. भुतें, संबंध व सुधारणा करूं लागल्यास कशा अडचणी येतात याचें विवेचन केलें आहे.

या शिवाय स्त्रीपुरुषांची अत्यंत प्रीती मित्रांचे खरोखर परस्पर प्रेम, उदार आणि परोपकारी लोकांची सत्कृत्यें, आणि पापभीरु लोकांची सत्यनिष्ठा, यांचेंही निरूपण यांत केलें आहे. सारांश इंग्लिश वगैरे भाषांचा अभ्यास करून पदव्या मिळविलेल्या नवी लोकांचीं मनें कशीं होतात हा यांत नविषय आहे; वशृंगार, वीर, करुणा, इत्यादि नऊ रस उत्पन्न करून एकाच गोष्टींत सर्व विषय प्रसंगानुसार आणिले आहेत. अतिशय चित्तवेधक स्थलीं सुंदर चित्रें घालून उत्तम देखावे दाखविले आहेत.

हें पुस्तक पुढील महिन्याचे अखेरीस विक्रीकरितां तयार होईल. याची आगाऊ किंमत जुलै महिन्याचे आंत पाठविल्यास १॥- दीड रुपया ठेवला आहे व मागाहून १॥।- पावणे दोन रुपये पडतील. ज्यास हें पुस्तक घेणें असेल त्यांणीं डाक व बंगी खर्च याबद्दल दोन आण्यासह रोख पैसे अगर एक आणा वर्तोळ्यासुध्धां तिकिटा मुंबई येथें गणपत कृष्णाजी यांच्या छापखान्यांत खालीं सही करणाराकडे पाठविल्यास पुस्तकें रवाना केलीं जातील. नाटड पत्र पाठवूं नये. कळावें तारीख ३ जून सन १८७० इसवी

केशव लक्ष्मण जोरेकर. इंग्लिश टिचर इं अकोला, वऱ्हाड

### गोपीचंद नाटक.

या नावाचें हिंदुस्थानी भाषेंत व बाळबोध लिपींत एक नवीन पुस्तक सोलापुरास रा. रा. अण्णाजी गोविंद इनामदार यांनीं तयार करून आपले कल्पतरु छापखान्यांत छापिलें आहे व त्याच्या प्रती आमचे वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आल्या आहेत. याची किंमत ०।२ बारा आणे व डाकहशील एक आणा आहे. पुस्तक नाटकाचें असून चांगलें सुरस आहे

### फौजदारी काम चालविण्याविषया कायदा सटीक.

हें नव्या क्रिमिनल प्रोसिजर ( सन १८६९ च्या ८ वे ) कायद्याचे मोठें पुस्तक टीकेसुद्धां व त्यावरील हायकोर्टांचीं सर्क्युलरें, ठराव, व इतर ग्रंथकारांचे अभिप्राय यांसुद्धा रा. रा. नारायण बाळकृष्ण चितळे ऊर्फ गावजी भानेकर ठाण्याचे वकील यांनीं तयार करून ज्ञानप्रकाश छापखान्यांत छापिलें, त्याच्या प्रती आमचे वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आल्या आहेत. हें पुस्तक संग्रह करण्या लायक आहे. याची किंमत ७ रुपये व डाकहशील ७ आणे पडते.

### कवितासारामृत

अथवा

महाराष्ट्र भाषेच्या कवितांतील वेंचे.

**स**र्वांस विनयपूर्वक कळविण्यांत येतें कीं वरील नांवाचा ग्रंथ आम्हीं तयार करून अकोलें येथें वऱ्हाड समाचार छापखान्यांत सुंदर टाइपांवर छापवीत आहो. सदहू ग्रंथांत वामन पंडित, मोरोपंत, अनंत कवी आदिकरून कवींच्या कविता फारच सुरस, व मनाल्हादक अशा आहेत. तर सर्वत्र देशबांधवांनीं यास उदार आश्रय द्यावा. हा ग्रंथ घेणारास सुलभ पडावा म्हणून याची किंमत फारच थोडी ठेविली आहे आगाऊ जून महिन्याचे आंत देणारास ०।२. फक्त सही देणारास ०।४ आणे, आणि मागाहून ग्रंथ तयार झाल्यावर देणारास १ रुपया पडेल याशिवाय टपाल खर्चाबद्दल दान आणे पडतील. याप्रमाणें किंमत ठेविली आहे. तिकिटें पाठविणारांनीं अर्धेआणदराची वर्तोळ्यासह पाठवावीं. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं. सदहू ग्रंथ रा. रा. शिवचंद बलदेवभट, मारवाडी दुकान भडगांव यजकडे मागितला असतां मिळेल तारीख ३० माहे एप्रिल सन १८७०

( सही ) श्रीधर नारायण भडगांवकर जिल्हा खानदेश.

## जाहिरात.

केरोपंतांचीं पंचांगें या साल्चीं म० ग० छा० त छापलेलीं आम्हांकडे विक्रीस ठीं आलीं आहेत. किंमत दर प्रतीस ०।३ णाणे.

| किमतीचे दराव. | रु. | आ |
| --- | --- | --- |
| वर्षाची अगाऊ देणारास… | …६ | ० |
| साल अखेर … … | …७ | ० |
| सहा महिन्याची अगाऊ … | ..३ | ८ |
| एक अंकास … … | | ९ |
| फुटकळ … … .. | ० | ३ |

या शहरा बाहेरील लोकांस वर्षाचे ५२ आठवड्यांबद्दल टपाल खर्च अगाऊ पडेल तो १ रु. ४ आणे व सालअखेर १ रु० ८ आणे.

☞ आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरु तारखेपासून २ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही त्यांचा मागील हिशेब सरून नवें साल चालू होऊन तेथून २ महिन्यांची मुदत समजावी

नोटिसा वगैरे छापण्याचे दर.

१० ओळी पर्यंत… … … १ रुपया

१० ओळींवर प्रत्येक ओळीस ० ।१८

इंग्लिश नोटिसीचे दर ओळीस ०।८

एकच मजकूर वारंवार छापणें असल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

TO OUR SUBSCRIBERS.

We beg to request that our Subscribers will forward as soon as possible there subscriptions for the present year; and trust that they will be so good as to pay up all arrears without delay.

*Proprietors of Berar Samachar*

**सूचना**—नोटिसा व इतर मजकूर छापावयास पाठविणारांनीं ते बाळबोध लिहिल्यास फार चांगलें. निदान मनुष्यांचीं व गावांचीं नावें तरी बाळबोध असावीं. तसें नसून नोटिसांचे वगैरे कामीं नावागावांची चूक झाल्यास त्याची जबाबदारी आम्हांवर नाहीं.

एडिटर व० स०

## वर्गणीदारांस विनंती.

सन १८६७ चे अक्टोबर महिन्यांत आम्ही अकोल्यास वऱ्हाडसमाचारपत्र सुरू केलें त्यास अडीच वर्षे होऊन गेलीं तर अजून वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व हिला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं.

वऱ्हाडसमाचाराचे मालक

वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्र घेण्या बंद करून ज्या लोकांनीं बाजबदकची बकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दरशेपयास अर्धे आणा प्रमाणें त्यांस व्याज द्यावें लागेल.ता १ माहे आक्टोबर सन १८६८

वऱ्हाडसमाचाराचे मालक

हें पत्र आकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालका करितां छा. प. केलें.